पुणें मराठी ग्रंथालय
क्रमांक—
014224

॥ श्री ॥

निरंजन स्वामीकृत

# चैतन्य विजय

अथवा

संत शिरोमणि श्री तुकाराम महाराज
यांचे गुरु श्रीमत् केशव चैतन्य व
पितामहगुरु श्रीमत् राघव
चैतन्य यांचें चरित्र.

पुणें मराठी ग्रंथालय
व. क्रमांक
अनुक्रमांक

किंमत १० आणे.

॥ श्री ॥

## निरंजन स्वामीकृत

# चैतन्य विजय

अथवा

संत शिरोमणि श्री तुकाराम महाराज यांचे गुरु
श्रीमत्केशव चैतन्य व पितामह गुरु
श्रीमद्राघवचैतन्य यांचें चरित्र.

---

आवृत्ति १ ली. प्रति ५०००

---

हें पुस्तक

रा. रा. ग. कृ. देसाई यांनीं गिरगांव मुंबई येथें 'दुर्गा' प्रेसमध्यें छापून, श्रीयुत वासुदेव बाळकृष्ण राजर्षि यांनीं 'चैतन्य ऑफीस' चिंचपोकळी मुंबई (नं ११) येथें प्रसिद्ध केलें.

सन १९१३.

किंमत १० आणे.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १६ | १० | ऊवाला | ध्रुवाला |
| २५ | २. | हाळी | होळी |
| २८ | ८ | ह | हे |
| ३० | ११ | भागारथी | भागीरथी |
| ७१ | १ | माथेसी | मातेसी |
| ८१ | ५ | हाय | होय |
| ८७ | ४ | र्मी याचि | म्यांचि |

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर करून सर्व हक्क मालक व प्रकाशक यांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

# विषयानुक्रमणिका.


**अध्याय १ लाः**—मंगलाचरण--राघव चैतन्याचा वृत्तांत--व्यासाचा उपदेश--तपश्चर्या--नृसिंह भटाचा पूर्वेतिहास-तपश्चर्या--नृसिंह मूर्तीचा लाभ--विश्वनाथ उर्फ बाबा चैतन्याचा जन्म .... .... .... .... .... १

**अध्याय २ राः**—विश्वनाथ उर्फ केशव चैन्तय यांचे ओतूरास गमन व श्रीमद्राघवचैतन्याकडून आत्मस्वरूपाची ओळख. .... .... .... .... .... १५

**अध्याय ३ राः**—उभय स्वामींची तीर्थयात्रा--काशींतील चमत्कार--मशीद उडविणें ( निजामशाहा बादशाहाचा उद्धार) आळंद गुंजोटीस श्रीमद्राघवचैतन्य यांची समाधि २२

**अध्याय ४ थाः**—तपोवनश्री वर्णन--मुकुंदभटाच्या येथें गंगेचें आगमन--श्रीमत्केशवचैतन्य यांची समाधि .... ४१

**अध्याय ५ वाः** नातू केशव याचा व्रतबंध--त्यास उपदेश—भागवत पारायण--होनाची प्राप्ति-जुन्नरच्या बिबीसाहेबाच्या सैन्याचा मोड.... .... .... .... ५४

**अध्याय ६ वाः**—श्रीतुकाराम महाराज यांच्या पूर्वजांचा वृत्तांत--त्यांच्या ठिकाणीं असलेलें अष्टादश लक्षण वर्णन व केशवचैतन्याचा स्वप्नांत उपदेश--यादव बाबाची कसोटी व त्यास उपदेश .... .... .... .... ७१

चैतन्याची आरती .... .... .... .... .... ९५

तिनेवल्लीचे ] **नृसिंहभट यांचा वंशवृक्ष.** [ देशपांडे.

- त्रिंबक (यांचा वंश हल्लीं पुणें येथें आहे.)
- विश्वनाथ ( यांचेंच नांव ‘ केशव चैतन्य ’ असें ठेविलें.)
  - नृसिंहभट
    - केशवभट
      - काशीनाथ
        - कृष्णंभट
          - रामचंद्र
            - गोपाळ
              - गोविंद
                - गोपाळ ( संतति नाहीं.)
          - त्रिंबक
            - नारोपंत
              - केशव (संतति नाहीं)
              - वासुदेव
                - श्रीपत
                  - आत्माराम
                    - विष्णु (मृत्यु) इ.स.१९१२
                      - माधव*
                      - रामचंद्र*
                      - लक्ष्मण*
                      - कृष्णा*
                    - वासुदेव (दत्तक)*
                    - नारायण*
                      - गोविंद*
                    - दामोदर*
                      - त्रिंबक*
                      - नरहरी*
                      - प्रल्हाद*
              - त्रिंबक
                - बाळकृष्ण
                  - वासुदेव ( दत्तक)*
                    - केशव*
                    - हरी*
- बापू

* असें चिन्ह जेथें आहे ते हयात आहेत असें समजावें.

# प्रस्तावना.

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादि लक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

सांप्रतच्या सर्व सुधारणेच्या कालांत, सूक्ष्म दृष्टया, अवलोकन केलें असतां, असें अनुमान बांधतां येईल कीं, भौतिक ज्ञानाच्या वाढीबरोबर पारलौकिक ज्ञानाचीहि वाढ होत चालली आहे. मात्र ज्या गतीप्रमाणें भौतिक ज्ञानाकडे जन समाजवृत्ति वळल्या आहेत त्या गतीप्रमाणें पारलौकिक ज्ञानाच्या वाढीचा वेग नाहीं. ह्याचें कारण प्रत्यक्ष आणि अपरोक्ष फल प्राप्ति होणें हेंच आहे. भौतिक ज्ञान अहंभाव वाढवितें, तर पारलौकिक ज्ञान तद्विरहितत्त्व वृद्धिंगत करतें; भौतिक ज्ञान प्रारंभीं सुखमयी होऊन परिणामीं दुःखदायी होतें, तर पारलौकिक ज्ञान प्रारंभीं दुःखमयी असून परिणामीं सुखदायी होतें; भौतिक ज्ञान नाशवंत अज्ञानमय--वस्तु भ्रमाबरोबर नष्ट होतें, तर पारलौकिक ज्ञान चिरकाल टिकून अखंडानंद साम्राज्य स्वस्वरूपीं लीन करून तद्रूपत्व प्राप्त करून देतें. ह्या त्या त्या ज्ञानाचा गुणदोष समजण्यास, ज्ञानाचा प्रसार अत्यंतिक होऊन निवडानिवड करण्याची चिकित्सा बुद्धि सर्व अबाल वृद्ध

जन समाजांत प्रविष्ट झाली पाहिजे. त्याप्रमाणेंच सांप्रतचा ज्ञान प्रसार ओघ अप्रतिहत सर्वत्र सुरू आहे. अर्थात् अक्षय सुख प्राप्त करून देणाऱ्या सत्य ज्ञानाकडे समाजकल होण्याचा प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आपणच सर्व साध्य करावें आणि त्याप्रमाणेंच काल ओघ चालला आहे असें बाह्यतः अनुमान दिसतें खरें, परंतु सूक्ष्मावलोकन केलें असतां असें परिचयास येईल कीं, अमोघ जी ईश शक्ति तीहि अनुकूल होऊन आपल्या गतीचा प्रादुर्भाव अल्पतः तरी करीतच आहे आणि ह्याच योगानें भौतिक ज्ञानाचा प्रसार होतोसा दिसत आहे. आपल्या भूमिकेस अनेक वेळां अनेक सुख दुःखात्मक प्रसंग भोगावे लागले आहेत. धर्म ग्लानि आणि धर्मोज्वल्य हीं वारंवार अनुभवितां येत असल्यामुळें त्यांचा आगमन काल चतुर जीवांस सहज लक्षांत येतो. धर्म ग्लानीच्या प्रसंगीं मागील तशाच कालाचें उदाहरण जर जन समाजापुढें येईल, तर त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवून, पारलौकिक ज्ञान संपादन करावें अशी स्थिर बुद्धि चतुर पुरुषांस अवश्यमेव होईलच होईल. हाच आशय धरून सर्व भरतखंडभर चैतन्य सांप्रदायाची द्वाही फिरवून समाजचा समाज श्रीचरणीं भक्ति मार्गास लावणाऱ्या '**श्रीमद्राघव चैतन्य**' आणि '**श्रीमत्केशव चैतन्य उर्फ बाबा चैतन्य**' ह्या उभयतां गुरु शिष्यांचें अल्प चारित्र आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत

हें चरित्र ' काव्यसंग्रह ' मासिक पुस्तकांत पूर्वीच छापून प्रसिद्ध झालें होतें. परंतु आम्हांस मिळालेल्या अत्यंत जुन्या प्रतींत आणि ह्या प्रतींत, लहा। मोठे बरेच विरोध असल्यामुळें, तें तपासून ही आवृत्ति काढीत आहोंत. ह्या सत्कृत्यास लोक समाजाचा उदार आश्रय मिळेल अशी पक्की उमेद आहे.

श्रीपांडुरंगाची प्रेम लक्षणा भक्ति, ज्या सर्वमान्य संत शिरोमणि श्रीतुकाराम महाराजाच्या रसाळ वाणीनें आणि निःस्सीम भक्तीनें सर्व भरतखंडभर पसरली आणि ज्याच्या वाणीची अभंगरूप प्रतिकृति सर्व अबाल वृद्ध स्त्रीपुरुष समाजाच्या तोंडीं आहे, त्या महात्म्या तुकाराम बोवांचे गुरू आणि पितामह गुरू, ह्यांचें चरित्र आणि बोध, हें किती मौल्यवान आणि उपयुक्त असतील ह्यांचा वाचकांनींच विचार करावा ! थोडक्यांत महती वर्णन करणें म्हणजे एवढेंच पुरें होईल कीं, श्रीमत् केशवचैतन्य उर्फ बाबा चैतन्य ह्यांनीं शके १४९३ म्हणजे इ० स० १५७१ च्या वैशाख वद्य १२ रोजीं, गुरुवारीं प्रजापती नाम संवत्सरीं, समाधि घेतली असतां पुढें साठ वर्षांनीं म्हणजे शके १५५३ माघ शुद्ध दशमीं, रोज गुरुवारीं, श्रीमत् तुकाराम बोवास उपदेश देऊन त्याजकडून श्रीपांडुरंग भक्तीचा, भरतखंडभर पसार करवून अद्याप पर्यंत संपूर्ण भक्त जन समाज त्याच साधनामुळें तरविला जात आहे !

तुकाराम बोवाचा प्रिय शिष्य, महिपती ह्यानें आपल्या रसाळ आणि प्रासादिक वार्णानें, ह्या गोष्टीचा उत्तम प्रकारें उल्लेख केला आहे. त्याची वाणीच वाचकांची खातरी करील

॥ अभंग ॥

अनाथाचा नाथ कृपाळू उदार ॥ विश्वीं विश्वंभर पांडुरंग ॥ धृ० ॥
भक्ति प्रेमयुक्त भक्त तो निस्सीम ॥ धन्य तुकाराम कलियुगीं ॥

पुढें, ओंवी ३६ वरील टीपांत पहा. पृष्ठ ७८-७९-८०

ह्या महिपतीच्या वर्णनावरून प्रत्येक भक्तजनाची खात्री होईल कीं, तुकारामबोवाच्या ठायीं जीं अत्यंतिक अपरिमेय पांडुरंग भक्ति जडली, ती केवळ श्रीमत् केशवचैतन्य उर्फ बाबाचैतन्य यांच्याच कृपेनें होय. ह्याच महिपतीनें आपल्या 'भक्तिलीलामृतां' तहि ओंवी छंदानें तुकारामावर सद्‌गुरु कृपा झाल्याचें वर्णन केलें आहे. तें जरी अल्प विरोधात्मक आहे तरी त्यांतील तत्त्वार्थ हाच आहे. महिपती आपल्या 'भक्तिलीलामृत' ग्रंथांत असें म्हणतोः—

॥ ओंवी ॥

जागृत अवस्थे येऊन देखा ॥ चित्तीं पस्तावे वैष्णव तुका ॥
म्हणे, 'मज भेटूनि सद्गुरूसखा ॥ भवसागर देखा उतरीला ॥
भोजनासि तूप पावशेर ॥ निजमुखें मागती साचार ॥
घरीं कलह वाढला थोर ॥ यास्तव सत्वर देव गेले ॥
केशवचैतन्य राघवचैतन्य ॥ बाबाजी आपुलें सांगितलें नामाभिधान॥
'राम कृष्ण हरी' मंत्र जाण ॥ मजकारणें सांगितला ॥

माघ शुद्ध दशमी साचार ॥ सुदिन पाहोनि गुरुवार ॥
माझा करून अंगिकार ॥ गेले सत्वर सद्‌गुरू ॥

भक्तली० अ० ३३, १७१-१७५.

महिपतीनें हा प्रसंग निश्चयात्मक कोणत्या गांवीं घडला हें यांत स्पष्ट केलें नाहीं. परंतु त्याच्या मागील वर्णनावरून असें अनुमान होतें कीं, तुकारामाचा वडील मुलगा महादेव ह्यास प्रत्यक्ष पांडुरंगानीं मुतखड्याच्या आजारांतून दुरुस्त केल्यावर, तुकारामानें हें जाणून पांडुरंगाची अत्यंत करुणा रसानें उतराईपूर्वक स्तुति केली. त्यायोगें पांडुरंग प्रसन्न होऊन तुकारामास सद्‌गुरू कर म्हणून सांगून केशवचैतन्यासच शरण जा म्हणून बोलले. तो प्रकार महिपतीनें अभंग छंदांत वर्णिलेला वर दिलाच आहे.

ह्या गोष्टीविषयीं स्वतः तुकाराम महाराज काय म्हणतात तें वाचलें म्हणजे वाचकांची पक्की खातरी होईल कीं, हेच श्रीमत्केशवचैतन्य उर्फ बाबाजी महाराज त्यांचे गुरू होत.

॥ अभंग ॥

सद्‌गुरुरायें कृपा मज केली ॥ परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना ॥ मस्तकीं तो जणा ठेविला कर ॥
भोजना मागती तूप पावशेर ॥ पडिला विसर स्वप्नामाजीं ॥
कांहीं कळे उपजला अंतराय ॥ म्हणोनियां काय त्वरा जाली ॥
'राघवचैतन्य केशवचैतन्य ' ॥ सांगितली खूण माळिकेची ॥

बाबाजी आपलें सांगितलें नाम ॥ मंत्र दिला 'रामकृष्ण हरी' ॥
माघशुद्ध दशमी पाहूनि गुरुवार ॥ केला अंगिकार तुका म्हणे ॥ १ ॥
३८७२ तु. गा. निर्णयसागर.

तात्पर्यार्थ पाहतां वारकरी अथवा इतर भक्तजनांच्या समुदायांत ज्याच्या प्रेमळ अभंगवाणीनें, अबालवृद्ध स्त्री पुरुष समाजचे समाज तल्लीन होऊन श्रीविठ्ठलचरणीं लीन होतात, ज्याच्या पवित्र नामावरच टाळ, विणा आणि मृदंग नादानें तल्लीन होऊन प्रेमनिरतिशयानें प्रहरोप्रहर नाचून गावून श्रीविठ्ठलरूपीं तादात्म्य साधतात; त्या महात्म्या तुकाराम महाराजांच्या सद्गुरूची योग्यता वर्णन करण्यास आम्हीं पामर अज्ञ आहोंत. त्या श्री सद्गुरू केशवचैतन्य महाराजांनीं, संपूर्ण महाराष्ट्रांत केवळ अव्यभिचारित प्रेमलक्षणा भक्तीचें अखूट जीवन, आपल्या तुकाराम प्रियशिष्या-कडून असें सखोल भरवून दिलें आहे कीं, त्याचा कधींच नाश होणार नाहीं. त्या श्रीसद्गुरू महात्म्यानें, आपल्या प्रियशिष्य तुकारामाच्या द्वारें, आपल्या चैतन्य सांप्रदायाची जग मध्यें अशी महति स्थापित केली आहे कीं, त्या मार्गानें जाणाऱ्या मानवांस, निराकार निर्गुण असा परमात्मा श्री पांडुरंग रूपानें भेट देऊन, मुक्ति दिल्याशिवाय राहणारच नाहीं; ज्या श्री सद्गुरू महात्म्यानें, आपण समाधिस्थ झाल्यावर साठ वर्षांनीं उपदेश देऊन तुकारामास सदेह वैकुंठास जाण्यायोग्य केलें, त्या अति थोर, दयाघन आणि भक्तिकामकल्पद्रुम, महात्म्या परम गुरू श्रीमत् केशवचैतन्य

महाराजांची योग्यता वर्णन करण्यास आम्ही केवळ अज्ञान आहोंत. केवळ श्री तुकाराम महाराजासच उपदेश झाला आणि आतां कां होत नाहीं, हा प्रश्नच येथें नाहीं. तुकारामा नंतर यादवबाबा रामदासी, ह्यास पूर्ण कसास लावून, मग उपदेश देऊन पावन केलें! छलक बुद्धीनें आलेला जुन्नरचा सुभा बिबीसाहेब यवन ह्याची त्रेधा उडवून त्यास जगाआड केला! आपल्या समाधींतूनच पूर्वाश्रमीच्या आपल्या नातवास सांग वेदशास्त्र सपन्न केलें! एवढेंच नाहीं तरी, सांप्रतसुद्धां जे कोणी त्या योग्यतेचे असतील त्यांजवरहि अनुग्रह होतो. अशा परमयोगिराजाचें चरित्र, केवळ अल्प शब्दांत गद्यरूपानें दिलें तर, वाचकवृंद तल्लीन होऊन जाईल, असें जाणून तें पुढें देत आहोंत:—

शके १४४२ म्हणजे इ. स. १५२० ह्या सुमारास तिनेवल्ली येथें शिवगंगा नांवाचें एक सरोवर होतें. त्याच्या आग्नेय कोनास त्रिंबकेश्वर या नांवाचें एक मोठें शिवालय होतें. तेथें ब्राह्मण लोक नित्यशः धुमधडाक्यानें पूजन करीत असत. नुकताच हा प्रांत विजयानगरच्या महाराजापासून गोवळकोंड्याचें नवीन स्थापित झालेल्या कुतुबशाहा बादशाहाच्या सुभेदारानें घेतल्यामुळें त्यास त्या देवतेचा नाश करण्याची बुद्धि उत्पन्न झाली आणि तेथें घुमट बांधण्याची तो तजवीच करूं लागला. ह्या सुभेदारानें ब्राह्मण स्त्रियांचा आणि ब्राह्मणांचा अत्यंत छळ केला व सर्व

ब्राह्मणांस त्यानें तेथून घालवून दिलें, इतकेंच नव्हे तर मंदीर खोदण्यासहि सुरवात केली, तों आंतून रक्ताचा पूर वाहूं लागल्यामुळें तो यवन सुभेदार,भयभीत होत्साता सर्व ब्राह्मणांला सन्मानानें परत बोलावून आणून त्यांचीं वतनें त्यांस परत दिलीं आणि देवालयाचें उत्पन्न देवालयाला दिलें. त्या गर्दींत नरसिंह भट या नांवाचा एक विद्वान आणि तपोनिष्ठ ब्राह्मण आपली स्त्री आनंदीबाई व एक वर्षाचा लहान मुलगा, त्रिंबक यांस घेऊन जो निघाला तो तेथेंच उत्तरेस चवदा पंधरा कोसांवर असलेल्या नारायणगिरी पर्वतावर दुर्धट तपश्चर्या करून श्रीशंकराकडून वर प्राप्त करून घेता झाला. तो परत आपल्या गांवीं न जातां उत्तरेकडे तीर्थें करीत करीत सांपत ज्यास पुणें शहर म्हणतात, त्या पुणेंवाडींत येऊन राहिला. तेथें आल्यावर म्हणजे १४४६ च्या सुमारास ' विश्वनाथ बाबा ' या नांवाचा त्यांना दुसरा पुत्र वरप्रदानाप्रमाणें झाला. आणखीहि त्यास ' बापु ' या नांवाचा तिसरा पुत्र झाला. पुढें त्रिवर्ग पुत्रांची लग्न कार्यें करून नृसिंह भट कैलासवासी झाले. विश्वनाथ बाबाचा स्वभाव भोळसर व सत्वशील होता; बंधूनीं तंटा करून त्या उभयतां स्त्रीपुरुषास घराबाहेर घालविलें म्हणून 'तेथून निघून ते उत्तरेस जुन्नराजवळील ' ओतूरास मांडवी पुष्पावती ' च्या तीरीं येऊन राहिले. त्यांच्या गिरजाबाई स्त्रीनें अत्यंत निर्भत्सना केल्यावरून, ते शरीराचा कंटाळा मानून मांडवी पुष्पावतीचे कांठच्या अरण्यांत

आक्रोश करूं लागले. तेथें श्रीमत् राघवचैतन्य या नांवाचे साक्षात् श्रीमद्वेदव्यास-शिष्य गुप्तरूपानें राहत असत. त्यांनीं विश्वनाथ बाबाचें समाधान करून त्यास आपला म्हणविलें. ' पुत्र-संतती झाल्याशिवाय स्त्रीऋण फिटत नाहीं आणि संन्यासहि घेतां येत नाहीं;' असें स्वामीनीं सांगितल्यावरून विश्वनाथ बाबानीं ओतूरासच राहून स्वामींच्या सहवासांत नित्यशः येण्याचा क्रम ठेविला. स्वामींच्या कृपा आशिर्वादानें त्यास 'नृसिंह' या नांवाचा मुलगा झाला. तो तेरा दिवसांचा होतांच विश्वनाथ बाबानीं स्वामींचा अनुग्रह घेऊन संन्याशाश्रम धारण केला. स्वामीनीं त्याचें नांव ' केशवचैतन्य ' असें ठेविलें. यावरून विश्वनाथ बाबाची विरक्तता पूर्ण दृष्टोत्पत्तीस येतें. स्वामीबरोबर उत्तर खंडांतील सर्व तीर्थ यात्रा करून हीं उभयतां ' राघव, केशवचैतन्य ' जोडी बारा वर्षांनीं कलबुर्ग्यास आलीं. तेथें मशीद उडविण्याचा चमत्कार करून ' आळंद गुंजोटीस ' येऊन राहिले. शके १४८८ मध्यें म्हणजे आळंद गुंजोटीस तीन वर्षे राहिल्यानंतर श्रीराघवचैतन्यानीं तेथेंच समाधि घेतली. श्री. केशवचैतन्य महाराज तेथून तीन कोस असलेल्या ' मान्यहाळ ' गांवीं आणखी तीन वर्षेंपर्यंत राहून, गुरूनीं प्रत्यक्ष होऊन आज्ञा केल्यामुळें परत ओतूरास आले. त्या वेळीं त्यांचा पूर्वाश्रमीचा पुत्र मरून जाऊन त्याची पत्नि 'लक्ष्मी ' बाळंत होऊन आठ दिवस झाले होते. स्वामीनीं त्याचें संगोपन

करणें आपलेकडे घेतलें. परंतु जन समाजाकडून अत्यंत उपद्रव होऊं लागल्यामुळें स्वामीनीं दोन वर्षांनीं म्हणजे शके १४९३ वैशाख शु० द्वादशी रोज गुरुवार म्हणजे इ. स. १५७१ रोजीं समाधि घेतली. समाधींत असतांनाच पूर्वाश्रमीचा नातू ' केशव ' याचें पोषण आणि शिक्षण स्वामीनीं केलें. पुढें जुन्नरच्या सुभेदाराकडून उपाधी झाल्यामुळें स्वामीनीं तोहि प्रकार सोडून दिला. समाधि घेतल्यापासून तीस वर्षांनीं ( शके १५२३ ) भक्तश्रेष्ठ तुकाराम बोवास उपदेश झाला म्हणून महिपती लिहितो; परंतु हें म्हणणें बरोबर संभवत नाहीं. कारण श्री. तुकारामबोवाचा जन्मच शके १५३० सालीं झाला आहे. तेव्हां हें म्हणणें असंभवनीय दिसतें. कदाचित् लेखकाची चूक असेल. एकंदर परिस्थितीवरून असें अनुमान निघतें कीं, 'केशवचैतन्य उर्फ बाबाजी' महाराजानीं समाधि घेतल्यानंतर ६० वर्षांनीं ( शके १५५३ ) श्री. तुकारामबोवास दर्शन देऊन उपदेश दिला. आणि त्याच्याकडून संपूर्ण महाराष्ट्रभर श्रीविठ्ठलाची पूर्णपणें अमोघ प्रेमलक्षणा भक्ति स्थापित करवली. पुढें यादव बाबा रामदासासही पावन केलें. एवढेंच नाहीं परंतु सांप्रतकालीं सुद्धां जे जे भक्तजन निर्मल भावानें, प्रेमळ भक्तीनें व एकनिष्ठ अंतःकरणानें येतील त्यांच्याहि इच्छा पूर्ण होतात.

विश्वनाथ बाबास, श्रीराघव चैतन्याच्या प्रसादानें, सविसावें

वर्षी नृसिंहभट पुत्र झाला आणि त्या पुत्राचे १२ वे दिवशीं, विश्वनाथ भटास श्रीराघव चैतन्यानीं उपदेश व संन्यास दिला व केशवचैतन्य हें नांव ठेविलें. ( वयाचे २६ वें वर्षी ) साधारण मानानें पाहतां, राघवचैतन्य गुरूबरोबर केशवचैतन्य हे बारा वर्षेपर्यंत तीर्थाटण करून कलबुर्ग्यास आले. त्यावेळीं केशवचैतन्य ३८ वर्षांचें असावत. तेथें मशीदीचा चमत्कार करून आळंद गुंजोटीस गेले. तेथें ६ वर्षें म्हणजे तीन वर्षें आळंद गुंजोटींमध्यें गुरुबरोबर आणि गुरु समाधिस्थ झाल्यावर ३ वर्षें मान्यहाळमध्यें राहून नंतर तीर्थयात्रा करीत ४५ वें वर्षी केशवचैतन्य हे ओतूरास परत आले असावेत तेथें नातू केशव जन्मून आठ दिवस झाले होते. त्या नातवाचें पालन पोषण व त्याचें मौंजीबंधन पांचवें वर्षी म्हणजे शके १४९८ वें वर्षी करून स्वतः समाधींतून वेदाध्ययन सांगूं लागले. त्या मुलाचें लग्न १४ वें वर्षी म्हणजे शके १५०७ ह्या सालीं झालें. शके १५१० च्या सुमारास जुन्नरचा निजामशाही सुभा बिबिसाहेब ह्यानें होनाकरितां समाधीचा छल करून आपण मृत्यु पावला केशवचैतन्य शके १४९३ म्हणजे इ. स. १५७१ ह्या वर्षी समाधिस्थ झाले. ( इ. स. १५८८ ह्या वर्षी बिबिसाहेब सुभा होता. अहमदनगरच्या बादशाहातीवर ह्यावेळीं मूर्तिजा निजामशाहा राज्य करीत होता. ) म्हणजे समाधिस्थ झाल्यावर सतरा वर्षांनीं हा उत्पात होऊन, पुढें चैतन्य

महाराजानीं समाधींतून व्यवहार करणें बंद केलें. मान्यहाळांतून आल्यावर सर्व जनांची अत्यंत उपाधि लागूं लागल्यामुळें, नातू केशव दोन वर्षांचा असतांच स्वामींनीं समाधि घेतली असें दिसतें. अर्थात् समाधीच्या वेळीं स्वामींचें वय ४७ वर्षांचें असावें म्हणजे शके १४४६ ( इ. स. १५२४ ) मध्यें श्रीमत् केशवचैतन्याचा जन्म, पुणेवाडीस ( पुणे ) येथें झाला असावा.

'श्रीमद्राघव चैतन्य' महाराज ह्यांच्या कालाविषयीं अनुमान बांधतां येण्यासारखें आहे. ह्या समर्थ माहात्म्याविषयीं इतकेंच लिहिलेलें आढळतें कीं, 'तंव राघव नामें द्विजसत्तम ॥ जो उत्तमामाजीं उत्तम ॥ अनुष्ठता अति निस्सीम ॥ व्रतालागीं आचरे॥२४॥ उत्तम नाम नगरीं ॥ मांडवी पुष्पावतीच्या तीरीं ॥ राहुनियां बहुकाळ वरी ॥ तप आचरतां जाहला ॥२५॥' अ. १ला. ह्या महात्म्याचें जन्मठिकाण कोणतें होतें आणि हें कोण शाखी ब्राह्मण होते, ह्याचा अद्याप पुरा तपास लागत नाहीं ! परंतु एवढें खास दिसतें कीं, ते वेद वेदांग पूर्ण जाणते असून अनुष्ठान करण्यामध्यें अत्यंत कसलेले होते. त्यांना प्रत्यक्ष ' श्रीमद्वेदव्यासा ' कडून आत्मज्ञान मिळावें अशी पूर्ण इच्छा होती. एवढेंच नाहीं तर तितकी कष्टतर तपश्चर्या करण्याचें ज्ञान, सामर्थ्य आणि साधन ज्ञात होतें. बहुशः ते ब्रह्मचर्यवृती असावेत. ह्या गोष्टीवरून अनुमान काढतां, जर त्यांच्या आठव्या वर्षीं मौंजीबंधन काल धरिला तर, त्यांनीं पूर्ण

बारा वर्षेपर्यंत ( २० वर्षांपर्यंत ) गुरुगृहीं अध्ययन केलें असलें पाहिजे. नंतर पुरश्चरणादि दुसरे वेदिक तप प्रकार दुसरीं बारा वर्षे पर्यंत (३२ वर्षेपर्यंत) केले असावेत नंतर श्रीमद्वेदव्यास च्या दर्शनाशिवाय खरें ज्ञानमर्म साध्य होणार नाहीं, हा त्यांचा पक्का समज होऊन त्याप्रमाणें. त्यांनीं श्रीमद्वेदव्यास दर्शनाकरितां, तपश्चर्या केली असावी. त्या तपश्चर्येची अखेर स्थिति कशी झाली ती पहा:—
॥ 'व्हावें व्यासाचें दर्शन ॥ हेचि इच्छा धरूनि पूर्ण ॥ वातांबु पर्णाशन ॥ करूनि देह शुष्क केला ॥ २६ ॥ जाहल्या नखांच्या चुंबळी ॥ आंगावरी वाढली धुळी ॥ जटा लोंबती भूतळीं ॥ देह शुष्क जाहला ' ॥ २७ ॥ अ० १ ला. ह्याप्रमाणें स्थिति होण्यास आणखी एक बारा वर्षांचा काल ( ४४ वर्षांपर्यंत ) सहज लागला असावा, असें मानण्यास बिलकुल हरकत दिसत नाहीं. पुढें श्रीमद्वेदव्यासानुग्रह झाल्यावर, निरनिराळ्या योगासन स्थितीमध्यें, अभ्यास करतां करतां, ' विश्वनाथ बाबाची' भेट होण्यापूर्वीं निदान सहा वर्षे ( ५० वर्षे ) तरी गेलीं असावीत. पुढें श्रीकेशवचैतन्यास घेऊन राघवचैतन्यानीं बारा वर्षेपर्यंत ( ६२ वर्षेपर्यंत ) तीर्थ यात्रा करून कलबुर्ग्यास मशिदीचा चमत्कार करून 'आळंद गुंजोटी'स राहिले असावेत. तेथें तीन वर्षे ( ६५ वर्षेपर्यंत ) वास करून, बादशाहास दिलेलें वचन पुरें करण्याकरितां समाधि घेतली असावी. हें अनुमान खरें धरलें

तर समाधिकाळीं, श्रीमद्राघवचैतन्य महाराजांचें वय सुमारें पासष्ट वर्षांचें असावें. पुढें पांचच वर्षांनीं श्री० केशवचैतन्य महाराजानीं ओतूर येथें समाधि घेतली आहे. ह्मणून त्यांच्या समाधि शकांत जर पांच वर्षे वजा केलीं तर श्री राघवचैतन्य ह्यांचा आळंद गुंजोटी येथें समाधि शक (१४९३-५)=१४८८ ह्मणजे इ. स. १५६६ हा येतो. अर्थात् ह्या शकांत ६५ वर्षे कमी केली ह्मणजे त्यांचा जन्म, शके (१४८८–६५)=१४२३ ह्मणजे इ स. १५०१ ह्या वर्षी झाला असावा. आणि त्यांचें जन्मस्थान ओतूर अथवा तेथेंच लगत कोठें तरी असावें व ते ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असावेत असें दिसतें.

मूळचा चैतन्यविजय नांवाचा ग्रंथ परम भगवद्भक्त 'कृष्णदास' महाराज वैरागी, ह्यानीं शके १५९६ त केला. हे साधू जुन्नरासच असत. ह्यांच्या रसभरित कविता, पदरूपानें अद्यापि महाराष्ट्रीय कीर्तनकारांच्या तोंडून ऐकावयास मिळतात. हे अत्यंत प्रेमळ असून, तात्विक दृष्टीनें कविता करून भक्तिमार्ग वाढवीत असत. ह्यांच्या कविता प्रासादिक असत. त्यांना श्री. तुकाराम, रामदास आणि वामन पंडित वगैरे सत्पुरुषांचा दर्शन योग होता. तो काल महाराष्ट्राचें नष्टचर्य संपून त्याचा भाग्यरवी उदयास येण्याचा असल्यामुळें, छत्रपती 'शिवराया' नीं आपल्या अतुल पराक्रमांनीं हिंदुपद पादशाईचा मुहूर्त खांब रोंविला होता. ईश्वर भक्ति,

सत्य ज्ञान आणि अतुल शौर्य महाराष्ट्रांत त्या काळीं संचरत होतें. अत्यंत अधिकारसंपन्न आणि प्रत्यक्ष अनुभवी अशा कृष्णदास महात्म्यानें केलेला चैतन्यविजय ग्रंथ जर मिळतां तर चैतन्याची विशेष माहिती खास मिळती ? परंतु महाराष्ट्राच्या दुर्दैवानें तें चैतन्य चरित्र कोठें गहाळ झालें आहे ! जर वाचकांपैकीं कोणी प्रयत्न करील आणि चैतन्याचीच जर इच्छा होईल तर तोही ग्रंथ मिळेल.

आम्हीं छापीत आहों हा चैतन्यविजय ग्रंथ, कृष्णदासाच्या चैतन्यविजय कालानंतर ११३ वर्षांनीं म्हणजे शके १७०९ ह्या वर्षीं ह. भ. प. ‘ निरंजन बाबा नाशिककर ’ ह्यानीं केलेला आहे. ह्यांनीं कृष्णदासाच्या चैतन्यविजयाधारेंच हा ग्रंथ केलेला आहे. तो किती रसाळ आणि प्रासादिक आहे हें भाविकांनीं वाचल्यावरच त्यांस समजणार आहे. जसा चैतन्य महाराजानीं श्री० तुकारामाचें अंतःकरणांत ‘ श्री पांडुरंग भक्तीचें चैतन्य ’ भरवून देऊन, सर्व महाराष्ट्राचा उद्धार करून चैतन्य सांप्रदायच स्थापिला, त्याचप्रमाणें ह्या चैतन्य चरित्र वाचनानें, सुप्त झालेली ईश्वरभक्ति पुनरपि चेतना पावेल यांत संशय नाहीं.

हें चरित्र करणार पूर्ण भगवद्भक्त होते. ते महायोगी ‘ रघुनाथ स्वामी ’ यांचे शिष्य असून त्यास श्रीदत्त महाराजाचें ‘ गिरनार ’ पर्वतावर, दर्शन झालें होतें. ह्यानीं भक्ति, ज्ञान आणि वैराग्यपर

कविता केल्या आहेत. हिंदुस्थानी भाषेंनहि ह्यानीं पुष्कळच पदें दोहरे केलेले आहेत. अर्थात् योग्य अधिकाऱ्यानीं केल्यामुळें तें विशेष प्रेमळ झालें आहे.

कोणी म्हणेल कीं, ज्यांच्या श्री० तुकाराम शिष्याची थोरवी अखंड महाराष्ट्रांत झाली असतां आजपर्यंत ते कां प्रसिद्धीस आले नाहींत? तर ही शंकाच अविचार मूलक आहे! कारण श्री० तुकाराम महाराजाचें इतिवृत्त ज्यास अवगत आहे त्यांस चैतन्य प्रताप अवगत आहेतच. भक्तश्रेष्ठ तुकारामाचें नांव जावत्काल-पर्यंत भक्तिभावानें गाइलें जातें, तावत्कालपर्यंत त्यांत चैतन्य प्रभाव आहेतच आहेत. खुद्द चैतन्य महाराजानीं जिवंत समाधि घेऊन, समाधींतूनच भक्तियोग वाढवून चैतन्य सांप्रदाय स्थापविला. अर्थात् शिष्य कीर्तिच त्यांस प्रिय असे. त्यामुळें त्यानीं स्वतःस पुढें आणविलें नाहीं. बादशाहाकडून व निरनिराळ्या राजांकडून ताम्रपट व सनदा त्यांस मिळाल्या आहेत त्यांहि नातवाच्या नांवावरच त्यांनीं स्वीकारल्या आहेत.

दुसरी गोष्ट, स्वतः श्रीतुकाराम महाराजाशिवाय त्यांचे उल्लेख कोणीहि विशेष रितीनें केला नसल्यामुळें आणि ते समाधिस्थ असल्यामुळें. विशेष रितीनें प्रसिद्ध झाले नाहींत.

तिसरी गोष्ट, त्यांचें लिहिलेलें चरित्र बाजूस पडून राहिल्या-

मुळें कोणाचीहि नजर त्यावर नव्हती. फक्त ‘काव्येतिहास’ ग्रंथ-कारांनीं त्याचा आपल्या मासिकांत उद्धार केला. ह्या योगानें जशी प्रसिद्धी व्हावी तशी जरी झाली नाहीं, तरी तें नष्ट होण्याची भीति राहिली नाहीं.

सांप्रत समाधि दर्शना करितां, भाविक जनांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्यामुळें आणि समाधीच्या शिखराची व जागेची नादु-रुस्ती झाल्यामुळें, तिचा जीर्णोद्धार व यात्रेकरूंस बसण्यास जागा तयार करण्याची अत्यंत अवश्यकता दिसल्यावरून, तो खर्चहि भागावा आणि महाराष्ट्रांत सर्वत्र चैतन्यमहाराजांची पुनःस्मृति व्हावी व त्यांनीं ह्या चरित्र वाचनानें, आपलें अखंड कल्याण करून घ्यावें म्हणून आम्हीं हें चरित्र छापलें आहे. वाचकांच्या माहिती-करितां नृसिंहभट यांचा वंश वृक्षहि ग्रंथाच्या आरंभीं जोडला आहे. ज्या सद्भक्तांस समाधि जीर्णोद्धाराच्या सत्कार्याच्या कामीं स्वयं स्फूर्तीनें ग्रंथास ग्राहक होऊन शक्त्यनुसार मदत करण्याची इच्छा होईल ती त्यांनीं खालील पत्त्यावर पाठविण्याची मेहरबानी करावी. छपाई वगैरे खर्च वजा जातां सर्व उत्पन्नाचा हिशोब योग्य वेळीं वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध करण्यांत येईल.

शेवटीं, उभय चैतन्य सांप्रदाय संस्थापकांच्या चरणीं ही प्रति-कृति अर्पण करून ह्या ग्रंथांत भाषित केल्याप्रमाणें तेच उभय परम

हंस भक्तश्रेष्ठ वाचकांच्या इच्छा पूर्ण करोत व ग्रंथास महती देवोत हें मागणें मागून ही प्रस्तावना संपवितो.

तारीख २४-८-१३
श्रावण वद्य ८
शके १८३५

आपला श्रीचरण तत्परदास
**ह. भ. प. सितारामबोवा निंबगांवकर.**
श्रीमद्यशवंतराव देवमामलेदार यांचे शिष्य.

श्रीसद्गुरु ह. भ. प. सितारामबोवा निंबगांवकर यांनीं घेतलेल्या परिश्रमाबद्दल, व ज्या स्वयंसेवकांनीं चरित्रास ग्राहक मिळवून मदत केली व यापुढें जे कोणी सद्भक्त ह्या सत्कार्यास मदत करतील त्या सर्वांचा चैतन्य कार्यालयाच्या मंडळातर्फे मी फार आभारी आहे. व उभय चैतन्यस्वामीच उदार आश्रयदात्यांचे पूर्ण कल्याण करोत अशी मी प्रार्थना करतों.

पत्ताः—चैतन्य ऑफिस
पानसरे यांची चाळ चिंचपोकळी
मुंबई नंबर ११

**वासुदेव बाळकृष्ण राजर्षि.**
प्रकाशक.

# निरंजनस्वामीकृत चैतन्यविजय.

## अध्याय पहिला.

जयजया जी मंगलमूर्ति । त्रैलोक्यपावन जयाची कीर्ति । देवासुरमानव वर्णिती । विघ्नसमाप्ती व्हावया. ॥ १ ॥ परमात्मा जो प्रकृतिपर । तो विनायकरूपें धरी अवतार । तयाचें नाम विघ्नहर । देव यास्तव ठेविती. ॥ २ ॥ ब्रह्मयानें सिंदुरासुरासी । वर दिधला अविनाशी । तू आलिंगन देशील जयासी । तो नाशासि पावेल पैं. ॥ ३ ॥ ऐसें होतांचि वरदान । तेणें ब्रह्मयावरि केलें प्रस्थान । पुढें ब्रह्मा मागें आपण । सिंदुरासुर लागला. ॥ ४ ॥ तेव्हां संपूर्ण देवें तुज प्रार्थिलें । सिंदुरासुरासि वधावया वहिलें । गजाननरूप धारण केलें । पार्वतीचे उदरासी. ॥ ५ ॥ चतुर्भुज-

---

१. प्रकृतीहून पर म्ह० निराळा, किंवा श्रेष्ठ. प्रकृतीलाच 'योगमाया' म्हणतात. 'चिदानंदमयब्रह्मप्रतिबिंबसमन्विता । तमोरजःसत्वगुणा प्रकृतिः' हिचे माया व अविद्या असे दोन प्रकार आहेत. सांख्य शास्त्रांत प्रकृति व पुरुष हे शब्द प्रधान आहेत. प्रकृति आणि पुरुष यांच्या संयोगापासून सकल जडसृष्टीची उत्पत्ति आहे. 'कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते' (भगवद्गीता, १३, २०.) २. चाल, हल्ला. ३. सत्वर, लवकर.

व्यंक्ति गौरवर्ण । शुंडादंड लंबायमान । शूर्पाकृति शोभति कर्ण । भाळ विशाळ नेटकें. ॥ ६ ॥ नेत्र आरक्त जैसे हिरे । वक्र-तुंड अति साजिरें । मुगुटावरि खोंविले तुरे । दूर्वांकरांचे लसलसित. ॥ ७ ॥ एकदंत करीं झळाळा । मळां नवरत्नांच्या माळा । पीतांबर वेष्टिला पिंवळा । भाळीं कस्तूरीतिलक. ॥ ८ ॥ सर्वांगीं चर्चिला सेंदूर । कटीतटीं मेखळा फणीवर । रत्नखचित कटकें केयूर । रक्तांबर विलसतसे. ॥ ९ ॥ फरश पाशांकुश रदन । हस्तीं आयुधें शोभायमान । विशाळ दोंद मूषक वहन । गौरिनंदन शोभतसे. ॥ १० ॥ ऐसा गणपति देवें वंदिला । जेणें सिंदुरासुर वधिला । तो म्यां आरंभीं स्तवियेला । ग्रंथसिद्धि पावावया. ॥ ११ ॥ मूळमाया जे चिच्छक्ति । ती हे शारदा सरस्वती । हंसवाहन पुस्तक हातीं । वीणावादन करितसे. ॥ १२ ॥ चवदा विद्या चौसष्टि कळा । जियेचे ठायीं वसती सकळा । वागेश्वरी ब्रह्मबाळा । ग्रंथारंभीं वंदिलीं. ॥ १३ ॥ आतां वंदूं श्रीसद्गुरु । जो या

---

१. आकार, आकृति. 'व्यज्यतेऽनया इति व्यक्ति' २. सरस्वती ही ब्रह्मदेवाची पत्नी आहे. ब्रह्मदेवानें तिला आपल्या आंगापासून उत्पन्न केलें म्हणून लाक्षणिक अर्थानें कन्या असें म्हटलें आहे, असा मत्स्यपुराणांत (अ० ३, ४) खुलासा आहे.

भवसागरिंचा तोरुं । मोक्षदाता कल्पतरु । अति उदारु सर्वार्थी. ॥ १४ ॥ जनस्थान गोदातीरनिवासी । रघुनाथ नामें आनंदरासी । जेणें विज्ञान बोधोनि मजसीं । निरंजन नाम ठेवियेलें. ॥ १५ ॥ जो योगींद्रचक्रवर्ति । लोकत्रयीं जयाची कीर्ति । शांतिक्षमेची केवळ मूर्ति । लोकोद्धारा प्रगटली. ॥ १६ ॥ श्रीदत्तात्रयसाक्षात्कार । व्हावया मजसीं जयाचा वर । तयासी माझा नमस्कार । ग्रंथारंभीं असो हा. ॥ १७ ॥ आतां वंदूं

---

१. 'वारु' असा पाठभेद आहे, पण तें रूपक किती असंबद्ध होतें हें सांगणें नकोच. २. विशेष ज्ञान तें विज्ञान असा धात्वर्थ; 'मनानें मनच ज्ञानाचा विषय केला म्हणजे जो विचार होतो, तें विज्ञान—मन ज्ञानविषयीभूत होणें, हेंच विज्ञान......मन ज्ञानाला विषयभूत केल्यानंतर बरें वाईट समजतें आणि त्याची आवडनिवड करितां येते. यालाच विवेक अथवा विज्ञान अशी संज्ञा आहे. यालाच सदसद्विचारशक्ति असेंही नांव अलीकडे दिलेलें आहे......विज्ञानाचा व्याप मनुष्यसृष्टींत ज्ञानापेक्षांही अधिक आहे. शिष्टाचार, राजदंड, दंडनीति, गृहस्थिति यांचा पाया विज्ञान आहे......ज्यांत परब्रह्माचें स्वरूप आविर्भूत होत असतें. असो, विज्ञानमय कोश मनोमय कोशाच्या पलीकडचा आहे. तेणेंकरून सृष्टि विज्ञानमय आहे अशी प्रतीति होते......आल्हाद व क्लेश परावलंबी आहेत; त्यांच्या पलीकडचें सुखदुःख (आत्म्याचें) हें कांहीं निराळें आहे, आणि तें विज्ञानमय आहे.' (न्या० मू० रानडे यांची धर्मव्याख्यानें, विज्ञान.) ३ हा प्रत्यक्ष दर्शनाचा योग कवीनें 'साक्षात्कार' ग्रंथांत साकल्यानें वर्णिलेला आहे.

संत सज्जन । जे सच्चिदानंद स्वयें आपण । असोनि उद्धरिती जन । कृपानिधान दयाळू. ॥ १८ ॥ श्रीपरमात्मा जगद्गुरु । जगदाधिष्ठान परात्परु । तया करूनि नमस्कारू । ग्रंथारंभू करितसे. ॥ १९ ॥ जो ब्रह्मारूपें जगा अवतारी । विष्णुरूपें पाळन करी । रुद्ररूपें सकळ हारी । पुनरपि तें रचावया. ॥ २० ॥ श्रीविष्णु जो वैकुंठवासी । तो चतुःश्लोके ब्रह्मयासी । भागवतमिसें उपदेशी । आत्मतत्त्वालागीं पैं. ॥ २१ ॥ ब्रह्मयानें नारदा कथिलें । नारदें व्यासासीं बोधिलें । पुढें कलियुग प्राप्त जालें । तंव शिष्य न मिळे अधिकारी. ॥ २२ ॥ व्यास चिंतिती मानसीं, । 'जें

१. 'सर्व सजीव व निर्जीव सृष्टीचें कारण सत्,' म्हणजे जड द्रव्य आहे, 'चित्' म्हणजे आपलें मन व विज्ञान हेंच सृष्टीचें कारण आहे व 'आनंद' विश्वांत भरला आहे, विश्वाची रचना कल्याणकारक आहे म्हणून विश्वाचें 'कारण आनंदरूप ब्रह्मच आहे' या मानवी विचाराच्या तीन अवस्थांची 'सच्चिदानंद'. शब्दांत व्याप्ति आहे, असा न्या० मू० रानडे यांनीं अनुवाद केला आहे. ( रानडे, धार्मिक व्याख्यानें ३८३. ) २. श्रीधर कवीनें अशाच प्रकारें संतांचें महिमान वर्णिलें आहे. [वेदांतसूर्य, प्रक० १, ओ० ७२ ७९.] ३. जगताचें अधिष्ठान म्ह० आश्रयस्थान. ४. या चार श्लोकांचें वामनपंडितांनीं भाषांतर केलें आहे. [ वामनपंडित, स्फुटकाव्यें, भाग ३, ७१ पहा. ] एकनाथानेंही चतुःश्लोकी भागवताचें ओवीबद्ध भाषांतर केलें आहे. अधिकारी शिष्याचें वर्णन श्रीधरांनीं वेदांतसूर्यांत प्र. ५,१०१-१२७ मध्यें फारच मार्मिकपणानें केलें आहे तें पहावें.

सर्वसुखाची राशी । तें आत्मतत्त्व कोणासी । सांगू आतां या काळीं ?' ॥ २३ ॥ तंव राघव नामें द्विजसत्तम । जो उत्तमामाजी उत्तम । अनुष्ठाता अति निःसीम । व्रतालागीं आचारे ॥ २४ ॥ उत्तमनाम नगरी । मांडवी पुष्पावतीचे तीरीं । राहोनियां बहुकाळवरी । तप आचरता जाहला. ॥ २५ ॥ व्हावें व्यासांचें दर्शन । हेचि इच्छा धरुनी पूर्ण । वातांबु पर्णाशन । करुनि देह शुष्क केला. ॥ २६ ॥ जाल्या नखांच्या चुंबळी । आंगावरी वाढली धुळी । जटा लोंबती भूतळीं । देह शुष्क जाहला. ॥ २७॥ तंव सत्यवतीहृदयनंदन । श्रीव्यास येऊनि आपण । देऊनिया अभयदान । मस्तकीं हस्त ठेविला. ॥ २८ ॥ जो तत्त्वज्ञानाचा उपाय । 'नमो भगवते वासुदेवाय' । प्रणवयुक्त हा मंत्रराय । कर्णामाजीं सांगितला. ॥ २९ ॥ परमहंसदीक्षा देऊन । बोधितें जाले तत्त्वज्ञान । तेणें मूळ अविद्या निरसुन । परमानंद जाहला. ॥ ३० ॥ उठले अष्ट सात्त्विक भाव । चंचळ मनाची मोडली धांव । कल्पनेनें सांडिली हांव । ब्रह्मवस्तु अनुभवितां. ॥ ३१ ॥

---

१. हें पुणें जिल्ह्यांत जुन्नर तालुक्यांत जुन्नरापासून चार पांच कोसांवर 'ओतूर' या नांवानें प्रसिद्ध आहे. पुष्पावती ऊर्फ कुसुमावती ही भांबोरीच्या डोंगरांतून निघून ओतूराहून चार मैलांवर हिंवरेंबुद्रक येथें कुकडी नदीस मिळते. २. 'स्तम्भःस्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विकाः स्मृताः ॥.' ३. 'हाव' असा पाठभेद आहे, पण वरील पाठ सयुक्तिक वाटतो.

अष्टांगयोगाच्या कळा । द्वैपायनें कथिल्या सकळा । अगोचरी मुद्रां डोळां । आखंडित बाणली. ॥ ३२ ॥ मावळोनि गेली बुद्धि । जाली निर्विकल्प समाधि । गेल्या सर्वही आधिव्याधी । सुखसमृद्धि जालिया. ॥ ३३ ॥ मग जयजयकार बोलुन । केलें श्रीगुरुचें स्तवन । करूनि साष्टांग वंदन । चरणीं मस्तक ठेविलें॥३४॥ शिष्य पाहुनी परम धन्य । नाम ठेविलें **राघवचैतन्य** । संपूर्ण जगीं होशील मान्य । ऐसा वर दिधला. ॥ ३५ ॥ व्यास निजाश्रमा गेल्यावरी । **राघवचैतन्य** त्या वनामाझारी । व्याघ्रांदिक नाना वनचरीं । वसते जाले निर्भयें. ॥ ३६ ॥ तें स्थान अति गहन । अनेक जातींचे पक्षीगण । नानावृक्षांचें निबिड वन । चिंचिनी आम्र असती. ॥ ३७ ॥ स्वस्तिकादि नाना आसनें । नित्य करावीं निश्चळपणें । पूरक कुंभक रेचनें । प्राणायाम करावा.॥३८॥

---

१. हीं आठ अंगें—यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा व समाधी होत. २. अंतरांत पाहण्याची धारणप्रकरणांतली चौथी मुद्रा. ३. अभ्यासाच्या वेळेस मांड्यापासून खालच्या अंगाची जी स्थिति होते, तीस 'आसन' म्हणतात. हीं ८४००० असून ८४ प्रमुख मानितात. ४. 'पूरक,' 'कुंभक' व 'रेचक' हीं प्राणायामाचीं तीन अंगें आहेत. बाहेरचा वायू नासिकद्वारें हळू हळू आंत ओढणें तो 'पूरक', हा आंत ओढलेला मस्तकरूपी कुंभांत सांठवितात, त्या क्रियेला 'कुंभक' म्हणतात. आणि कोंडलेला वायू हळू हळू बाहेर सोडण्याच्या क्रियेस 'रेचक' म्हणतात. ५. 'सुमारें साडेबारा सेकंड पूरक करून पन्नास सेकंड कुंभक करावा. व मग पंचवीस सेकंड रेचक करावा म्हणजे कनिष्ठ प्रतीचा प्राणायाम होतो.'

**जालंदर आणि उडयान । तिसरा मूलबंध जाण । अपानातें ऊर्ध्व करून । अधोगमन प्राणाचे. ॥ ३९ ॥ करूनि कुंडलनीप्रबोध । *सुषुम्नेचा शोधिला मार्ग । कर्णीं †अनुहाताचा शब्द । श्रवण करित**

---

१. 'कंठमाकुंच्या हृदये स्थापयेच्चिबुकं दृढम् । बंधो जालंदराख्योऽयम्', कंठ आकुंचन करून हनुवटी वक्षस्थलावर दाबून बसविली असतां 'जालंधर बंध' होतो. [ ज्ञानेश्वरी, ६,२०७–२०८. ] २. बेंबीच्या वरच्या उदरप्रदेशाचें पाठीकडे आकर्षण करण्याच्या क्रियेला 'उड्डियान-बंध' म्हणतात. [ ज्ञानेश्वरी, ६,२०९–२१०. ] ३. पायाच्या खोटेनें गुदस्थान व लिंग याच्यामधील शिवण जोरानें दाबून गुदस्थानांचें आकुंचन करून अपानवायूचें अधोगमन बंद करून त्याला ऊर्ध्वगामी करणें, या क्रियेस 'मूलबंध' म्हणतात. [ज्ञानेश्वरी, ६,१९२–११९ ] ४. कुंडलिनी जागृत झाली म्हणजे नासिकेबाहेर जाणाऱ्या प्राणवायूला अधोगमिनी करिते. ५. ही नाभी खालीं साडेतीन वाटोळीं घालून बसलेली सर्पाकार शक्ति. ही साऱ्या योगपायांचा आधार समजतात व ही जागृत झाल्यानें हृदयांतील सर्व चक्रें व गांठी शिथिल होतात. [हटयोगप्रदीपिका, ३,१–२.] ज्ञानेश्वरी, ६,२२२–२४१ पहा. *देहामध्यें साडेतीन लाख नाड्या आहेत, त्यांपैकीं १४ मुख्य मानितात, व त्यांतही इडा, पिंगळा, व सुषुम्ना या श्रेष्ठ. 'सुषुम्ना' ही सर्वांत मुख्य असून परमपदाची दात्री आहे. हिचें स्थान 'इडा' व 'पिंगळा' यांच्यामध्यें असून दुसऱ्या साऱ्या नाड्या हिच्या आश्रयानें राहतात. हिचे 'शून्यपदवी,' 'ब्रह्मरंध्र,' 'महापथ,' 'स्मशान,' 'मध्यमार्ग,' 'शांभवी' इत्यादि पर्यायवाचक शब्द आहेत. †'अनाहत' असा शुद्ध शब्द. 'अनाहत' नामक हृदयस्त चक्र आहे. षण्मुखी करण करून ध्यान केल्यानें अनाहत ध्वनि उसळून समाधि लवकर लागते. [ ज्ञानेश्वरी, ६,२७४–७६. ]

असावा. ॥ ४० ॥ नासिकांतरीं वाहे श्वास । नित्य सहस्रदळीं सहवास । ज्ञानी पद अविनाश । जया ह्मणती. ॥ ४१ ॥ सर्वदां असावे निवृत्ति । भूतमात्री समान स्थिति । आंगावरी सर्प पक्षी बैसती । निर्भयत्वें येऊनि. ॥ ४२ ॥ अष्ट महासिद्धींचा पाळा । भोंवती होऊनि गोळा । आज्ञा मागती वेळो वेळां । स्वामीलागीं प्रार्थुनी. ॥ ४३ ॥ धैर्याचा मेरू अचळ । अंगीं वैराग्याचें बळ । कदाचित् प्राशन करावें जळ । अन्न न खावें सर्वथा. ॥ ४४ ॥ एकमासपर्यंत एका वृक्षीं । द्वितीयमासीं दुसरे वृक्षीं । उडोनि जातो जैसा पक्षी । तैसें जावें निजांगें. ॥ ४५ ॥ नग्नव्यक्ती दिगंबर । शयन करावें वृक्षांवर । एका वृक्षीं ठेवूनि शिर । दुज्या वृक्षीं चरण

---

१. योग्यांनीं आपल्या शरीरांत पिंडांत सहा व ब्रह्मांडांत सहा अशीं बारा चक्रें कल्पिलेलीं आहेत. यांच्याही वर सहस्रदल चक्र आहे. हें मेंदूच्या वरती अधर असें चक्र आहे, व याची कांति वर्णनीय आहे. मनुष्य-देहांतील परमात्म्याचें विश्रांतिस्थान येथेंच असून ह्यास चित्रकूटशिखर, मेरुशिखर अशीं अन्य नांवें आहेत. सत्रावी जीवनकळा येथेंच असून या सहस्रदळी कमळांत विसावा घेणें हेंच योग्याचें आद्यकर्तव्य आहे. २. अणिमा आदिकरून अष्टममासिद्धी. ज्ञाने० ६,२९६–९७ पहा. ३. समुदाय, घोळका.

पै ॥ ४६ ॥ कदाचित् सिद्धासन घालुन । वृक्षाग्रीं बैसावें जावुन । करावें शीतोष्णाचे सहन । ऐसा काळ बहु गेला ॥ ४७ ॥ राघव चैतन्य ययापरी । एकाकी वसतां वना माझारी । पुढें कथा वर्तली ते चतुरी । श्रवण केली पाहिजे ॥ ४८ ॥ राघव चैतन्या लागून । केशव चैतन्य गेले शरण । त्याचि विस्तारे करून । पूर्व कथा वर्णियली ॥४९ ॥ पूर्व कथेचें अनुसंधान । श्रोते विचारोत भाविक-जन । नृसिंह भट परमसुजन । पूर्व कथा त्याची परिसावी ॥५०॥ कर्नाटक देशाचें अंतरी । तृणामल्ल नाम नगरीं । देशपांडे तेथिल अधिकारी । असते झाले निर्धारें ॥ ५१ ॥ तेथें शिवगंगा महान सरोवर । त्याचे अग्निकोनास त्र्यंबकेश्वर । नित्य पूजा उपचार । करित होते बहुजन ॥ ५२ ॥ ब्राह्मणीं करावें पूजन । नित्य रुद्रा-वर्तनें करून । त्र्यंबकेश्वरापासीं जावून । करित असावे सर्वेहि ॥ ५३ ॥ कांहीं दिवस झाल्यावर । शिवालय पाहोनिया थोर । यवनें त्रास मानूनि क्रूर । होता झाला तये वेळीं ॥ ५४ ॥ मनीं आणिलें सत्वर । ब्राह्मणाचा मोडावा थारे । अवघे मिळोनि करितात चार । त्रास द्यावा निश्चयेसीं. ॥ ५५ ॥ ऐसें आणोनि मनांत । शिवालयावरी घुमट बांधूं लागत । सर्व ब्राह्मण नृसिंहभट । गेले तेथें बोलावया ॥५६॥ यवनाप्रति बोलते झाले जाण, । 'आम्हीं येथील

---

१. आश्रय; रहिवास २.हा त्या काळचा भाषणसंप्रदाय [ Idiom ] असून 'देवालयाची मशीद करणें' अशा अर्थी याचा उपयोग होत असावा. ३ शिवालयांतलि.

अधिकारी पूर्ण । शिवालय मोडूं जाणतोसी पण । होईल मोठा घात पैं येथें.' ॥ ५७ ॥ इकडे यवनानें काय केलें । गवंडी पाथरवट बोलाविले । 'खणा रे ! खणा, वहिलें । बोलता झाला निष्ठुरत्वें. ॥ ५८ ॥ कामगार लागती खणावयासी । ब्राह्मण स्त्री पुरुष योगराशी । अवघे मिळाले उपवासी । शिवालयासंन्निध ॥ ५९ ॥ सर्व ब्राह्मण देवावर । पडते झाले सत्वर । 'या दुःखाचा परिहार । निवारण करी देवराया !' ॥ ६० ॥ पायीं धरूनियां ब्राह्मणां । ओढूनि टाकिती ते क्षणां । ब्राह्मण म्हणती, 'नारायणा ! । काय संकट आम्हां पैं केलें ?' ॥ ६१ ॥ यवनास दुर्धर क्रोध येऊन । ब्राह्मणांच्या स्त्रिया आणून । त्यांचे शिरावरी पाषाण देऊन । ताडिता झाला निजांगें. ॥ ६२ ॥ कित्येक स्त्रियाचें गर्भपतन । लहान बाळकें भूमीं आपटून । स्त्रियांचे स्तनीं सांडस लावून । हाहाकार पैं केला. ॥ ६३ ॥ ब्राह्मणांच्या कंठास दोर बांधून । कूपांत घालूं लागला जाण, । 'आतां आठवा शिवालगून' । ऐसें बोले सक्रोधें. ॥ ६४ ॥ तेव्हां स्त्रिया म्हणती, 'न हे आमचे पती । आम्हां देऊनि यवनाचे हातीं'. । महान सरोवराच्या भोंवतीं । हाहाकार पैं जाहला. ॥ ६५ ॥ ब्राह्मणांस संकट पडलें गाढें । शिवासी प्रार्थिती निजकोडें, । 'धांव रे ! धांव आम्हांकडे' । उच्चस्वरें रुदन करिती. ॥ ६६ ॥ असो. ब्राह्मणास त्रास देऊन ।

१ स्वयें. २ चिमटा.

त्यांचें हिरूनि घेतलें धन्यधान्य । वतनेंही हस्तगत करून । घलवूनि दिधले तेथूनियां. ॥ ६७ ॥ वृद्ध ब्राह्मण नृसिंहभट । तेथुनि निघाले अव्वचट । नारायणगिरीवरी चोखट । तप करिते जाहले. ॥ ६८ ॥ येरीकडे काय वृत्तांत । यवन शिवालय खणीत । रक्ताचा स्राव भडभडत । निघता जाला तेधवां. ॥ ६९ ॥ यवनें आश्चर्य मानूनि थोर । बंद केले सकळ कामगार । पूजाउपचार करून थोर । भजनगजर पैं केला. ॥ ७० ॥ 'शिव कोपला आम्हांवर । जाळून टाकील सर्व नगर' । ऐसी भीति मानूनि सत्वर । स्तब्ध होता जाहला. ॥ ७१ ॥ यवनीं करुनी विचार. । 'येथुनि ब्राह्मण गेले गिरीवर । आतां त्यांसीं घेऊनि येऊं सत्वर' । असा निश्चय मनीं केला. ॥ ७२ ॥ आपण दूत पाठवुनि सत्वर । घेऊनियां पूजाउपचार । दंडवत नानाप्रकार । करिता झाला तयेवेळीं ॥ ७३ ॥ दूत सांगे वर्तमान, । 'राजा देतों तुम्हां-लागुन । द्रव्य घरें वतनें आपण । देऊं निश्चयार्थी ब्राह्मणां.'॥७४॥ ब्राह्मणीं संतोष मानुन । नगराप्रति आले जाण । शिवगंगाभोंवतीं संपूर्ण । बोलते जाले आनंदें. ॥ ७५ ॥ त्यावरी जाऊनि देवाल-यांत । शिवस्तव करिते जाले अद्भुत, । प्रेमाश्रूपूर लोट येत । स्वानंद-सुख अनुभवितां. ॥ ७६ ॥ ब्राह्मणांस देऊनि धनधान्य । त्यांचें

१ हा लहान पर्वत शिणवल्लीच्या आलीकडे दहा बारा कोसावर उत्तरेस आहे.

[1]संतोषलें मन, । 'आम्हांवरी शिव त्रिनयन । प्रसन्न झाला वाटतसे.' ॥ ७७ ॥ वाजत गाजत आणिले गृहासी । सर्व जन येती भेटावयासी । ब्राह्मणीं संतोष मानुनी चित्तासीं । परमानंद पैं केला ॥ ७८ ॥ सर्व ब्राह्मण गिरीवरून । आले तेथें आशा करून । तेथें नृसिंहभट राहून । तप करिते जाहले. ॥ ७९ ॥ वृत्ती जाली उदासीन । [2]अष्टांगयोगसाधन । करूनिया पूर्णपणें । देह शुष्क पैं केला ॥ ८० ॥ प्रथममासीं निराहार । दुसरे मासीं प्यावें नीर । ऐसें तप करूनियां थोर । शुकयोगींद्रासारखें. ॥ ८१ ॥ करूनि [3]पंचाग्नीसाधन । धूम्रपानीं होऊनि निमग्न । जग पादपरियंत [4]लांवुन । [5]नारायणीं बुद्धि ठेली ॥ ८२ ॥ घालोनियां सिद्धासन । नित्य करावें भस्मोद्धारण । अक्षयीं नारायणाचें [5]ध्यान । आदरेंसीं करावें. ॥ ८३ ॥ 'देवा! देह करवतीं घालीन । कीं जीव पर्वतीं देईन । किंवा [6]फेनीं जाईन बुडोन । देवराया! श्रवण करीं. ॥ ८४ ॥ नलगे मज पुत्र धन । तुझें नलगे मज धनधान्य । आतां हा किंकर जाण । पायातळीं ठेवावा.' ॥ ८५ ॥ देवास संकट पडलें गाढें, । 'याचें निवा-

---

१ संतोषविलें; किंवा संतोष पावलें. २ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि ही योगाचीं आठ अंगें आहेत. ३ चारी बाजूंस अग्नी पेटवून सूर्य हाच पांचवा अग्नी कल्पून तपश्चरण करणें. ४ वाढून; लांब होऊन. ५ चित्ताला कोणत्याही स्थानीं स्थिर करणें यांस धारणा म्हणतात. व त्या स्थानीं चित्ताची एकाग्रता होणें यास ध्यान म्हणतात. ६ येथें लक्षणेनं 'समुद्रांत' किंवा जलसंचयांत असा अर्थ घ्यावयाचा.

रावें कोडें । याहीं घातलें आम्हां सांकडें । प्राणनाश करिल हा.' ॥८६॥ ऐसा करूनि विचार जाण । नृसिंहभट निद्रापन्न । होताच स्वप्नीं येऊन । बोलता जाला निर्धारें. ॥ ८७ ॥ ब्राह्मणाचा वेष धरून । स्वप्नीं येऊनि नारायण । भक्ताचें वाढवावया महिमान । करुणावचनें बोलत. ॥ ८८ ॥ 'अगा माझ्या बाळका ! । तुजलागीं शिणविलें फुका, । तुझ्या निवारावया शोका । होइन पुत्र तुझा मी. ॥ ८९ ॥ तुझिया तपें करून । बहु संतोषलें मन, । आतां तुवां येथुन । जावें' ऐसें आज्ञापिलें. ॥ ९० ॥ ऐसें बोलोनि नारायण । स्वप्न पाहूनि संतोषलें मन । नारायणगिरिवरी जाण । ब्राह्मणभोजन बहु केलें. ॥ ९१ ॥ कांहीं दिवस जाल्यावर । प्रस्थान करिते जाले सत्वर, । नृसिंहभट पूजा उपचार । घेऊनि गेले देवालयीं. ॥ ९२ ॥ पूजा करूनि त्वरित । साष्टांग केला प्रणिपात, । 'आतां देवराया ! त्वरित । येतों' ऐसें पुसानी. ॥९३॥ मार्गीं चालतां सत्वर । तों अकस्मात् पाहिलें गंगातीर, । मध्यान्हासीं आला दिनकर । क्षुधा बहुत लागली. ॥ ९४ ॥ नृसिंहें मनामाजी आणिलें । आतां गंगास्नान करावें वहिलें । ऐसें बोलुनि सिद्ध जाले । स्नानालागीं करावया. ॥ ९५ ॥ गंगेमाजीं उभे राहुन । करीत होते अघमर्षण । नृसिंहमूर्ति हातां लागुन । परम

१. संकट. २. उदक मंत्रावयाच्या वेदऋचेनें पाणी मंत्रून पापक्षयार्थ त्याचें अवघ्रहण करण्याची नित्यब्रह्मकर्मांतली एक क्रिया. ३. अझून यांच्या घराण्यांत देवपूजेंत एक नृसिंहमूर्ति आहे, व ती हीच अशी दंतकथा वंशजांच्या ऐकण्यांत आहे.

संतोष पावले. ॥ ९६ ॥ नृसिंह हातामाजीं घेऊन । षोडशोपचारें पूजा करून । चरणीं मस्तक ठेवून । परमानंदें डुल्लतसे. ॥ ९७ ॥ नृसिंहभट गमन करित । स्त्री आनंदीबाईसहित । आले पुणेवाडीस निश्चित । परमानंदें करोनियां. ॥ ९८ ॥ कांहीं दिवस जाल्यावर । आनंदीबाईस जाला कुमर । शंख चक्र आयुधें सुंदर । पीतांबर वनमाळा. ॥ ९९ ॥ रम्य मूर्ति पीतवर्ण । कटीतटीं मेखळा दिव्य जाण । 'सोडोनियां वैकुंठभुवन । आलों येथें तुजलागीं.' ॥१००॥ ऐसें बोलोनियां वचन । ह्रुदयीं आनंदी आनंदली जाण । गर्भा नाहीं आली वेण । प्रत्यक्ष नारायण उभे ठेले. ॥ १०१ ॥ 'तुझे उदरास आलों आतां । तुवां न करावी सर्वथा चिंता' । ऐसें बोलेनि तत्त्वतां । अदृश्य होता जाहला. ॥ १०२ ॥ आनंदी देहावरी येऊन । पाहे तंव जाला नंदन । अति हर्ष करोनि पूर्ण । मुखचुंबन करितसे. ॥ १०३ ॥ तेरावा दिन होतां पूर्ण । नाम ठेविलें विश्वनाथ जाण, । स्नान घालुनी निंबलोण । करिती जाली आदरें. ॥ १०४ ॥ नारायण प्रत्यक्ष येऊन । आपलें नाम विश्वनाथ ठेवून । ज्येष्ठ बंधु त्रिंबक पूर्ण । तृतीय पुत्र बापु जाला. ॥ १०५ ॥ त्रिंबकबापुनें करावा संसार । विश्वनाथ बाबा पुजेसी तत्पर । संसार न करोनी उदार । ऐसे असते जाहले. ॥ १०६ ॥ त्यावरी लोटले दिवस कांहीं । नृसिंहभट कैलासवासी जाले पाही ।

१. सांप्रतचें पुणें. २. वेदना, कळा. ३. 'हास्य' असा पाठभेद आहे.

त्रिवर्ग बंधु एके ठायीं । राहते जाले सर्वदां. ॥ १०७ ॥ कांहीं काळ राहोनि तेथें । पुढें गमन होईल ओतूरातें । ते कथा ऐकिजे स्वस्थचित्तें । द्वितीयाध्यायीं सज्जनीं. ॥ १०८ ॥ निरंजन रघुनाथ जनस्थानवासी । कथा वर्णियेली पुण्यराशी । श्रवणमात्रें गुरुभक्तांसीं । आल्हाददायक निश्चयीं. ॥ १०९ ॥ श्रीचैतन्यविजय कल्पतरू । संपूर्ण फलदानी उदारू । श्रवण पठणें दुःखपरिहारू । होईल श्रोत्यावक्त्यांचा. ॥ ११० ॥

॥ श्रीराघव चैतन्य केशव चैतन्यार्पणमस्तु ॥

## अध्याय दुसरा.

श्रीगणेशाय नमः ॥ ऐसें गुरुभक्तांचें महिमान । ऐकतां संतोष पावे मन । त्रिवर्ग बंधू एके ठायीं जाण । असतां अद्भुत वर्तलें. ॥ १ ॥ बंधु त्रिंबकभटजीसहित । विश्वनाथभट बाबा तेथें । राहते जाले निवांत । तंव पुढे कलह वर्तला.॥२॥ बाबांची वृत्ती उदासीन । त्रिकाळ करावें संध्यास्नान । धर्मालागीं उदार पूर्ण । गृहकृत्य कांहीं करूं नये. ॥३॥ बंधूनें करूनि अनादर । भाषण केलें बहु कठोर ।

१. पुणेंवाडीस. २. भांडण. ३. दानधर्माविषयीं. ४. हा अपमान करणारा भाऊ बाबाहून वडील अगर लहान होता हें कळत नाहीं.

हस्त धरूनि गृहाबाहेर । विश्वनाथभटजीस घातलें. ।। ४ ।। त्याची पत्नी गिरिजाबाई । समागमें निघाली ते समयीं । बरोबर कांहीं घेतलें नाहीं । एका वस्त्रें निघालीं. ।। ५ ।। करुनी तीर्थयात्रेचा उद्देश । निघते जाले त्रिंबकेश्वरास । येऊनि राहिले ओतूरास । वस्तीलागीं उभयतां. ।। ६ ।। वस्त्र नाहीं नेसावयासी । अन्नही न मिळे खावयासी । ऐशा विपत्तीनें त्रासासीं । स्त्रीनें बहुत दिधलें. ।। ७ ।। म्हणोन घोर वनामाझारीं । बाबाजी निघाले सत्वरीं । मांडवी पुष्पावतीचे तिरीं । स्नानसंध्येसी बैसले. ।। ८ ।। वज्रप्राय स्त्रियेचीं वचनें । स्मरोनियां अंतःकरणें । होऊनियां अतिदैन्यवाणें । रुदन करूं आरंभिलें. ।। ९ ।। तंव नारद भेटतां उवाला । बहुतां पारि संतोष जाला । तैसें पूर्व पुण्य आलें उदयाला । विश्वनाथभटजींचें. ।। १० ।। जैसा व्यासपुत्र शुकयोगींद्र । तपोनिधि ज्ञान समुद्र । तैसा राघवचैतन्य यतींद्र । पाठीं उभा राहिला. ।। ११ ।। म्हणती, ‘ तूं कोण आलासी येथें ? । किमर्थ करितोसी शोकातें ? । खेद सोडुनि स्वस्थ चित्तें । वृत्तांत सांगें सर्वही.’ ।। १२ ।। करुनि साष्टांग नमस्कार । बाबाजी सांगती दुःखाचा प्रकार । म्हणती, ‘ महाराज! हा संसार । घोरांदर मज जाहला. ।। १३ ।। मीं ऋक्-

१. भयंकर समर [ हंसकोश ]; ‘ घोरंदर’ असाही शब्द आहे व ‘अत्यंत घोर’, ‘भयंकर’ अशा अर्थी या शब्दाचा कवितेंत प्रयोग आढळतो. २ ऋग्वेदी.

—शाखाध्यायी ब्राह्मण । विश्वनाथ माझें अभिधान । पुण्यग्रामीं वस्तीलागुन । बंधूसहित राहिलों. ॥ १४ ॥ तेथें कांहीं काळ असतां । बंधूनें करुनि अतिनिर्दयता । आम्हां स्त्रीपुरुषां उभयतां । गृहाबाहेर घातलें. ॥ १५ ॥ तेथूनि ओतूरासी आलों । एका ब्राह्मणाचें गृहीं राहिलों । तेथेंही स्त्रीभाषणें पीडिलों । तें काय किती सांगावें ? ॥ १६ ॥ भार्या म्हणे, 'अहा रे दैवा ! । दुःख जालें माझिया जिवा । पती मिळाला नाहीं बरवा । कैसें आतां करावें ? ॥ ७ ॥ पोटीं नाहीं पुत्रसंतान । पदरीं नाहीं कांहीं धन । वस्त्र फाटूनि जालें जीर्ण । पोटभरी अन्न मिळेना. ॥ १८ ॥ कानीं नाहीं बाळीबुगडी । मिळालीं नाहीं चांगलीं लुगडीं । सुख नाहींच अर्ध घडी । जालें याचे संगतीनें. ॥ १९ ॥ आपण मिळविना अधेला । मिळालें दे ब्राह्मणांला । म्हणुनि बंधूनें घालविला । हात धरुनि बाहेरीं. ॥ २० ॥ हा कोणाचें आर्जव न करी । नाक धरुनि बसतो घरीं । जाईना कां गिरिगव्हरीं । स्नानसंध्येलागीं पैं'. ॥२१॥ ऐसीं स्त्रियेचीं दुर्भाषणें । समक्ष ऐकूनियां कर्णें । त्रास घेतला माझिया मनें । म्हणोनि आलों या स्थळीं. ॥ २२ ॥ कोणाची स्त्री ? कोणाचा बंधू ? । हा अवघाचि दुःखसंबंधु । तुम्हां ऐसा दयासिंधु । भेटतां सुख होतसे. २३ या त्रैलोक्याचे ठायीं । स्वामी ! मजला कोणी नाहीं । पुढें संततीही कांहीं । जाली नाहीं सर्वथा.' ॥२४ ॥ ऐसें ऐकुनि दीन वचन । श्रीराघवचैतन्य आपण । त्या दुःखासीं

विभागी होऊन । बोलते जाले आदरें. ॥ २५ ॥ 'विश्वनाथा ! ऐकोनि घेईं । मजलाहि पुत्र नाहीं । याचें उत्तर लवलाहीं । सांगें मजलागीं तूं. ॥ २६ ॥ तूं म्हणसी मज कोणी नाहीं । तरी तुज मी आहे सर्वस्वही' । ऐसें म्हणोनि लवलाहीं । पूर्णकृपा पैं केली. २७॥ विश्वनाथासी आपुले । स्वामींनीं मांडीवरी बैसविलें । मुखालागीं कुरवाळिलें । निजहस्तें करुनियां. ॥२८॥ कृपादृष्टि अवलोकिलें । बहुतांपरी संबोखिलें । परी बाबाचें चित्त उबगलें । स्त्रियेविषयीं सर्वथा ॥ २९ ॥ म्हणती, 'पुरे हा संसार । माझी भार्या क्रोधी फार । जैसी तरवारीची धार । तैसी तीव्र बोलती. ॥ ३० ॥ मज नाहीं प्रपंचाचें ज्ञान । मिळवितां न ये धन । न सोसवे स्त्रियेचें बोलणें । म्हणोनि आलों सोडोनियां' ॥ ३१ ॥ स्वामी बोलती कृपानिधी, । 'तुज स्त्रीत्यागासी आहे अवधी । मी सांगतों शास्त्रविधी । ऐकोनियां घेईं पां. ॥ ३२ ॥ पाणिग्रहित स्त्रियेसी । नेम केला विवाहदिवसीं । तुजसह धर्मार्थकामासी । सेवन करिन म्हणऊनी. ॥ ३३ ॥ मोक्षइच्छा होती जेव्हां । स्त्रियेसी सोडोनि जावें तेव्हां । नाहीं तरी पितरां देवां । द्वेष होईल सर्वथा. ॥ ३४ ॥

---

१ समजाविलें. २ कंटाळलें; त्रासलें. ३ विवाहित. ४ 'धर्मे च अर्थे च ····नातिचरामि' इत्यादि. ५ मोक्षसाधन करण्याची इच्छा झाल्यावर.

पचविसावें वर्ष तुजलागून । नाहीं फिटलें स्त्रियेचें ऋण । जालिया एक पुत्रसंतान । त्याग करी तिेचा. ॥ ३५ ॥ माझिया आशिर्वादेंकरून । पुत्र होईल तुजलागुन । मज करी अन्नप्रदान । क्षुधा फार लागलीसे.' ॥ ३६ ॥ मग आज्ञा मागुनी स्वामिसी । विश्वनाथभट आले ग्रामासी । साद्यत वृत्त १ स्त्रियेसी । कथन केलें ते काळीं. ॥ ३७ ॥ 'राघवचैतन्य प्रसन्न जाले । पुत्र होईल ऐसें वदले । परि नेऊनि तयां घातलें । पाहिजे आतां भोजन.' ॥३८॥ गिरिजाबाई संतोषली । उत्तम प्रकारचीं अन्नें केलीं । ते विश्वनाथें घेऊनि वेहिली । स्वामीसन्निध पातले. ॥ ३९ ॥ नखांच्या चुंबळी जाल्या म्हणुन । घातलें विश्वनाथें भोजन । स्वामी होउनि अति प्रसन्न । अक्षयी वर दिधला. ॥ ४० ॥ 'तुज होईल उत्तम पुत्र । पुढें वंशवृद्धी करील पवित्र । तुज मोक्ष होउनि चारित्र । प्रगट होईल भूमंडळीं' ॥ ४१ ॥ 'तथास्तु' म्हणोन वंदन केलें । विश्वनाथभट गृहासी आले । उभयतां स्त्रीपुरुषें सेवन केलें । शेष अन्न उरलें तें. ॥ ४२ ॥ गिरिजाबाई जाली गर्भिणी । नव मास भरतां क्रमें करुनि । जाली पुत्राची जननी । उत्तम नगरीं द्विज गृहीं. ॥ ४३ ॥ कांहीं साहित्य पडतां उणें । सर्वदां संतापुनियां

१. हें पुत्रोत्पत्ति झाल्यावर फिटतें. २. येथें चतुरर्थीचा षष्ठीप्रमाणें उपयोग केलेला आहे. ३. तत्क्षणीं लागलीच. ४. तुझें, विश्वनाथभटाचें. ५. संसारांत लागणारें.

मनें । भर्त्यालागीं कठोर भाषणें । गिरिजाबाई करितसे. ॥ ४४ ॥ दशम दिवस लोटल्यावरी । विश्वनाथ सोडुनी नगरी । जाते जाले वना माझारीं । राघवचैतन्यासन्निध. ॥ ४५ ॥ प्राप्त होतां तेरावा दिन । मिळोनि सुवासिनी ब्राह्मण । करिते जाले नामकर्ण । नृसिंहभट म्हणुनी. ॥४६॥ श्रीचैतन्यपदकमळीं । विश्वनाथें ठेऊनि मौळी । उभा हात जोडोनी जवळीं । प्रार्थनेसी करितसे. ॥४७॥ 'सरली संसाराची कथा । मजला संन्यासें द्यावा आतां । दूर करावी जी ! भवव्यथा । स्वामीराया ! दयाळा !' ॥ ४८ ॥ वैराग्यें चित्त शुद्ध जालें । स्त्रीचें ऋणही फिटलें । ऐसें पाहुनि प्रसन्न जाले । राघवचैतन्य ते काळीं. ॥ ४९ ॥ संन्यासपद्धतीचे प्रकारें । मास नामाचेनि अनुसारें ।

---

१. दहावा २. नामकरण. ३. 'मौल', मस्तक. ४. 'ऐहिक वस्तूंचा ज्यानें सम्यक् ( चांगल्या रीतीनें ) न्यास ( त्याग ) केला तो संन्यासी ' हा धात्वर्थ; सामान्यतः ज्यानें श्रौतस्मार्तादि अग्निसाध्य कर्मांचा त्याग केला आहे अशाला ' संन्यासी ' असें समजतात. पण कर्मफलांची आसक्ति सोडून कर्तव्यकर्म करणारास गीता खरा संन्यासी म्हणते. संन्याशानें लोकेषणा, पुत्रेषणा व वित्तेषणा यांचा त्याग करून भिक्षावृत्तीनें रहावें, असें बृहदारण्यकांत दिलें आहे. ' सहांतें जो नाशी । साधी नारायण । संन्यासी तो जाण । धन्य एक. ॥' तुकाराम, गाथा [ निर्णयसागर, १९०३ ] २१९२, पहा. ५. मार्गशीर्ष मासीं संन्यास दिल्यामुळें, व मास देवता केशव असल्यामुळें केशव चैतन्य हें नाम ठेविलें.

केशवचैतन्य नाम बरें । विचार करुनि ठेविलें. ॥ ५० ॥ मग शिष्यातें सन्मुख बैसवून । करिती महावाक्याचें बोधन । शक्तिपातप्रभावेंकरुन । साक्षात्कार केला पै ॥ ५१ ॥ होतां ब्रह्माकार वृत्ती । मनाची मोडली प्रवृत्ति । मावळुनी गेली देहस्मृती । जीव भ्रांती उडाली. ॥ ५२ ॥ जाली निर्विकल्प समाधी । विलया गेली चित्तबुद्धि । सुख पावले *निरवधि । केशवचैतन्य ते काळीं. ॥५३॥ ऐसे बहुत दिवस गेले । कोणातें ठाऊकें नाहीं जालें । पुनरपि

---

१. 'तत्वमसि' याचा अर्थ 'त्वं तत् असि' ह्म० 'तूं तें ब्रह्म आहेस.' या गूढ तत्वाचा उलगडा ह्म० जीवात्म्याचा परत्म्याशीं संबंध. याची फोड श्रीधरांनीं वेदान्तसूर्याच्या आठव्या प्रकरणांत केली आहे, ती मुमुक्षूंनीं पहावी. २. महावाक्योपदेशानें जो अज्ञानशक्तीचा निरास तो शक्तिपात, त्याच्या प्रभावामुळें. ३. ब्रह्मात्मैक्य. श्रवणमननिदिध्यासादिकांच्या पारिपाकामुळें हें स्वरूपावस्थान प्राप्त होतें ४. ब्रह्माकार–ब्रह्ममय वृत्ती. ५. बहिर्मुखवृत्ति. ६. निर्विकल्प म्ह० कल्पनारहित, म्हणजे समाधिस्थितींत 'चरमवृत्ति' ( वेदांतसूर्य, २,१७४–१८० ) बाणल्यावर–तोस निर्विकल्प समाधी म्हणतात. 'जैसें जलधींत विरे लवण । तैशी कल्पना विराली पूर्ण । निर्विकल्प समाधी हे खूण । ········ ॥ १८३ ॥ जैशी जान्हवी आणि भागीरथी । एकची अर्थ हा निश्चितीं । तैसी निर्विकल्प समाधी चरमवृत्ति । एकरूप जाण पां ॥ १८४ ॥' या समाधीला लय म्ह० निद्रा, विक्षेप म्ह० भ्रांतचित्त, कषाय म्ह० स्तब्धता, आणि रसास्वाद अशीं चार विघ्नें येतात. * अत्यंत.

स्मृति विसरले। करूं आदारिलें स्तवनासी ॥ ५४ ॥ ' धन्य धन्य जी श्रीगुरुराया ! । मज पावविलें आपले ठायां । काय उतराई होऊं पायां । श्रीगुरुमूर्ति ! तुमचे. ॥ ५५ ॥ अनुपम्य सुखातें पावलों । ब्रह्मरस पिउनी धालों । जन्मा येवोनि कृतार्थ जालों । स्वामी प्रसादें करुनि ॥ ५६ ॥ मी मातें चोरिलें होतें । तें सांपडलें तुमचेनि हातें । निज धन पाउनी निरुतें । संपन्न जालों सर्वदां. ॥ ५७ ॥ स्वामी ! पूर्वीचा मी कोण । भुललों होतों कैसियानें । तुम्ही कैसें पावविलें नेऊन । हें मजलागीं सांगावें.' ॥ ५८ ॥ ' अरे ! तूं ब्रह्म निर्विकार । सत्य ज्ञानानंत अपार । परि अनादि अविद्येस्तव संसार । तुजलागीं प्राप्त जाला. ॥ ५९ ॥ अविद्या तम आणि माया । तिचींचि नामें असती गा प्रिया ! । नसतां भासली सेवाया । कैशापरि ऐके तें. ॥ ६० ॥ जैसें आकाशीं अभ्रपटळ* । कीं सूर्यरश्मिवरी मृगजळ । तैसा शबलब्रह्मीं† हा सकळ । भासता

---

१. आणून पोंचविलेंस; स्वस्वरूपीं मिळविलेंस २. ' रस ' म्हणजे ज्ञानमय आनंद; ब्रह्मज्ञानाच्या अनुभवामुळें प्रतीत होणारा आनंद तो ' ब्रह्मरस.' ३. माझ्या खऱ्या स्वरूपाला गमावून बसलों होतों. ४. सत्य, तात्विक; ' निश्चयेंकरून ' असाही अर्थ होईल. ५ कशानें; कशामुळें, कोणत्या कारणामुळें. ६. मायेमुळें. * अभ्रांचा पडदा. † यालाच महामाया ' किंवा ' प्रकृति ' म्हणतात शबल म्ह० औपाधिक.

जाला चिद्विवर्त्त. ॥ ६१ ॥ चिच्छक्तिसहित ब्रह्मचैतन्य । त्यासि परमात्मा ऐसें अभिधान । तोचि प्रकृतीपुरुषरूपेंकरून । नटाचे परि जाहला. ॥ ६२ ॥ अर्धनारीनटेश्वर । जया म्हणे सांख्यशास्त्र । तो जीवेश्वरत्वें द्विप्रकार । जाला प्रतिबिंबत्वें. ॥ ६३ ॥ प्रकृती माया अविद्या जाली । माया त्रिगुणांतें विसरली । गुणक्षोभिणी ऐसी बोली । जियेलागीं असे पैं. ॥ ६४ ॥ मायाप्रतिबिंब तो ईश्वर । अविद्या प्रतिबिंब जीव थोर । अविद्या जाली नाना प्रकार । म्हणोनि जीव नाना जाले. ॥ ६५ ॥ माया ईश्वरें अवलोकिली । ती महा-तत्वातें व्याली । महातत्वापासुनि जालीं । अपंचीकृत भूतें पैं. ॥ ६६ ॥ शब्दस्पर्श रूप रस गंध । पंच तन्मात्रा नामें विविध । त्याचें पंचीकरण करितां प्रसिद्ध । पंचमहाभूतें जाहलीं. ॥ ६७ ॥

---

१. चित्+विवर्त=चैतन्याचा भोंवरा. २. 'त्रिगुणापरता जो ईश्वर । अर्धनारीनटेश्वर । सकळ सृष्टीचा विस्तार । तेथून झाला ॥' दासबोध, १३,१,२५. ३. दासबोध १३.३,५ पहा. ४. अ+पंची-कृत भूतें=पंचतत्वांचा परस्परानुप्रवेशामुळें पंचीकरण होऊन जीं प्रत्यक्ष दिसणारीं व भासणारीं पृथिव्यादि भूतें तीं पंचीकृत भूतें; तशी अवस्था प्राप्त न झालेलीं. ५. शब्दस्पर्शादि पंचविषय. ६. 'प्रति सूक्ष्मभूतांचे दोन दोन भाग करून एकेक भाग त्याचा त्यांतच ठेऊन दुसरा भाग अन्य चार भूतांस वांटून देणें' तेणेंकरून ईश्वरेच्छेनें भूतांचें पंचीकरण होतें.

आकाश वायु तेज पाणी । पांचवें भूत ही मेदिनी । त्यामाजी ईश्वर प्रवेशुनि । धारण केली स्वसत्ते. ॥ ६८ ॥ ऐसें निर्मुनी ब्रह्मांड । त्यामाजी चतुर्दश भुवनें प्रचंड । तेथें स्थावर जंगम जिवांचे पिंड । निर्माण केलें अनुक्रमें. ॥ ६९ ॥ महाभूतांचे स्थूळदेह घडिले । अपंची कृताचे लिंगदेह जाले । अविधा कारणदेह या बोलें । सांगिजेलें शास्त्रानें. ॥ ७० ॥ येथवरी चैतन्य जें व्यापिलें । तें जीवदशेतें पावलें । म्हणुनि आपणातें भुललें । स्वप्नाचियापरी तें. ॥ ७१ ॥ मी भुललों कासयान । ऐसें तुवां पुसिलें म्हणून । सांगितलें अनुक्रमालागून । बाळआख्याईसारिखें. ॥ ७२ ॥ ब्रह्मा उत्पत्तिचा अभिमानी । विष्णु प्रवृत्त असे पालनीं । रुद्र संहारालागुनी गुणव्यक्ति प्रगटला. ॥ ७३ ॥ आतां सांगतों उपसंहार । तो ऐकोनि घेईं परिकर । संसारइच्छा धरी ईश्वर । तेव्हां रुद्र रूप

१. सप्तस्वर्ग व सप्तपाताल मिळून चवदा भुवनें. २. पंचमहाभूतात्मक देह. ३. यालाच सूक्ष्मदेह म्हणतात. पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें पंचप्राण, मन व बुद्धि मिळून जें सूक्ष्मशरीर त्याला लिंगदेह म्हणतात. ४. ' कारण महाकारण हा विचार । अज्ञानज्ञानालागीं म्हणती ॥ [ वेदांत सूर्य. ८. ] ५. या प्रश्नाचा उलगडा श्रीधरांनीं वेदांतसूर्यांत पहिल्या तीन प्रकरणांत आपल्या दृष्टांतरम्य वार्णानें वर्णिलेला आहे. रामदासांनींही दासबोधांत आठव्या दशकांत ( स० ३ ) व नवव्या दशकांत याचा उत्तम खुलासा केला आहे. ६. मुलांस सांगितलेल्या गोष्टीप्रमाणें.

संहारी. ॥ ७४ ॥ सूर्य तपोनि द्वादशकळीं । शेष विषातें वमी पाताळीं । तेव्हां पृथ्वीची होऊनि हाळी । राखोंडी होय सर्वांची. ॥ ७५ ॥ संवर्त मेघांच्या धारा । पडती गजशुंडाकारा । पृथ्वी विरे जैशा वोरां । साखरेचा विरतसे. ॥ ७६ ॥ तेज शोषुनि घे आपातें । वात नाहींसें करी तेजातें । आकाश वायू नाहींसें करितें । पोकळी आंत सर्वस्वें. ॥ ७७ ॥ गुण नाहींसें करिती आकाश । गुण प्रकृतींत होती समरस । तेव्हां गुणसाम्या ऐसें तीस । नाम पूर्ण होतसे. ॥ ७८ ॥ अविद्या आणि काम्य कर्म । संपूर्ण जिवाचे तेथें उपरम । बीजभाव तो गा ! उतम । पुनरपि सृष्टि व्हावया. ॥ ७९ ॥ ऐसा उपक्रमोपसंहार । होता जाता बारंवार । परि न चुके जिवाचा संसार । तत्त्वज्ञानावांचुनि. ॥ ८० ॥ हें उपक्रमोपसंहारद्वय । अवघा अध्यारोपाचि होय । आतां अपवादाची सोय । धरुनियां सांगतों. ॥८१॥ पारि आधीं +नित्यानित्यविवेचन । करावें

१. सारख्या, सतत. २. वोरा म्हणजे रवा. ३. हें महाप्रळयाचें वर्णन आहे. दासबोध, १३,४ व वेदांतसूर्य, ८, १५३ पहा. ४. एकरूप. ५. प्रतिपाद्य जी ब्रह्मवस्तु, जी एक, अद्वितीय, स्वगत, सजातीय, विजातीय भेदरहित आहे ( छांदोग्य, ६ वा अध्याय. ) तिचा 'हें जग आत्म रूप आहे, हा उपसंहार. ६. जगदुत्पत्तीचा आरोप. + 'देह अनित्य आत्मा नित्य ।' हा विवेक नित्या नित्य । ········जड तितुकें अनित्य । आणि सूक्ष्म तितकें नित्य । याहीमध्यें नित्यानित्य । पुढें निरोपिलें ॥' दासबोध, १३,१

लागे युक्तिकरून । जेणें अन्वय[1]व्यतिरेकें लक्षण । ठायीं पडे निश्चयीं. ॥ ८२ ॥ ज्ञानमात्र जो शुद्धात्मा । तोचि ब्रह्मांडीं परमात्मा । पिंडीं म्हणती जीवात्मा । साक्षी द्रष्टा तोचि पैं. ॥ ८३ ॥ स्थूळदेह जो भूतकार्य । तो आत्म्यासि दृश्य होय । म्हणोनि अनात्मा तो स्वयें । द्रष्टा त्याहुनि वेगळा. ॥ ८४ ॥ अपंचीकृतभूतांपासुनि । जाला सप्तदशकलेंकरुनी । लिंगदेह जो अनात्मपणीं । दृश्य होय सर्वथा. ॥ ८५ ॥ अविद्याकार्य कारणदेहें । जो आपणांना अन्य पाहे । आत्मा तयाचा साक्षी पाहे । यास्तव त्याहुनि वेगळा. ॥ ८६ ॥ जागृत अवस्था आणि स्वप्न । तिसरी अवस्था सुषुप्ति जाण । या आत्मयासी दृश्य म्हणुन । अनात्मरूप जणाव्या. ॥ ८७ ॥ विश्वं तेजासी अभिमानी । तिसरा प्राज्ञ नामें करूनि । हे प्रतिबिंबरूप म्हणुनि । अनात्में होत निश्चयें. ॥ ८८ ॥ देह अवस्था अभिमानी । हें संपूर्ण मायाकार्य म्हणुनि । ओळखावें व्यतिरेकेंकरूनि । यांत अन्वय आत्म्याचा. ॥ ८९ ॥ आतां त्वंपदार्थ शोधून । ऐक सांगतों तुजलागुन । विराट मायाकार्य म्हणुन । मिथ्या होय सर्वथा. ॥ ९० ॥ संपूर्ण लिंगदेहाचा अभिमानी ।

---

१ कार्य आहे तेथें कारण आहे हा अन्वय. कारण नाहीं तेथें कार्यही नाहीं हा व्यतिरेक. २. 'जड अनेक आत्मा एक । ऐसा आत्मानात्मविवेक ।' ३. सोहिरोबा, सिद्धांतसंहिता, ७,३०; २४१–४७ पहा. ४. 'विराट—स्थूलदेह तत्वतां । या दोहींचा तूं साक्षी पाहतां। जैसा लोकवर्तणुकीसी सविता। वेगळाची प्रकाशुनी ॥' वेदांतसूर्य,८,४४; या आठव्या प्रकरणांत श्रीधरांनीं 'तत्वमसी' चा उत्कृष्ट उलगडा केला आहे तो वाचकांनीं अवश्य पहावा.

हिरण्यगर्भ या नामें करुनि । आणि संपूर्ण कारणदेहाची जननी । अविद्या तेहि टाकावी. ॥ ९१ ॥ उत्पति स्थिति संहार । या तत्पदींच्या अवस्था परिकर । अभिमानी ब्रह्मा विष्णु रुद्र । हे संपूर्ण मायीक पैं. ॥ ९२ ॥ तत्पदींची सर्वज्ञता । आणि त्वंपदींची किंचिज्ज्ञता । या मायीक म्हणुनि सर्वथा । टाकुन द्याव्या उभयही. ॥ ९३ ॥ जहद् आणि अजहद् । तिसरे ते जहदाजहद् । या लक्षणेंकरूनि ब्रह्म अभेद । वस्तु तेचि जाणावी. ॥ ९४ ॥ जैसें घटमठीं अभिन्न । एक अखंड असे गगन ; तैसें पिंडब्रह्मांडीं चिदाकाश पूर्ण । व्यापुनी उरलें पुष्कळ. ॥ ९५ ॥ हे वस्तु गा ! तुजप्रति । पूर्वींच बोधिली मियां निगुति । तेथें लीन जाली तुझी मती । जीव भ्रांति निमाली. ॥ ९६ ॥ हें सर्व साधनांचें सार । महावाक्याचें जिव्हारें । ऐक्य पावती जीवेश्वर । या या स्थानीं निश्चित. ॥९७॥ श्रुति युक्ति आणि अनुभूति । तेथें मिळती निश्चिती । तें स्वरूप तुजप्रति । प्राप्त जालें ये काळीं. ॥ ९८ ॥ आतां मूळ अविद्या

---

१. माया प्रतिबिंबित ईश्वर लिंगशरीराचा अभिमानी होतो तेव्हां त्याला हिरण्यगर्भ म्हणतात. २. ' जीवचतुष्टी नांव ' त्वं ' पद । ब्रह्मचतुष्टीतें ' तत् ' पद । दोहींचें ऐक्य हें 'असि' पद । तूं आनंदकंद साक्षी यांचा॥ वेदांतसूर्य, ८,९३. ३. निभ्रांत, यथार्थ. ४. अंतःकरण. येथें मूळ, खूण तत्व असा अर्थ घ्यावा. ५. अनुभव. वेदावरून, युक्तीच्या साह्यानें व प्रत्यक्ष अनुभवावरून आत्मा हा देहातीत आहे हें कळतें

गेली । अहंता ममता मावळली । वासना वेली जळाली । कर्मे-
फळासहित. ॥ ९९ ॥ येथवरी कथिला अध्यारोप । शुद्ध ब्रह्मीं
करुनि आरोप । आतां अपवादाचें स्वरूप । सांगतों तें ऐक पां.
॥ १०० ॥ नाहींत ब्रह्मीं माया अविद्या । जीवेश्वर आणि ब्रह्म-
विद्या । प्रकृती चिच्छक्ति ज्या आद्या । त्याही नाहीं सर्वथा. १०१
नाहीं त्रिगुणांची मांडणी । पंचभूतें जाली जय--पाटणी । ते अपं-
चीकृत भूतखाणी । नाहीं केवळस्वरुपीं. ॥ १०२ ॥ अवस्था
आणि देह अभिमानी । ह तरी कैंचें तयेस्थानीं । ब्रह्मीं नाना नाहीं
म्हणोनि । श्रुति सांगे निश्चयें. ॥ १०३ ॥ ब्रह्माकार तुझें मन
झालें । ते वेळींच जग मावळलें । ब्रह्मीं नसे हें म्हणावया उरलें ।
नाहीं कोणी सर्वथा. ॥ १०४ ॥ स्वप्न मिथ्या जागृतकाळीं ।
स्मरत असतां वेळोवेळीं । तैसें जग मिथ्या हें त्रिकाळीं। ज्ञानियासी
सर्वथा ॥ १०५ ॥ तूं शिष्य भेटलासि अनन्य । म्हणुनि तुज
बोधिलें शुद्ध चैतन्य । आतां तुझें नाम केशवचैतन्य । अन्वर्थक
जाहलें.' ॥ १०६ ॥ ऐसें बोलुनि राघवचैतन्य । उपरम पावोनि
केलें मौन्य । शिष्यातें, करुनियां धन्य। आपुलिया सारखें.॥१०७॥
ऐसा गुरुशिष्यसंवाद । होतां वाढला परमानंद । देशधडी गेला

१. जगदुत्पत्तीचा आरोप. २. 'जयपाटनी' म्ह० मिथ्या. ३. शांति स्थिरता येथें उपरम पावणें म्हणजे भाषण, उपदेश संपविणें असा अर्थ करावा.

खेद । अद्वयबोध जाहला. ॥ १०८ ॥ सांनिध्य उत्तम नाम नगरी । मांडवी पुष्पावतीचे तीरीं । घोर अरण्यामाझारीं । वसते जाले उभयतां. ॥ १०९ ॥ कांहीं काळ राहोनि तेथें । पुढें गमन होईल भागीरथीतें । ते कथा ऐकिजे स्वस्थचित्तें । तृतीयाध्यायीं सज्जनीं. ॥ ११० ॥ निरंजन रघुनाथ जनस्थानवासी । कथा वर्णिली पुण्यराशी । श्रवणमात्रें गुरुभक्तांसी । आल्हाददायक निश्चयीं. १११ ॥ श्रीचैतन्यविजयकल्पतरु । संपूर्णफलदानी उदारु । श्रवणमात्रें दुःख परिहारु । होईल श्रोत्यांवक्त्यांचा. ॥ ११२ ॥

॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्यार्पणमस्तु ॥

## अध्याय तिसरा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्य । या उभयतांनीं सोडोनि पूर्वस्थान । क्षेत्र जनस्थानासी[1] जाऊन । गोदास्नान पैं केलें. ॥१॥ त्रिरात्र राहोनि तयेस्थळीं । श्रीराम पाहिला नेत्रकमळीं । चक्रतीर्थासी प्रातःकाळीं । चतुर्थ दिवशीं पातले.॥२॥ कुशावर्तीं करूनि स्नान । घेतलें त्रिंबकेश्वराचें दर्शन। गंगाद्वाराप्रति जाऊन। वसते जाले दिनत्रय. ॥३॥ तेथूनि श्रीद्वारकेप्रति । जाते जाले चैतन्यमूर्ति । स्नानें करूनि गोमतीं । कृष्ण यदुपति वंदिला. ॥४॥

---

१. नाशिक, पंचवटी.

**नारायणसरोवरा** जाऊन । करुनियां समुद्रस्नान । आदिनारायणाचें दर्शन । घेते जाले आदरें. ॥ ५ ॥ तेथुनि पुष्करतीर्थासी गेले । तीर्थस्नान करोनि वहिलें । कांहीं काळ तेथें राहेले । उभय यतीवरिष्ठ. ॥ ६ ॥ उत्तर दिशेचीं तीर्थें करून । दृष्टीं पाहिले नरनारायण । बद्रिकेदारातें वंदून । प्रयागासीं पातले. ॥ ७ ॥ तेथें गंगायमुनासंगम । दृष्टीं पाहिला अति उत्तम । वंदिला श्रीत्रिविक्रम। ब्रह्मभावें[१] करोनि. ॥ ८ ॥ पाहुनि श्रीक्षेत्र काशी । उभयतां संतोषले मानसीं । दर्शनमात्रें भागीरथीसी । स्तविते जाले आदरें. ॥ ९ ॥ 'श्रीविष्णुपदापासून । गंगे! तूं जालीस निर्माण । स्वसामर्थ्य-मात्रें करून । जग पावन करशी तूं. ॥ १० ॥ गंगे! तुज भगीरथें प्रार्थिलें । ह्मणुनि भूतळीं येणें केलें । भागारथी हें नाम जालें । भगीरथाच्या योगें पैं. ॥ ११ ॥ प्राणी[२] राहोनि शत योजन । गंगे करिता तुझें स्मरण । तो तेथेंचि होतसे पावन । स्मरतां माते! करसी तूं. ॥ १२ ॥ मार्गीं तुजलागीं पाहुन । प्राशन करिजेलें जन्हुन । जान्हवी हें नामकरण । माते! तुज जाहलें. ॥ १३ ॥ तूं उत्तमामाजीं उत्तम । तुझें तीरीं वसती मुनिसत्तम । तुझें स्नान करितां श्रीपुरुषोत्तम । विष्णु प्रसन्न होतसे.' ॥ १४ ॥ ऐसें बहुतांपरि स्तविली । भागीरथी संतोष पावली । चैतन्यदर्शनें निवाली।

---

१. ब्रह्मस्वरूप हा भाव धरून. २. दुसऱ्या प्रतींत ही ओंवी अकरावी आहे.

ब्रह्मनिष्ठ आले ह्मणुनि. ॥ १५ ॥ करुनि मनकर्णिकेचें स्नान । घेतलें विश्वेश्वरदर्शन । चैतन्यरूपें करुनी ध्यान । स्तवनालागीं आदरिलें. ॥ १६ ॥ 'जय जय शिव विश्वंभरा । नित्य निरंजन निर्विकारा ! । अविनाशा अनंता अपारा ! । शुद्ध स्वरुपा स्वयंभू! ॥ १७ ॥ तूं सच्चिदानंदस्वरूप । तुजला नाहीं नामरूप । तथापि स्मरणकर्त्यांशीं निष्पाप । करित अससी निजमहिमें. ॥ १८ ॥ तुझ्या शक्तीचा हा विस्तार । प्रगट जालें चराचर । म्हणुनि तूंतें विश्वाधार । म्हणती शास्त्रें पुराणें. ॥ १९ ॥ तूं स्वयें असतां निर्गुण । संपूर्ण जगतासी कारण । माया तुझ्या योगें करुन । चैतन्य रूपा भासतसे. ॥ २० ॥ तूं भक्तकामकल्पद्रुम । तूं कर्मफलदाता निःसीम । स्वशरणागताचे श्रम । परिहार करिसी तात्काळ.॥२१॥ तूं सर्व विश्वाचा कर्त्ता । तूं सर्व विश्वाचा धर्त्ता[1] । तूं सर्व विश्वाचा संहर्ता । परमात्म रूपें[2] वर्तसी. ॥ २२ ॥ तूं सर्वांसीं कारण । कार्य रूप तूंचि जाण । विश्वीं नसे कांहीं आन । तुजवांचुनि सर्वथा. ॥ २३ ॥ तूं कर्म आणि कर्त्ता । तूं धर्म आणि आचरविता । तूं वेदरूपें समस्तां । प्रकाशन करतोसी. ॥ २४ ॥ तूंचि वर्ण आश्रम संपूर्ण । तूं मन्वादिकांच्या रूपें करुन । स्वयें धर्मातें आचरून । स्थापन करिसी सर्वदा. ॥ २५ ॥ तूं सकळांचा प्राण । तूं सक-

१. धारण करणारा. २. मूर्तिमत, सगुणाकार.

ळांचें जीवन । ओंदन आर्तां अन्न । सर्वरूपें सर्वांसी. ॥ २६ ॥ संपूर्ण देवांचा तूं देव । म्हणोनि तुझें नाम महादेव । कल्याणकारक म्हणुनी शिव । तुजलागीं म्हणताती. ॥ २७ ॥ हे गिरिजावल्लभा कामारि ! । हर शंभो पिनाकधारी ! । सर्पभूषण नंदीवरी । बैसुनियां चालसी. ॥ २८ ॥ चिताभस्मातें गुंठून । करिशी रुद्राक्षधारण । जटाजूट हेमवर्ण । मस्तकावरी शोभतसे. ॥ २९ ॥ दशभुज पंचानन । प्रतिमुखासी त्रिनयन । अर्धचंद्र शोभायमान । मस्तकावरी विलसतसे. ॥ ३० ॥ नीळकंठ त्रिशुळ डमरु । गळां रुंडमाळा परिकरु । गजचर्म वेष्टुनि फणीवरु । कटिप्रदेशीं शोभला. ॥ ३१ ॥ हे शंभु अनंता अपारा ! । निजानंदा निर्विकारा ! । कृपा करीं वो दातारा ! । प्रसन्न व्हावें ये काळीं.' ॥ ३२ ॥ ऐसें करितां पुष्कळ स्तवन । श्रीविश्वेश्वर जाले प्रसन्न । लिंग डोलूं लागलें जाण । सर्व जन पाहाती. ॥ ३३ ॥ उभय चैतन्यमूर्तींला-गुन । संपूर्ण काशीमाजील जन । करुनि साष्टांग नमन । स्तुति स्तवन करिताती. ॥ ३४ ॥ म्हणती, 'येथें बहुत जन आले । परंतु शिव नाहीं प्रसन्न जाले । लिंगही नाहीं डोललें । आजपर्यंत सर्वथा. ॥ ३५ ॥ स्वामी ! तुमचें दर्शनेंकरून । आह्मीं संपूर्ण जालों धन्य । आणि हें क्षेत्र तुमच्या योगें करून । परम पावन

१. भात अर्थात् आर्त म्हणजे पिडितास. २. धारण करून, लावून. ३. चांगल्या.

जाहालें.' ॥ ३६ ॥ असो. श्रीविश्वेश्वर ॥ डोलत होता एक प्रहर । संपूर्णांनीं पूजा उपचार । करुनि गजर पैं केला. ॥ ३७ ॥ करुनि पूजाउपचार । यतींचा केला बहु सत्कार । भरिलें द्रव्याचें भांडार । सेवकजनीं ते काळीं. ॥ ३८ ॥ त्या द्रव्याचें शिवालय बांधिलें । त्यामाजीं शिवलिंग स्थापिलें । त्याचें नाम केशवचैतन्य ठेविलें। काशीमध्यें द्विजवरीं. ॥३९॥ काशीक्षेत्रीं देवालय हे । अद्यापि[1] विराजमान आहे । सर्व जन दर्शनासी लवलाहें । नियमें जाती प्रतिदिवशीं. ॥ ४० ॥ ऐसी काशींत कीर्ती ठेऊन । तेथुनि जगन्नाथासीं केलें गमन । करुनि पूर्वसमुद्राचें स्नान । जगन्नाथदर्शन घेतलें. ॥ ४१ ॥ तेथुनि कल्याणकल-[2]बुरग्यासि आले । तेथें स्थळ राहवयासी नाहीं मिळालें । ह्मणुनी उभयतां खेद पावले । पर्जन्यवृष्टी होतसे. ॥४२॥ मग एका मसिदी माझारीं । राहते जाले उभय मस्करी[3] । पादरक्षा मध्यकोनाड्याभीत-[4]रीं। मसिदींत ठेविल्या. ॥ ४३ ॥ तंव तेथील अधिकारी मुल्लांणा[5] ।

---

१. अजूनही हें देवालय काशींत आहे असें म्हणतात. २. कल्याण हें कर्नाटक प्रांतांत राजधानीचें शहर होतें. हें बेदरच्या पश्चिमेस उ० अ० १८ व पू० रे० ७७ मध्यें आहे. विजलराजा व त्याचा प्रसिद्ध प्रधान बसव येथेंच होऊन गेले. ३. सन्यासी. ४. मधल्या कोनाड्यांत. ५. मुल्लाणा हा मुसलमानी धर्माचा अधिकारी व न्यायमनसुवा देणारा, बारा बलुतेदारांपैकीं एक व कुराण पढविणारा.

दीप लावावयासी आला जाणा । उभयतांलागीं भाषणा । करितां जाला निष्ठुरत्वें. ॥ ४४ ॥ मुलाणा म्हणे, 'तुम्हीं हें काय केलें ? । आमचे धर्मालागीं बुडविलें । मसिदीमध्यें जोडे ठेविले । मुख्य स्थानीं जाऊनी.' ॥ ४५ ॥ ऐसा मुलाणा भरुनि रागें । सर्वेंचि जाउनि लागवेगें । तेथील काजीप्रती वृत्तांत सांगे । बहु खेदातें करुनि. ॥ ४६ ॥ 'हिंदूचे फकीर दोघे आले । आमचे मसिदींत उतरले । आणि पायांतील जोडे ठेविले । आपले निमाजस्थानीं पैं. ॥ ४७ ॥ म्यां तयांतें निवारिलें । परि ते ऐकेनासे जाले । या करितां सांगावया वहिलें । आलों तुम्हांसन्निध.' ॥ ४८ ॥ ऐसें ऐकोनि तो काजी । त्वरित आला मसिदीमाजी । क्रोधयुक्त होउनी तो पाजी । बोलता झाला निष्ठुरत्वें ॥ ४९ ॥ 'ब्राह्मणगुरु तुम्हीं संन्यासी । न जातां ब्राह्मणगृहासी । सोडुनि आपुल धर्मासी । आमचे धर्मासी बुडविलें. ॥ ५० ॥ तुम्हीं येथुनि जावें सत्वरी । नाहीं तरी दंड होईल भारी ' । ऐसें ऐकुनि ते यतीवर नरकेसरी । निर्भय वसते जाहले. ॥ ५१ ॥ मग काजीनें मुलाणा पाठविला । आणि निजामशाहा पातशाहाला । वर्तमान कळविता झाला । साद्यंत तेथें झालें तें. ॥ ५२ ॥ इकडे अनेक यवनांचा मेळा । भोंवता होता जाला गोळा । जैसा जंबुकांचा पाळा । व्याघ्रापाशीं मिळतसे. ॥ ५३ ॥ ग्रामामधील जन । मिळते झाले संपूर्ण । यवनांलागीं भय दारुण । होतें जालें ते वेळीं. ॥ ५४ ॥

तंव सैन्यासहित बादशाह तेथ । येऊनी पातला त्वरित । सर्वांनीं सांगतां वृत्तांत । आपले मनीं दचकला. ॥ ५५ ॥ बादशाहाची येतां स्वारी । प्रळय वर्तला ग्रामामाझारीं । ब्राह्मणांचे घरोघरीं । पीडा करिते जाहले. ॥ ५६ ॥ म्हणती, 'ठोका येथील ब्राह्मणांसीं । यांणींच आणविले हे संन्यासी । बिघडविले आमुचे धर्मासी । मसिद खराब पैं केली.' ॥ ५७ ॥ ब्राह्मण मुलांबाळांसहित । येते जाले मसिदींत । स्वामीसन्निध रुदन करित । बसते जाले ते काळीं. ॥ ५८ ॥ म्हणती, 'तुम्हांकरितां आम्हाला । बादशाहा दुःख देता जाला । आतां ग्राम सोडोनि आम्हाला । जाणें आलें ये काळीं' ॥ ५९ ॥ स्वामी विचारिती[१] मानसीं, । 'आम्हाकरितां ब्राह्मणांसी । दुःख होतें अहर्निशीं । जावें आतां येथुनि.' ॥ ६० ॥ करितां द्विजांचें शांतवन । तंव बादशाहाचि आला आपण, । म्हणे, 'तुम्ही आहांत कोण । मसिदींत राहिलां? ॥ ६१ ॥ निमाज पढावयाचें स्थान । तेथें ठेविलें पादरक्षेलागुन । आतां सोडोनि आमचा ठिकाण । जावें अन्य स्थळासि. ॥ ६२ ॥ जोडे घेऊनियां हातीं । जावें निघोनि निश्चितीं । नाहीं तरि तुम्हांप्रति । शासन करीन ये काळीं.' ॥ ६३ ॥ निजामशाहा[२] बादशाहासी । बोलते जाले उभय संन्यासी, । 'तूं आपले म्हणतोसि

१. विचार करिती. २. हो हकीकत इ. स. १५६० नंतर घडली, अहमदनगरचाच निजामशहा बादशहा असावा.

मासिदीसी । तरी बोलवूनि इजसी न्यावें पैं. ॥ ६४ ॥ आम्ही पृथ्वीवरि बैसलों, । तुझे मसिदीस नाहीं शिवलों, । कोठुनि आलों ना गेलों । असो जेथील तेथेंची.' ॥ ६५ ॥ मग निजामशाहा आपण । धरूनि केरामतीचा अभिमान । कर्णांमाजी बोटें घालून । निमाज करिता जाहला. ॥ ६६ ॥ 'मसिदमा मासिदमा' ऐसें म्हणून । हाका मारी उच्च स्वरेंकरून । वारंवार उठून बसून । प्रार्थनेसीं करितसे. ॥ ६७ ॥ ऐसी प्रार्थना बहुवेळ । केली, ती जाली विफळ, । मसिद न बोलोनि एकांगुळ । ढळली नाहीं ते काळीं. ॥ ६८ ॥ मग श्रीचैतन्यमूर्ति योगेश्वर । धर्मरक्षणार्थ जयाचा अवतार । एक परमात्मा एक ईश्वर । नररूपें प्रगटले. ६९ तेजःपुंज उभय मूर्ति । त्रैलोक्यभरी जयांची कीर्ति । लोकोद्धारार्थ त्यांची प्रवृत्ति । पावन करिती सर्वांतें. ॥ ७० ॥ सर्वदा ज्यांची ब्रह्मीं स्थिति । देहत्वें दिसती लोकांप्रति । हें जाणवया जगद्भ्रांती । चमत्कारा दाखविलें. ॥ ७१ ॥ मसिदीस पुसती, 'तूं कवण ?' ती म्हणे, 'मी तुमची दासी +आंदण'। स्वामी म्हणती, *'याचा ठिकाण सोडून । चाल येथुनी.' ॥ ७२ ॥ मग इंद्रादि देवांचें विमान । जैसें अंतरिक्षीं करी गमन । तैसी स्वामीसह आपले

---

१. अलौकिक सामर्थ्याचा. २. हे मासिदी माते ! ३. एक अंगुळभरसुद्धां ४. अनुक्रमे राघवचैतन्य वं केशवचैतन्य. ५. प्रवर्तन, संचार. ६. जाणवावया. (!) + आंदण दिलेली. * बादशाहाचा.

आपण । मसिद उडती जाहली. ॥ ७३ ॥ कलबुरगें सोडोनि दुरी । जाती जाली पाव कोशावरी । परंतु मृत्तिका तिळभरी । ढळली नाहीं तियेची. ॥ ७४ ॥ यवनस्पर्श होईल म्हणुनि । स्वामी अदृश्य जाले तयेस्थानीं । पाठीमागें तो बादशहा मनीं । विचार करितां जहाला. ॥ ७५ ॥ म्हणे, 'हे पुरुष महान थोर । हिंदुमाजी पीरपैगंबर, । तयांचा केला म्यां अनादर । धिक्कार असो मजलागीं. ॥ ७६ ॥ मी अधमांमाजी अधम । केला सिद्ध पुरुषाचा अतिक्रम । मजप्रति जाला भ्रम[1] । आपण श्रेष्ठ ह्मणऊनि. ॥ ७७ ॥ हे उभय यती परमात्मस्वरूप । यांचें छळणेंचें मज घडलें पाप । आतां मज देऊनि शाप । दग्ध करतिल ये क्षणीं. ॥ ७८ ॥ आतां तयांतें जावें शरण । करावा अपराध निवेदन । मग जैसें घडेल दैवेंकरून । तैसें घडो ये काळीं.' ॥ ७९ ॥ मग उभय हस्तांतें बांधुनी । बादशहा आला तयेस्थानीं । तंव स्वामी न दिसती नयनीं । अदृश्य होते जहाले. ॥ ८० ॥ मग बहु शोका आदरिलें । सर्व भोगां त्यजिलें । बहुत दिवस उपवास केले । प्राण व्याकुळ होतसे. ॥ ८१ ॥ मग तया मसिदीमाझारीं । दोन कबरा बांधिल्या शेजारीं । 'राघवदराज केशवदराज या परी । नामें ठेविलीं तयांचीं. ॥ ८२ ॥ सव्यभागीं बैसुनि ब्राह्मण । करुनि रुद्रावर्तन । वेदोक्त मंत्रें पूजाविधान । करिते जाले सर्वदां.

---

१. मोह, अहंकार.

॥ ८३ ॥ वामभागीं संपूर्ण यवन । कलेमा पठती आपण । त्रिकाळ निमाज करून । उभे असते जाहले ॥ ८४ ॥ पातशहा करितो उपोषण । ह्मणोनि स्वामी होऊनि प्रसन्न । आळंदगुंजोटी दीड योजन । तेथें प्रगट जाहले. ॥ ८५ ॥ बादशहानें ऐकूनि वार्ता । मार्गीं घाली दंडवतां । घेऊनि यवनजाति समस्ता । आळंदगुंजोटीसी पातला. ॥ ८६ ॥ हस्त बांधूनि उभा राहिला,। 'मीं तुमचा अपराध केला, । आतां शासन करा मजला । ह्मणजे निर्दोष होईन. ॥ ८७ ॥ नलगे मज राज्यसंपत्ती । करीन शरीराची माती । फिरेन तुमच्या सांगातीं । फकीर होऊनि ये काळीं.' ॥ ८८ ॥ तयाचा दृढ भाव पाहून । चैतन्यमूर्ति जाले प्रसन्न, । देते जाले अभय दान । 'निर्भय ऐस' ह्मणऊनि ॥ ८९ ॥ बादशहा ह्मणे,' स्वामिराया । जरी मजवरी तुमची पूर्ण दया । तरी सोडूनि ग्रामास या । जाऊं नये अन्य कोठें. ॥ ९० ॥ भक्ति पाहोनि बादशाची । स्वामी म्हणती, 'घडेल तैसेंचि'. । ऐसें बोलोनि रवानगी त्याची । आशिर्वाद देऊनि पैं केली. ॥ ९१ ॥ सच्छिष्य केशवचैतन्याप्रति । श्रीराघवचैतन्य आज्ञापिती, । 'तुवां जावें उत्तमग्रामासी निश्चिती । अनुष्ठानस्थळीं आमुच्या. ॥ ९२ ॥ आमची जाली बहु प्रसिद्धि । आतां फार होइल जनउपाधी । आतां याकरितां समाधी । घेतों आम्ही या स्थळीं.' ॥९३ ॥ ऐसें आज्ञा-

१. मुसलमानी धर्मस्थापक जो महमद त्याचे शब्द. २. उपसर्ग, त्रास.

पुनि आपण । पावते जाले अंतर्धान । मग सर्वांनीं अमित द्रव्य वेंचून । समाधी बांधिली तये स्थळीं. ॥ ९४ ॥ ' राघवदराज ' तयालागुनी । नांव ठेविलें यवनानीं, । 'राघवचैतन्य' ब्राह्मणांनीं। म्हणत असावें सर्वदां. ॥ ९५ ॥ एक भागीं पूजा करिती ब्राह्मण । एक भागीं पूजा करिती यवन । अद्यापि तेथील महिमान । चाललें असे यापरी. ॥ ९६ ॥ देशोदेशींचे यात्रेकरी येती । नाना प्रकारचे नवस करिती । तयांचे मनोरथ पूर्ण होती । नवसांसी स्वामी पावूनि. ॥ ९७ ॥ सभोंवतीं केलें उपवन । विचित्र स्थळें बांधिलीं जाण । वापी कूप तडाग खनन । केलीं स्थळोस्थळीं पैं. ॥ ९८ ॥ उत्साह महोत्साह होती । निशाणें पताका शोभती । भेरी चौघडे वाजती । प्रतिदिनीं त्या स्थानीं. ॥ ९९ ॥ जैसी इंद्राची अमरपुरी । कीं द्वारकेची आणिली दुजी सरी । तैसें स्थळ ते अति कुसरीं । निर्माण होते जाहले. ॥ १०० ॥ गुरुसेवा घडावी म्हणऊनि । गांव मान्यहाळ त्रैकोश तेथुनि । मठिका बांधिली तये स्थानीं । केशवचैतन्यबाबानीं. ॥ १०१ ॥ गुरुसमाधीचे दर्शनासी । यावें आळंदगुंजोटीसी । मागुती मान्यहाळांसी । जावें पूजा करूनि. ॥ १०२ ॥ श्रीगुरूचा वियोग जाला । म्हणुनि

---

१. कीर्ति; संप्रदाय या अर्थी येथें हा शब्द वापरला आहे. २. खनन केली=खणिली. हा प्रयोग व्याकरणदृष्ट्या चिंतनीय आहे. ३. चातुर्यानें. ४. गांवांचे नांव.

उद्विग्नता मनाला । ऐसा बहुतकाळ गेला । तंव स्वामीदर्शन जाहलें. ॥ १०३ ॥ स्वरूप सुंदर सांवळी तनु । तेजःपुंज जैसा भानु । सरळ नासिका नीघोटे हनु । विशाळ नयन शोभती. ॥ १०४ ॥ आजानुबाहु दंड सरळ । विस्तीर्ण हृदय विशाळ । त्रिवळीखालीं नाभीकमळ । अति सखोल शोभतसे. ॥ १०५ ॥ कर्दळीस्तंभाचिये परि । जानुद्वय अति साजिरी । नखें पादांगुळ्यावरीं । चंद्ररेखा ठेविल्या. ॥ १०६ ॥ चंद्रसम सुंदर वदन । जटा शोभती हेमवर्ण । सर्वांगीं भस्म विराजमान । दिगंबर मूर्ति नेटकी.।१०७। ऐसें राघवचैतन्यदर्शन । अकस्मात होतें जालें जाण । दंडवत नमस्कारातें करून । केशवचैतन्य उभे ठेले. ॥ १०८ ॥ मग श्रीगुरु जाले बोलते, । 'पूर्वींच सांगितलें होतें तूतें । कीं तुवां जावें उत्तमग्रामातें । अनुष्ठानस्थळीं आमुचे. ॥ १०९ ॥ तेथें दाखवूनि चमत्कार । करावा जगताचा उद्धार । भक्ति ज्ञान वैराग्य परिकर । प्रगट करावें सर्वत्रीं. ॥ ११० ॥ ब्रह्मरूपेंकरून कांहीं । आमचा तुजला वियोग नाहीं । आतां खेद सांडूनियां लवलाहीं । जावें

---

१. सघन, परिपूर्ण. २. 'हा [ मान्यहाळ ] गांव गुलबुर्ग्याच्या दक्षिणेस सुमारें १७ मैलांवर भीमातटाकीं आहे...कसबेआळद हा गांव येथून [ गुलबुर्ग्याहून ] वायव्येस सुमारें २० मैलांवर आहे...मुसलमान लोक बाबाचैतन्य यांस शेखसाहेब, केशवचैतन्यास गेसूद राजबंदेनवाज, आणि राघवचैतन्यास लाडलेमशाख ह्मणतात.'

मांडवीतीरासी.' ॥ १११ ॥ ऐसें वदोन राघवचैतन्य । मागुतीं पावले अंतर्धान । मग केशवचैतन्य तेथून । प्रस्थान करिते जाहले. ॥११२॥ मार्गें मिळोनि भक्तमंडळी । त्या मठामाजीं मान्यहाळीं । पादुका स्थापिल्या तयेवेळीं । केशवचैतन्यस्वामीच्या. ॥ ११३ ॥ सर्व जन म्हणती केशवचैतन्य । भाविक म्हणती बाबाचैतन्य । दोन्हीं नामें एकची जाण । अत्यादरें बोलती. ॥ ११४ ॥ ती कथा चतुर्थ अध्यायीं । वर्णिजेली जाईल पाहीं । महाराष्ट्रदेशासी लवलाहीं । केशवचैतन्य पावलें. ॥ ११५ ॥ निरंजन रघुनाथ जनस्थानवासी । कथा वर्णिजेली पुण्यरासी । श्रवणमात्रें गुरुभक्तासी । आल्हाददायक निश्चयीं. ॥ ११६ ॥ श्रीचैतन्यविजयकल्पतरु । संपूर्णफलदानी उदारू । श्रवणपठणें दुःखपरिहारू । होईल श्रोत्यावक्त्यांचा. ॥११७॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्यार्पणमस्तु ॥

## अध्याय चवथा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीकेशवचैतन्य आपण । तैलंग देशातें सोडून । त्रिंबकेश्वरासी आगमन । करिते जाले एकाकी. ॥ १ ॥ करुनि कुशावर्तस्नाना । घेऊनि त्रिंबकेश्वरदर्शना । केली ब्रह्मगिरीप्रदक्षणा । एका दिवसामाझारीं. ॥ २ ॥ मग पावले उत्तमनगरी । मांडवी पुष्पावतीचे तिरीं । येऊनि राहिले सत्वरीं । गुरुआज्ञेप्रमाणें.

॥ ३ ॥ श्रीगुरूचे पूर्वस्थळीं । वसते जाले तये वेळीं । ध्यानस्थ बेसे चंद्रमौळी । तैसें तप आचरिलें. ॥ ४ ॥ स्वरूप सुंदर गौरवर्ण । भाळ विशाळ आकर्ण नयन । सरळ नासिक लंबायमान । चुबुक लहान शोभतसे. ॥ ५ ॥ कंबुकंठाचियेपारी । उच्च ग्रीवा अति साजिरी । रत्नकंकणेंचि ठेविलीं हारी । तैसी शोभे दंतपंक्ती. ॥ ६ ॥ ओष्ठ साजिरे प्रवाळवर्ण । उच्च कपोल हास्यवदन । पाहुनि लज्जा पावे मदन । तैसें मुख नेटकें. ॥ ७ ॥ आजानुबाहू अंगुळ्या सरळ । नखें चंद्रप्रकाश बहळ । दोर्दंड अंशु विशाळ । वृषस्कंधाचिये परी. ॥ ८ ॥ विशाळ शोभे वक्षस्थळ । उदरीं त्रिवळी दिसे प्रांजळ । रोमलता करी झळाळ । नाभी सखोल साजिरी. ॥ ९ ॥ जानुजंघा कर्दळीस्तंभ । आरक्त तळवे नखें सुप्रभ । पदपृष्ठीं कूर्मसंनिभ । गूढ गुल्फ नेटके. ॥ १० ॥ मस्तकीं जटा पीतवर्ण । तेजस्वी दिसते जैसें सुवर्ण । सर्वांगीं केलें भस्मोद्धारण । दिगंबर मूर्ति गोजिरी. ॥ ११ ॥ भूतळीं घालुनि सिद्धासन । करावें वायूचें प्राशन । फळ मूळ कंद अथवा अन्न । न भक्षावें सर्वथा. ॥ १२ ॥ नासिकाग्रीं दृष्टि ठेवून । हृदयीं वृत्ती करावी लीन । स्थावरजंगमात्मक जन । ब्रह्ममय जयातें. ॥ १३ ॥ ऐसें श्रीकेशवचैतन्य । यानीं सेविलें घोर अरण्य । ही वार्ता बहुकाळ जघन्य । जाली नाहीं सर्वथा. ॥ १४ ॥ तया वनाची विचित्र शोभा । चिंचिणी वटवृक्ष

---

१. ओळीनें. २ 'बहळ' म्हणजे अत्यंत निर्मळ. ३ लौकिक; प्रचालित.

लागले नभा । अश्वत्थ चूत कदंबां । गणती नाहीं तये स्थळीं. १५ कुच जलकुच पाटल । फणस पुन्नाग आणि बकुळ । अशोक औदुंबर तमाल । चंदन कैलवंग डोलती. ॥ १६ ॥ निष्कंटक बिल्वजाती । नागचांपें बहु असती । कुरुबक मरुबकांवरी मालती । गुच्छ डोलती पुष्पांचे. ॥ १७ ॥ मंजुळ प्रियाळ तिलक । सांवा हिंताल अमलक । माकंद कुंद तिलक । भुईचांपे फुलले. ॥ १८ ॥ सोनचांपे केतकीवन । ताडवृक्ष चुंबीत गगन । बदरी कपित्थ आपले आपण । फळभारें लवताती. ॥ १९ ॥ रामफळ निंब आणि माड । गुलतुरा दाडिंब निरगुंड । हिंगु मधुमालती निबिड । पुष्पगुच्छ डोलती. ॥२०॥ मोगरा तुळशी वैजयंती । देवदार कर्दळी मालती । गुंजा जासुंदी कुंजाकृती । होऊनि ठेल्या ठायीं ठायीं. ॥ २१ ॥ ²अर्जुनवृक्ष चालले सरळ । वेणु चुंबिती अंतराळ । हिरडे गोंधणी सिताफळ । वनकेळी डोलती. ॥ २२ ॥ जुईचे कुंज ठायीं ठायीं । कृष्णागर मांदार पिंवळी जाई । अंजीरवृक्षां गणती नाहीं । फळें पडती भूतळीं. ॥ २३ ॥ ऐसें अनेक वृक्षांचें वन । दिसतसे शोभायमान । माजी विहरती श्वापदगण । व्याघ्र सांबरें चिंतळे. ॥ ॥ २४ ॥ ससे लांडगे हरिण । उड्या मारिती वानरगण । मर्कटें पीतनीळवर्ण । रोही अस्वलें असती. ॥ २५ ॥ ठायीं ठायीं कोकिळ कूजती । मयूरें टाहो फोडूनि नाचती । रावे चिमण्या अनेक

१. कलवंग म्हणजे बकाणा निंब. २. अर्जुनसादडा. ३. चित्ते.

जाती । पारवे घुमती आनंदें. ॥ २६ ॥ तास होले गवळण । गरुडपक्षी करिती उड्डाण । बाजससाणे पाहुन । बुलबुल्या चिमण्या पळताती. ॥ २७ ॥ खालीं वरी उडती चंडोळ । साळुंक्या करिती गलबल । बदक बगळे पाहूनि जळ । वसते जाले ते ठायीं. ॥२८॥ भ्रमर करिती गुंजारव । तितिर पक्षी घेती धांव । काकपक्ष्यांनीं सोडिला गांव । फळें पुष्कळ पाहुनी. ॥ २९ ॥ भोंवतीं पर्वतांचीं शिखरें । माजीं गुहा दऱ्या गव्हरें । ठायीं ठायीं उदकांचे झरे । अखंडीत वाहती. ॥ ३० ॥ मांडवीपुष्पावतीचें पुलीन । अति रम्य शोभायमान । कुश काश असती व्यापून । उभय तटीं जियेच्या. ॥ ३१ ॥ भिल्ली आणि पुरंध्री । फिरत असतां वनसंचारी । त्यांनीं शुकयोगींद्राचे परी । चैतन्यमूर्ति पाहिली. ॥ ३२ ॥ ते उत्तमनगरीप्रति येऊन । तेथील शिष्ट ब्राह्मणांलागून । कळविते जाले वर्तमान । योगींद्र कोणी आला आहे. ॥ ३३ ॥ ऐसें सर्वांनीं ऐकिलें । शिष्ट ब्राह्मण दर्शनासी आले । साष्टांग प्रणिपात घातले । आणि वृत्तांत सांगती. ॥ ३४ ॥ ' तुमचे पूर्वाश्रमींचा पुत्र । नरसिंहभट नामें सुपात्र । लक्ष्मी नामें तयाचें कलत्र । अंतर्वत्नी जालिया. ॥ ३५ ॥ यानंतर पावले निधन । पाठीं जन्मलें पुत्ररत्न ।

१. चाष. २. ज्ञानेश्वरींत [ ६,१६३–१८५ ] योगाभ्यासास योग्य अशा स्थानाचें वर्णन दिलें आहे, तें या वर्णनाशीं पडताळून पहावें. ३. गार्भिणी. ४. निधन म्ह० मरण. ५. पाठी म्ह० नंतर.

स्वरूप नेटकें सुलक्षण । अष्टमदिन आजिचा.' ॥ ३६ ॥ तेथ वृद्ध वृद्ध ब्राह्मण । म्हणती, 'आजिचा सुदिन । जालें श्रीचरणदर्शन । आम्हांलागीं ये स्थळीं ॥ ३७ ॥ अतिप्रियकर जें श्रीरंगा । दर्शनें दुरितें नेत भंगा । ते आळशावरी लोटली गंगा । तैसें आम्हां जाहलें.' ॥३८॥ उत्तमनगरीचे संपूर्ण जन । घेती स्वामींचें दर्शन । ब्राह्मण करिती वेदपठण । कोणी गायन करिताती. ॥ ३९ ॥ ऐसा नित्य समारंभ । व्हावयासीं जाला प्रारंभ । मार्गीं उभारुनि ध्वजस्तंभ । कीर्तनें होती ठायीं ठायीं. ॥ ४० ॥ गांवोगांवचे यात्रेकरी येती । किती एक नवसालागीं करिती । संपूर्णांचे मनोरथ पुरती । चैतन्यप्रसादेंकरूनि. ॥ ४१ ॥ प्राप्त होतां तेरावा दिन । लक्ष्मीबाई पुत्र घेऊन । घ्यावयालागीं चरण दर्शन । स्वामीसन्निध पातली. ॥ ४२ ॥ श्रीचरणीं बाळ ठेवून । उंच स्वरें करी रुदन । म्हणे, 'या मुलाचें पालनपोषण । कोण करील स्वामिराया ! ॥ ४३ ॥ याचिया जन्मास तेरावा दिन । नाहीं केलें नामकरण । दैवें करूनि आगमन । जालें स्वामीचरणाचें.' ॥ ४४ ॥ मग स्वामी म्हणती, 'स्वस्थ असावें । याचें संगोपन अघवें । मी करीन हें जाणावें । निश्चयेंसीं सांगतों. ॥ ४५ ॥ माझिया आश्रमींचें नाम । यासीं ठेवावें न करूनि संभ्रम । हा विद्वान् होऊनि निःसीम । सेवा करील आमुची. ॥ ४६ ॥ आतां शोकालागीं

---

१. अवघें; समग्र.

सांडावें । तुवां निजगृहाप्रति जावें । आजि मुहूर्त आहे बरवे । नाम ठेवावयासी.' ॥ ४७ ॥ मग स्वामीसी करूनि नमस्कार । पायांवरी घातला कुमर । निज गृहा पातली सत्वर । लक्ष्मीबाई ते काळीं. ॥ ४८ ॥ सुवासिनी ब्राह्मण मिळविले । विधियुक्त नामकरण केलें । केशवभट नाम ठेविलें । तया मुलाचें सर्वांनीं. ॥ ४९ ॥ ग्रामांतील द्रव्यसंपन्न । त्यांनीं पाठवूनि धन धान्य । केलें तयाचें संगोपन । स्वामी आज्ञेप्रमाणें. ॥ ५० ॥ आतां मुकुंदभट जोशी । उत्तमनगरींचा रहिवासी । ग्रामांत मागुनी भिक्षेसी । उदरनिर्वाह करितसे. ॥ ५१॥ तेणें नित्य नेमें करून । येत असावें स्वामीदर्शन । सांगावें आपलें वर्तमान । गृहकृत्यांचें सर्वदा.॥५२॥ पाहुनि ते त्याच्या सद्भावा । स्वामींनीं लोभ करीत असावा । तेणें संतोष फार जिवा । मुकुंदभटजीचे होतसे. ॥ ५३ ॥ रेणुकाबाई नामें तयाची भार्या । दुर्भाषणी कलहप्रिया । सर्वदा उच्च भोंवया । कपाळीं आंठीं घालितसे. ॥ ५४ ॥ क्रोधयुक्त जैसी सर्पिणी । भांडत असावें दिवा रजनी । संतप्त होऊनि आपुल्या मनीं । भर्त्यास गांजीत असावें. ॥ ५५ ॥ तियेचे गृहीं न येती कोणी । आप्त सोहिऱ्यांची वैरिणी । सदा निर्भय निर्लज्जपणीं । उद्दामवृत्ती असे पैं. ॥ ५६ ॥ जोशी उठोनि प्रातःकाळीं । गेला चैतन्य स्वामीजवळीं । प्रार्थितसे वेळोवेळीं । भिक्षेसी यावें म्हणउनी. ॥ ५७ ॥ स्वामी म्हणती, 'मुकुंदभटा ! । अन्न न सोसे माझिया पोटा ।

तुझी स्त्री आहे कटकटा । गृहासि न ये तुझ्या मी.' ॥ ५८ ॥ जोशी हस्त जोडोनि प्रार्थित । वारंवार आग्रह करित । 'स्वामी! पुरवावे मनोरथ । मज अनाथ दुर्बळाचे.' ॥ ५९ ॥ ऐशापरी आग्रह करी । गडबडा लोळे पायांवरी । संकट पाहुनि तये अवसरीं । स्वामी बोलले, 'येतों मी.' ॥ ६० ॥ मग निघाला तेथुनी । अति आनंद जाला मनीं । मार्गीं येतां तये क्षणीं । खळें एक पाहिलें. ॥ ६१ ॥ शूद्रासंन्निध जाऊन । सांगता जाला वर्तमान । 'स्वामी येती भिक्षेलागून । कांहीं धान्य द्यावें तुवां.' ॥ ६२ ॥ तेणें शेरभर कँडया देऊन । मार्गस्थ केला आर्ष ब्राह्मण । तो स्वगृहाप्रती येऊन । वदता जाला भार्येसी. ॥ ६३ ॥ 'आमचे श्रीगुरू चैतन्यमूर्ति । भिक्षेसी येती गृहाप्रति । कैच्या सारवित बैसलीस भिंती । पाकनिष्पत्ती करावी.' ॥ ६४ ॥ तिनें नदीचें पाणी आणून । घातलें होतें सारवण । आला दोन प्रहर दिन । तापली होती क्षुधेनें. ॥ ६५ ॥ भोंवतीं मुलें बाळें रडती । गडबडां भूमीसीं

---

१. हा अनुकरण वाचक शब्द आहे. 'कटकट' म्ह० मनःक्षोभकारक गडबड, यावरून 'कटकटा' 'कटकटी' म्ह० तशा स्वभावाची, कर्कशा असा अर्थ सिद्ध झाला असावा. 'कट' हा 'कष्ट' याचा अपभ्रंश असावा. २. शेतांत धान्याची कणसें मळण्यासाठीं केलेली जागा. ३, करड्या. ४. 'वेडगळ', 'भोळसर' या अर्थीं या शब्दाची येथें योजना केली आहे. हा अर्थ लक्षणेनें सिद्ध झाला आहे.

लोळती । अन्न नाहीं खावयाप्रती । गृहामाजीं तिळभरी. ॥ ६६ ॥ ऐकुनि पतीचे वचनाला । रेणुकाबाईला क्रोध आला । म्हणे, 'मेल्या ! या मुलांला । काय देऊं खावयासी ? ॥ ६७ ॥ कडेया आणिल्या शेरभर, । आणि मज म्हणतोसि 'पाक कर', । गुरूचे भिक्षेचा बडिवार । सांगत आलासी ये वेळीं. ॥ ६८ ॥ मेला गुरु तुझा दुष्ट, । तूंही तैसाचि महादुष्ट, । आहा रे दैवा ! काय कष्ट । लिहिले माझे कपाळीं ? ॥ ६९ ॥ घरांत भांड्यांचा विटाळ । येक तेंही फुटकें पाळ । नेसावयासीं नाहीं सोंवळ । लुगडें काळें फाटकें. ॥ ७० ॥ घरीं भाजीचा देंठ नाहीं । संन्यासी येईल लवलाही । त्यापुढें फोडोनि डोई । काय घालूं कपाळ ?' ॥ ७१ ॥ ऐसें बोलोनि संतापली । मग घेऊनि काष्टें चुलींतलीं । नवऱ्याचे पाठींत घातलीं । तेव्हां तो पुढें पळतसे. ॥ ७२ ॥ शिव्या देत रस्त्यांत आली । तंव गांवांतली मंडळी मिळाली । सर्वांनीं दुर्दशा पाहिली । मुकुंदभट जोशी याची. ॥ ७३ ॥ रेणुकाबाई सांगे लोकांसी, । 'हा म्हणवितो ग्रामजोशी । न जातां वृत्तीचे गांवासी । संन्याशापाशीं बैसतो. ॥ ७४ ॥ व्यतीपात अथवा एकादशी । न सांगे हा

१. मोठेपणा; कीर्ति. २. या भाषणांतली माधुरी रसिक वाचकांस दाखवावयास नको. शुद्ध घरगुती अंतःपुरांतली भाषा कवीनें येथें अत्यंत मार्मिकपणानें वापरली आहे. ३. हा फळज्योतिषांतला सत्रावा योग आहे. चंद्रसूर्याच्या या अवस्थेंतलें कोणतेंही कार्य शुभप्रद समजत नाहींत.

पंचांगासी । न करी हा कारख्यासी । म्हणतो दोष फार आहे. ॥ ७५ ॥ हा जन्माचा भिकारी । कोणाचें आर्जव न करी । अन्न मिळेना पोटभरी । या द्वाडाच्या संगतीनें. ॥ ७६ ॥ वडिलांनीं द्रव्य वेंचून । घरांत कूप बांधिला जाण । परी त्यांतील गाळ काढून । नीट करिना हा आळसी. ॥ ७७ ॥ मुलें माझीं लहान तान्हीं । खायासी मिळेना तयांलागुनी । दिसताती दैन्यवाणीं । फुकाचें पाणी मिळेना. ॥७८॥ याचा मजला त्रास आला । होईना कां संन्यासी मेला । याचा माझा संग तुटला । म्हणजे सुखी होईन मी. ॥ ७९ ॥ हा नवरा नव्हे माझा वैरी । कैसा पडला माझे पदरीं ! । आहा रे दैवा ! कष्टलें भारी' । म्हणोनि लागली रडावया. ॥ ८० ॥ मग शेजारी पाजारी जन । म्हणती, ' हा ऐसाचि आहे दुर्जन, । रेणुकाबाई तूं मोठी सुजन, । रडूं नको, उगी राहा. ॥ ८१ ॥ आम्ही देतों साहित्यासी । तुवां जाऊनि स्वगृहासी । भिक्षा करावी स्वामीसी । पाक सत्वर करूनि ' ॥ ८२ ॥ रेणुकाबाईनें तैसेंचि केलें । तंव अडीच प्रहर होत आले, । स्वामीलागीं स्मरण जालें । जोशी सांगुन गेला तें. ॥ ८३ ॥ ' अद्यापि बोलावूं नाहीं आला । आपणचि जावें त्याचे गृहाला ' । मग महा-

---

१. ' तिथिर्वारश्च नक्षत्र योगः करणमेव च ' या पांच अंगांचा ज्यांत विचार केला असतो, तें पंचांग. २. कारख्यासी म्ह० मृत कर्म सांगण्याचें कर्म. ३. नवऱ्याचा. ४. तयार करावी; शिजवावी.

सर्प बोलाविला । आरूढ जाले तयावरी. ॥ ८४ ॥ हें ऐकुनि वर्तमान । सामोरे गेले संपूर्ण जन । आले स्वामीप्रति घेऊन । मुकुंदभटाचे गृहासी. ॥ ८५ ॥ पाहतां स्वामीचे चरणांला । रेणुकाबाईचा क्रोध गेला । मग करिती जाली प्रार्थनेला । स्वामीपाशीं येऊनि ॥ ८६ ॥ ‘ कूप आहे माझे आंगणी[१] । परी तयालागीं नाहीं पाणी । उशीर लागला म्हणुनि । स्वामीराया दयाळा !’ ॥ ८७ ॥ मग तांब्या भरूनि पाणी । देती जाली स्वामीलागुनी । पाद प्रक्षाळितां तये स्थानीं । गंगा येती जहाली. ॥ ८८ ॥ स्वामींनीं आंगुळी फिरविली । वाटोळी तेथें खांच केली । तेथोनि गंगा चालली । वाड्यांत पाणी माईना. ॥ ८९ ॥ नदीप्रत चालिला पाट । पाणी शुभ्र चांगलें धुवट । खलौळ[२] वाजती घडघडाट[३] । संपूर्ण जन पाहती. ॥ ९० ॥ किती एक जन स्नानें करिती । पंचारती ओंवाळिती । ब्राह्मणांसी वायनें देती । सुवासिनी मिळाल्या. ॥ ९१ ॥ होती वाजंत्र्याचे गजर । वाद्यें वाजती अपार । आनंदले नारीनर । करिते जाले उत्साह. ॥ ९२ ॥ म्हणती, ‘ मुकुंदभट धन्य । रेणुकाबाई दैववान । आम्हांसीं घडलें गंगास्नान । योगें करून जियेच्या.’ ॥ ९३ ॥ रेणुकाबाई बोले आपण, । ‘ लेंकुरें आहेत माझीं लहान । उदकांत जातील बुडोन । गंगा खालीं[४]

---

१. अंगणांत. २. खळखळ. ‘कल्होळ’ याचें अपभ्रष्ट रूप असावें. ३. ‘घडघड’ म्ह० खडकाळ उतरण, किंवा घडघड असा आवाज करीत. ४. पाताळीं.

न्याची पैं ' ॥ ९४ ॥ स्वामीनीं गंगेसी प्रार्थिलें, । ' आपण खालीं जावें' म्हणाले । त्या प्रकारें उदक गेलें । भूमिमाजीं संपूर्ण. ॥९५॥ असो. स्वामींनीं पुंडी करून । उभयतां स्त्रीपुरुषांलागुन । देते जाले आशीर्वचन. । ' लोकीं मान्य व्हाल तुम्ही. ॥ ९६ ॥ जशी शोभती शिवपार्वती । तैसी परस्परांची होईल प्रीति. । दारिद्र जाऊनि संपत्ती । प्राप्त होईल तुम्हांसी. ॥ ९७ ॥ मुलगे होतील विद्वान । पायां पडतिल संपूर्ण जन, । अंतीं तुम्हांसी मोक्ष होऊन । कृतार्थ व्हाल उभयतां.' ॥ ९८ ॥ ऐसा वर देतेक्षणीं । मुकुंदभट आनंदले मनीं । तैसीच रेणुकाबाई त्याची पत्नी । संतोष पावती जाली. ॥ ९९ ॥ म्हणती, ' धन्य धन्य श्रीगुरुराया ! । आम्हां दीनावरी केली दया. । काय उतराई होऊं पाया । सनाथ आम्हांसि पैं केलें.' ॥ १०० ॥ सर्व ग्रामस्थांसीं बोलावून । केलें तयांचें समाधान । मागुती सर्पावरी बैसून । जाते जाले वनाप्रति. ॥ १०१ ॥ ऐसें चरित्र जालेयावरी । आनंद पावली उत्तमनगरी । ऐसी वार्ता देशांतरीं । प्रगट होती जाहली. ॥ १०२ ॥ तेथील जन लंगडेलुळे । कितीएकांचे गेले डोळे । कितीएक संततीच्या मुळें । दुःखित असती जे जे जन. ॥ १०३ ॥ तयांनीं मनीं निश्चय केला । कीं जावें स्वामीचे दर्शनाला । त्यांचे आशीर्वादें आम्हांला । इच्छित प्राप्त होईल. ॥ १०४ ॥ स्वामी विचार करिती मनीं. । ' प्राणी

---

१. भोजन करून. २. ' अभावामुळें ' हें अध्याहृत.

आपलाले कर्मेंकरूनि । सुखी दुःखी असती जनीं । विचार कोणी न करिती. ॥ १०५ ॥ मुळीं असत्य हा संसार । तयामाजीं दुःखेंचि फार । याचा न करितां विचार । आम्हांसि म्हणति सांग करा. ॥ १०६ ॥ प्रथम जन्मालागीं येणें । तेचि दुःखासीं आमंत्रणें । हें न विचारिती शाहणे । आणिक बंधन इच्छिती. ॥१०७॥ कोणी परमार्था न पुसती । आणि प्रपंच सांग व्हावा म्हणती । काय सांगावें मूढांप्रति ? । विवेक नाहीं यांजला. ॥ १०८ ॥ आतां आपण करावी समाधि । चुकवावी जनउपाधी । भेटूं नये कोणासी कधीं । ऐसेंचि आजी करावें.' ॥ १०९ ॥ मग मांडवी पुष्पावतीचे तीरीं । निबिड वृक्षांमाझारीं । आणिमा सिद्धि प्रगटूनि वरीं । बसते जाले समाधिस्त. ॥ ११० ॥ घालूनि दृढ वज्रासन । अंतरीं आकर्षुनि घेतला प्राण । ऊर्ध्व करुनि अपान । नाभी प्रदेशीं न्याहाटिलें. ॥ १११ ॥ सहस्रदळीची धारणा करुन । सुषुम्नामार्गें योजिलें मन । तयाचे अनुसारें प्राण । ऊर्ध्वगामी पैं

१. यथासांग, सर्व सुखांनीं युक्त. २. महासर्पांवर बसणें व पाताळगंगा आणणें हें आणिमा सिद्धीचें काम आहे. ३. प्रगट केल्यावर. ४. गुद व लिंग यांच्यामधील शिवण उजव्या पायाच्या टांचेनें दाबून त्यावर डावा पाय ठेवावा ह्मणजे जें आसन साधतें तें. ( ज्ञानेश्वरी, ६, १९५–१९९ पहा. ) यालाच 'मूळबंध' ह्मणतात. ५. नेहेटणें, निहटणें=जोरानें नेणें, दाबणें. ६ धारणा ह्म० 'वेध' करून; तिकडे लय लावून.

केले. ॥ ११२ ॥ मूलबंद उड्यान जालंदर । बंधत्रय योजिले परिकर । खेचरी मुद्रेंकरुनि सधरें । जिव्हा तालूंत नेमिली. ॥ ११३॥ षट्चक्रें भेदुनि वरी । ब्रह्मांडीं सहस्रदळाशेजारीं । ब्रह्माकार वृत्ति बरी । निज निर्धारीं पैं केली. ॥ ११४ ॥ मनाचें आलें उन्मन । तेव्हां सहस्रदळीं झुकला प्राण । सहजीं जालें विस्मरण । माघारी येणें राहिलें. ॥ ११५ ॥ जैसें जीवनीं जीवन । कीं गगनीं मिळालें गगन । तैसें चिदाकाशीं केशवचैतन्य । एकी भावातें पावलें. ॥ ११६ ॥ ते वेळीं विमानारूढ होऊन । येते जाले देव संपूर्ण । अंतरिक्षीं उभे राहून । पुष्पवृष्टी करिताती. ॥ ११७ ॥ गंधर्व करिती गायन । नृत्य करिती अप्सरागण । शब्देंकरूनि भरलें गगन । अनेक वाद्यें वाजती. ॥ ११८ ॥ स्तुतिस्तवन देव करिती । म्हणति, 'धन्य हे चैतन्यमूर्ति । ब्रह्मविद् योगींद्रचक्रवर्ती । ब्रह्मरूपीं मिळाले.' ॥ ११९ ॥ आसन जालें असतां निश्चळ । आंगावरी वाढलें वारूळ । देव जाते जाले सकळ । समाधी ऐसी पाहुनि. ॥ १२० ॥ शके तेरांशे त्र्याण्णव । प्रजापति संवत्सराचें नांव ।

१. आश्रययुक्त. २ तालुस्थान हें 'ब्रह्मरंध्र' रूपी दहावें द्वार आहे. ३. त्रिकुट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र हीं ब्रह्मांडींचीं षट्चक्रें. ४. मनाचें लीनत्व जेथें होतें अशी जी पांचवी अवस्था; तद्रूप. ५. इस्मने सैचना म्हणजे १५१ फ. स. तेरासे ही चूक आहे. चौदाशे त्र्याण्णव बरोबर दिसते. ह्या योगें पुढील योग जुळतो व महिपतीचें म्हणणें खरें ठरतें.

वैशाख वद्य द्वादशी पर्व । गुरुवासर ते दिनीं. ॥ १२१ ॥ बादशाहासी कळतां वर्तमान । तेणें परम आवडीकरुन । अरबी शक लिहून । ठेविला असे कागदीं. ॥ १२२ ॥ 'ईसन्नेसबैनी ऐसा सन । केशवचैतन्यबाबा आपण । होते जाले समाधिसंपन्न । पुष्पावतीतिरासी. ॥ १२३ ॥ उत्तमनगरीचे संपूर्ण जण । उत्साह करिती नामस्मरण । कोणी करिती ब्राह्मणभोजन । कथा कीर्तनें करूनी. ॥ १२४ ॥ पंचम अध्यायीं कथा परिकर । वर्णिजेली सविस्तर । ते श्रोतेजनीं होऊनि सादर । श्रवण केली पाहिजे. ॥ १२५ ॥ निरंजन रघुनाथ जनस्थानवासी । कथा वर्णिजेली पुण्यरासी । श्रवणमात्रें गुरुभक्तासी । आल्हाददायक निश्चयीं. ॥ १२६ ॥ श्रीचैतन्यविजयकल्पतरु । संपूर्णफलदानी उदारू । श्रवणपठणें दुःखपरिहारू । होईल श्रोत्यावक्त्यांचा. ॥ ॥ १२७ ॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्यार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

## अध्याय पांचवा.

श्रीगणेशाय नमः ॥ नमो नमो श्रीचैतन्यमूर्ति ! । परम पावन जयाची कीर्ति । समाधिस्थ असतां भक्तांप्रति । भाषण करिते जाहले. ॥ १ ॥ उत्तम नाम नगरीं । नृसिंहभटजीची अंतुरी ।

---

१. स्त्री, पत्नी.

लक्ष्मी नामें होती घरीं । स्वपुत्रातें रेक्षुनी. ॥ २ ॥ केशव तयाचें नामाभिधान । ठेवूनि करी लालन पालन । तयासी पंचम वर्ष पूर्ण । होते जाले त्या काळीं. ॥ ३ ॥ पुत्र उत्तम सुलक्षण । सरळ नासिक सुहास्य वदन । गौर वर्ण विशाळ नयन । सर्व अवयव नेटके. ॥ ४ ॥ बुद्धी जयाची विशाळ । तपस्वियापरी जयाचे खेळ । भजनशीळ सर्वकाळ । देवपूजा करितसे ॥ ५ ॥ ऐसा पुत्र पाहोनि सुबुद्ध । लक्ष्मीबाई करी खेद, । 'आतां या मुलाचा व्रतबंध । कोण करिल रे दैवा ! ॥ ६ ॥ या मुलासी अध्यायन । कोण करिल आतां येऊन?' । ऐशी चिंता परम दारुण । प्राप्त जाली मातेसी. ॥ ७ ॥ तंव पुत्र करी तियेचें शांतवन, । 'आम्हां स्वामीविण आहे कोण ? । आमची चिंता तया संपूर्ण । खेद न करीं मातोश्री.' ॥ ८ ॥ लक्ष्मी म्हणे, 'ऐके रे मुला ! । स्वामींनीं ऐसाचि नेम केला । परि तो काळ निघोन गेला । स्वामी जाले समाधिस्थ. ॥ ९ ॥ आतां कोणापाशीं जावें ? । कोणासी स्ववृत्त सांगावें ? । कैसी धांव घेतली [3]दैवें । नकळे काय होणार

---

१. अ० ४, ३५-५० पहा. २. 'अध्ययन' असावें. अध्ययन=शिक्षण, वेदादिकांचें. ३. हा भाषा संप्रदाय लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. दैवानें=दुर्दैवानें, धांव घेतली=पाठीमागे हात धुवून लागलें; किंवा दैवानें=सुदैवानें, धांव घेतली=सोडून गेलें, विन्मुख-पाठमोरं; असे दोन्ही अर्थ संभवतात.

तें.' ॥ १० ॥ मग उभयतांनीं निश्चय केला, । 'समाधिपाशीं जाऊं चला । निवेदन करूं वृत्तांताला । स्वामीसन्निध सर्वही.' ॥ ११ ॥ मग घेऊनि स्वपुत्रासी । लक्ष्मी जाऊनि समाधीपासी । करिती जाली स्तवनासी । परम भावें करुनि. ॥१२ ॥ 'हे स्वामी सच्चिदानंदघन ! । अखंड अद्वय परिपूर्ण ! । निर्विकार निःसंग निरंजन ! । आपण आहांत सर्वदां. ॥ १३ ॥ परि स्वशरणागता लागून । तुम्ही होऊनि साकार सगुण । निजभक्तांचे मनोरथ पूर्ण । करित असां अक्रियत्वें. ॥ १४ ॥ समाधिपूर्वी बोलिलां आपण । 'मी करिन या मुलाचें पाळण' । ते माझिया प्रत्ययालागून । आलें पाहिजे या वेळीं. ॥ १५ ॥ याचा व्रतबंध करिल कोण ? । यासीं कोण सांगेल अध्ययन ? । ही आज्ञा व्हावी मजलागुन । स्वामीराया दयाळा ! ॥ १६ ॥ आपलें वचन प्रतिपाळावें । बोलिलें तें सिद्धीस न्यावें' । ऐसी प्रार्थना जीवें भावें । करिती जाली लक्षुमी. ॥ १७ ॥ मग समाधींतुनी प्रत्युत्तर । स्वामी देते जाले परिकर, । 'या मुलाचा व्रतबंध सुंदर । करतिल ग्रामस्थ सर्वही. ॥ १८ ॥ पुढें ययासी घेऊनि यावें । अध्ययन सांगेन मीच बरवें । याचे संगोपन करावें । ही ही चिंता मज आहे.' ॥ १९ ॥ ऐसीं समाधींतून उत्तरें जालीं । ते लक्ष्मीनें सर्व ऐकिलीं । मग संतोषातें पावली । येती जाली गृहासी. ॥ २० ॥ ग्रामस्थांसी वर्तमान ।

---

१, असतां. रीतिवर्तमान काळाचें हें कवितेंतलें स्वरूप. २. थाटमाटानें.

सांगती जाली तें संपूर्ण. । त्यांनीं उत्तम काळ पाहुन । व्रतबंध केला केशवाचा ॥ २१ ॥ वेंचूनी द्रव्याचीं भांडारें । व्रतबंध केला अति गजरें । वाद्यें वाजती मंगळ तुरें । ब्राह्मणभोजनें पैं केलीं. ॥ २२ ॥ मुलासीं वस्त्रें भूषणें करून । तैसीं त्याचे मातेलागुन । चार दिवसपर्यंत जाण । उत्साह केला सर्वांनीं. ॥ २३ ॥ मुलगा बुद्धिमंत पाहून । आश्चर्य करिती सर्व ब्राह्मण । म्हणती. 'हा होईल महाविद्वान । चैतन्यस्वामीप्रसादें.' ॥ २४ ॥ असो कोणे एके दिवशीं । स्नान घालुनि स्वपुत्रासी । जाऊनियां समाधीपाशीं । प्रार्थना करिती जाहली. ॥ २५ ॥ 'जया जया जी श्रीगुरुमूर्ति. । विनंतीं करितें चरणांप्रती । स्वामिनीं आज्ञा केली होती । तैसा व्रतबंध जाहला. ॥ २६ ॥ आतां ययासीं अध्ययन । जालें पाहिजे संपूर्ण । आणि प्रपंच निर्वाहालागीं धन । प्राप्त जालें पाहिजे.' ॥ २७ ॥ ऐसें ऐकूनियां वचन । स्वामी म्हणती, 'हो सावधान । श्रीमद्भागवतालागून । सांगतों तें ऐक पां.' ॥ २८ ॥ मग केशवें हस्त जोडिले । आणि सर्वांगाचे कर्ण केलें । ऐसें अवधान दिधलें । चकोरें जैसें मेघांसीं. ॥ २९ ॥ 'जे विष्णूनें ब्रह्मया कथिले । ते चार श्लोक सांगूं आदरिलें । जे वेदव्यासद्वारें आले । राघवचैत-

---

१. हें एक चर्मवाद्य आहे. २. हे शब्द अर्थपूर्ण व जोरदार आहेत. ३. चकोराचे प्रिय मेघ नसून चंद्रकिरणें आहेत, तेव्हां शुद्ध पाठ 'चातक' असण्याचा संभव आहे. ४. चतुःश्लोकी भागवत.

त्यापरियंत. ३० ॥ ॥ तेंचि राघवचैतन्य आपण । सांगते जाले मजलागुन, । केशवा ! तो श्लोकार्थ तुजलागुन । सांगतों तो ऐक पां. ॥ ३१ ॥ श्रीभगवान म्हणति ब्रह्मयासी, । समजून घेईं निज मानसीं । परम गुह्य होतें मजपाशीं । तें तुजप्रति सांगतों. ॥३२॥ जे श्रुतिशास्त्रपारंगतता । तें ज्ञान म्हणिजे गा मम सुता ! । मोक्षालागीं प्रमाणता । येत असे ज्यायोगें. ॥ ३३ ॥ जिवाची सुटका व्हावयासी । म्यां विचार करून मानसीं । वदता झालों श्रुतिशास्त्रांसी । हितालागीं सर्वांच्या. ॥ ३४ ॥ परि ब्रह्मानुभवाविण । नाशातें नपवे मूळ अज्ञान । जयासि म्हणती विज्ञान । तेंहि सांगेन तुंजप्रति. ॥ ३५ ॥ त्या विज्ञानाची व्हावया प्राप्ती । तुज साधन सांगतों निगुती । करावी माझी निःसीम भक्ती । रहस्य निश्चितीं

---

१. 'विषयवासनेवीण । वृत्तीशीं जें विवेकस्फुरण । त्या नांव बोलिजे 'ज्ञान' । सत्य जाण स्वयंभू ! ॥ चिद्रूपें वृत्तीचें स्फुरण । त्या नांव बोलिजे ज्ञान । तेंचि स्वयें होई आपण । या नांव 'विज्ञान' विधातया ! ॥' एकनाथ–चतुःश्लोकी भागवत, ३९७–८. २. प्रमाण, योग्यता, अधिकार. ३. 'देहाचें जाऊनि अहंपण । 'ब्रह्माहमस्मि' स्फुरे स्फुरण । तें स्फूर्तिही विरे संपूर्ण । या नांव 'विज्ञान' पूर्णत्वाचें ॥ ३९९ ॥ हे पावावया पूर्ण प्राप्ति । भावें करावी भगवद्भक्ति । ते भक्ताची निजस्थिति । ऐक तुजप्रति सांगेन ॥ ४०२ ॥ भगवद्भाव सर्वभूतीं । या नांव मुख्य माझी भक्ती । हेंचि भजन त्या अनहंकृती । विज्ञानप्राप्ति तें त्याशीं ॥ ४०३ ॥ एकनाथ–चतुःश्लोकी भागवत.

जाण हें. ॥ ३६ ॥ माझें स्वरूप जितकें जेव्हडें । तें पाहूं न शकती कोणी धडफुडें । ईश्वरत्वाचे होती तुकडे । अनंत स्वरूप पाहतां. ॥ ३७ ॥ ऐसा हा माझा भाव । जे माझा मीच असे स्वयमेव । मज माझ्या स्वरूपाचा ठाव । न लागेची सर्वथा. ॥ ३८ ॥ मी परमात्मा परिपूर्ण । असे सच्चिन्मात्र घन । स्वशक्तिची धरितों आंगेवंण । तेव्हां गुण प्रगट होती. ॥ ३९ ॥ माझ्या शक्तीचा आविष्कार । तेव्हां जगाचा उपक्रमोपसंहार । ऐसा कर्माचा प्रकार । माझे ठायीं भासतसे. ॥ ४० ॥ स्वयें मी अरूप अनाम । सदासर्वदा निष्काम । माझे ठायीं नसे कर्म । विचारदृष्टीं पाहतां. ॥४१॥ माझ्या सत्तेच्या योगें करून । माया होऊनियां त्रिगुण । उत्पत्ति स्थिति संहारण । करित असे जगताचें. ॥ ४२ ॥ परि तें सर्वथा मिथ्या पाही । उगीच भासतसे माझ्या ठाईं । तिशीं मजशीं संबंध नाहीं । केवळ ब्रह्मस्वरूपीं. ॥ ४३ ॥ हें माझ्या अनुग्रहेंकरून । या मायेचें तत्त्व संपूर्ण । ठाउकें पडो तुजलागून । अनुभवपूर्वक विधात्या ! ॥ ४४ ॥ उंखर भूमीसीं भासे मृगजळ । त्यापूर्वीं भूमी असे अचळ । तैसें या जगतापूर्वीं केवळ । मीच असे निश्चयीं.

---

१. खरोखर; खरें. २. भगवद्गीता—'नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां' अ० १०, ४० पद्य. ३. 'अंगवण' हें शुद्ध रूप. अंगवण= स्वेच्छा; सामर्थ्य. येथें 'इच्छा, हा अर्थ घ्यावयाचा. ४. भगवद्गीता, ३, २२–२४ पद्य. ५ खडबुडीत, खडकाळ.

॥ ४५ ॥ जे व्यवहारकाळीं सत्यं भासे । तें सत् स्थूळ माझें ठायीं नसे । असत्य सूक्ष्म जें कांहीं असे । तेंहि नसे सर्वदा. ॥ ४६ ॥ सत असताहूनि जें परं । प्रधान म्हणे ज्या सांख्यशास्त्र । कारण प्रकृतीचा निर्धार । तेंही नसे सर्वदां ॥ ४७ ॥ करितां स्वरूपानुसंधान । तेव्हां प्रकृती होती मजमाजीं लीन । पश्चात् अविनाश परिपूर्ण । मीच असो सर्वदा. ॥ ४८ ॥ ज्ञानियांचेही अनुभवेंकरून ऐसाचि निर्धार असे जाण । मीच असे अद्वितीय घन । प्रकृती नसे ते ठायीं ॥ ४९ ॥ संपूर्णांचा निषेधं करितां । जें अवशिष्ट राहे सर्वथा । जेथें वेगळा नुरे निषेधितां । तें स्वरूप तत्त्वतां जाण माझें. ॥ ५० ॥ माझिया अनुग्रहेंकरून । तुज होवो या स्वरूपाचें ज्ञान । एऱ्हवीं मम मायेचें आवरण । दूर नव्हे सर्वथा. ॥ ५१ ॥ माझी माया आहे कैसी । हें कळलें पाहिजे तुजसी । याकरितां दृष्टांतांसी । देऊनियां सांगतों. ॥ ५२ ॥ आकाशीं दिसे गंधर्वनगर । कीं दृष्टिपुढें बिंदुलयाचा पूर । कीं नीलंकठाहाकार । भासे नभ ज्यापरी. ॥ ५३ ॥ चालिला मृगजळाचा पूर । सर्प भासे जैसा दोर । शुक्ति न समजोनी रौप्याकार । डोळीयासी

१. व्यक्त, मूर्त. २. वेगळें ३. ह्या दृश्य अशा भौतिक सृष्टीचा उत्पादक, आणि ज्या मूलबीजापासून हीं भौतिक दृश्य उद्भवलीं आहेत तें बीज सांख्यशास्त्रांत 'प्रधान' या आख्येनें प्रसिद्ध आहे. ४ 'नेति नेति' असें म्हणून उरेल तें. ५. 'कीं नीलकंठा आकार' असा पाठभेद आहे.

दिसतसे.॥५४॥ तैसें जाण हें ¹ऋत्यर्थ। म्हणजे संपूर्ण दृश्य पदार्थ। यांत कांहीं नसतां अर्थ। सत्य वाटती अज्ञातें. ॥ ५५ ॥ दृश्य प्रतितीस येतें म्हणुन । सत्य मानिती अज्ञ जन । नाहीं दुसरें प्रमाण। सत्य यासीं म्हणावया ॥ ५६ ॥ मृगजळ प्रतितीस येतें। परि तयासी कोणी खरें म्हणते। असो विचार न करिती ते चित्तें। काय सांगावें मूर्खांसी. ॥ ५७ ॥ जया पुरुषांनीं विचार केले। श्रुतियुक्तीसी अनुसरले । ज्यांचें ²अहं स्थिरावले। केवळ ब्रह्मस्वरूपीं. ॥ ५८ ॥ तयांसीं आत्मयाचे ठायीं । जग सहसा दिसत नाहीं। दोर घेतां नसे अही । जयापरी सर्वथा. ॥ ५९ ॥ जगत् हें ठेविलें ठायीं । दिसत असतां मिथ्या पाहीं । जैसा स्वप्नकाळींचा पदार्थ नाहीं । खरेंपण करूनि ॥ ६० ॥ ³मारीचि मृग होता जाला । ⁴तो काय त्वचा काढून आला । तैसी मम माया संपूर्णाला । मोह करित असे पैं. ॥ ६१ ॥ हें सत् म्हणतां नय।

---

१. परमार्थ, परमसत्य. २. मीपणा, 'अहं ब्रह्माऽस्मि' ही भावना. येथें त्यांच्या 'मीपणाचा' 'अहं' चा लय झाला–असा अर्थ. ३. हा रावणाचा मातुल यानें सुवर्णमृगाचें मायावी स्वरूप धारण करून सीतेच्या ठायीं तदभिलाप उत्पन्न केला. याला रामाच्या हातून मोक्ष मिळाला. ४. तो अर्थात् मारिचो राक्षस आपली त्वचा म्हणजे शरीर आच्छादन कातडें काढून मृग कातडें घालून आला? तत्वार्थ तो मारिची आपल्याच शरीराचा भाग मायेनच सतिेस दाखविता झाला.

असत् म्हणतां शंका होय । कोणत्यापरी ईचा निर्णय । केला न जाय सर्वथा. ॥ ६२ ॥ केव्हां दृश्यत्वें दिसावें । केव्हां अदृश्यही व्हावें । इयेचें चेष्टित बरवें । निर्धारितां नयेची ॥ ६३ ॥ हें आभासरूपही आहे । तमोरूप तरी स्वयमेव हे । ऐसी कीं तैसी हा ठाव पाहे । न पडे कोणासी इयेचा. ॥ ६४ ॥ ऐसी दुर्ज्ञेय हीं माया । विचारें न पडेचि ठाया । आतां सांगतों एक उपाया । उपेक्षा ईची करावी. ॥ ६५ ॥ करावा माझे स्वरूपाचा विचार । जें भू अंप अनेळ अणीळें पारावार । जेथें कार्यासहित मायेचा प्रचार । नसे सर्वथा केव्हांही. ॥ ६६ ॥ जे कोणातें जाणें ना नेणें । जयासी नाहीं होणें जाणें । स्थूळ मध्यम ना सानें । जगतापरी नसे जें. ॥ ६७ ॥ तें स्वरूप माझें केवळ । जेथें शक्तीचा नसे मळ ।

---

१. मायेचा. 'जी अघटितचि घडवी । इच्छामात्र अद्भुत दावी । जी ब्रह्मादि देवांशी चाळवी । नाचवी नानापरी ॥ १२४ ॥ इणें गुणासि आणिलें निर्गुण । हीं चैतन्याची बुंथी पूर्ण । इंद्रचंद्रादि पुतळे रचून । एका सूत्रें नाचवी ॥ १२८ ॥ अव्यक्त व्यक्तीसी आणिलें । निर्नामासी नाम ठेविलें । अरूपासि रूप दाविलें । भुलविले निजछंदें ॥ १२९ ॥ गोड तें दावी कडू करूनी । कडवट गोडपणाशीं आणी । आतां असो ही माया राणी । इची करणी विपरीत ॥ १३४ ॥' वेदांतसूर्य, प्र० १. २. आप=पाणी. ३. अग्नि. ४. अनिल=वायु. दुसऱ्या प्रतींत 'भूमा अनं आपारा=वार' असा पाठ आहे. ५. समुद्र (?).

सर्व व्यापून सर्वांवेगळ । आपले आपण असे पैं. ॥ ६८ ॥ जैशी आकाशादि पंच महाभूतें । व्यापूनि दिसती भौतिकांतें । परि अप्रविष्टपणें निरुतें । आपलें आपण असती. ॥ ६९ ॥ कारण जें ब्रह्मांडांतरवर्ति । पंचभूतांची असे स्थिती । दुसरा पदार्थ नसे निश्चितीं । जयापारि ब्रह्मया. ॥ ७० ॥ तैसापारि अखंड परिपूर्ण । केवळ अद्वितीय सनातन । निर्गुण निराकार ज्ञानघन । व्यापुनी असे भूतातें. ॥ ७१ ॥ मायेस्तव भूतें होतीं जातीं । परी माझी अखंड असे स्थिती । जैशी घटांत आकाशाची व्याप्ती । पूर्वसिद्ध असे पैं. ॥ ७२ ॥ गगनीं मी ओतप्रोत । आकाश माझें ठायीं कल्पित । अवघा मीच असे; जीव भ्रांत । अभावपणें पाहती. ॥ ७३ ॥ मी भूतांचे ठायीं न प्रवेशतां । निश्चळ असें गा मम सुता ! । भूतें दिसती गा मम सुता ! । जाण निश्चयेंकरूनी. ७४ ॥ यास्तव ते मिथ्या पाही । परी दिसती मज सत्याचे ठायीं । ह्मणुनि सत्यता त्यांसही । दिसत असे अज्ञांतें. ॥ ७५ ॥ हें पुरतें विचारूनि पाहतां । भूतें नाहीं तें हें सर्वथा । उत्पत्ती सांगितली ते कथा । वंध्यासुताचिये पारि. ॥ ७६ ॥ असो माझें स्वरूप केवळ । चिदाकाश निःसंग निर्मळ । मायानिर्मित जग सकळ । नसे जया स्वरूपीं. ॥ ७७ ॥ आतां तत्त्वजिज्ञासा जया असेल । तेणें अंतःकरण करुनि निर्मळ । हेंचि जाणावें केवळ । स्वरूप माझें

---

१. तैसापारि, त्याप्रमाणें.

निश्चयीं. ॥ ७८ ॥ परमात्मा म्हणती जयालागुन । तो मी चिच्छक्तीच्या योगेंकरून करितों सर्वांचे प्रकाशन । म्हणोनि होय सर्व साक्षी. ॥ ७९ ॥ अंतःकरण उपाधिस्तव । द्रष्टा साक्षी ऐसें नांव । माझ्या अन्वयाची वरव । अवस्थात्रयीं असे पैं. ॥ ८० ॥ तुवां करूनी पंचकोशव्यतिरेक । निवडावें साक्षी स्वरूप सम्यक । जें अंतःकरण वृत्तीं प्रकाशक । होऊनि असे सर्वदा. ॥ ८१ ॥ तयाची साक्षिता सांडोनी । अवशिष्ट असे जें अंतःकरणीं । तें चैतन्य माझे स्वरुपाहुनीं । भिन्न नसे सर्वथा. ॥ ८२ ॥ जैसें घटाकाश महदाकाश एक । तैसें प्रत्यक् पूर्णासी ऐक्य । हें जाणुनि ध्यावा सम्यक । श्रीगुरुचे प्रसादें. ॥ ८३ ॥ तेव्हां देहयात्रा सरली । मी जीव हे भ्राति गेली । अविद्या सर्वस्वें निमाली । स्थिति जाली स्वस्वरूपीं. ॥ ८४ ॥ हें महावाक्याचें सार । तत्त्वज्ञानाचें जिव्हार । हें अभेदभक्तिचें घर । मत माझें निश्चित. ॥ ८५ ॥ या माझ्या मताचें धारण । तुवां करावें निश्चयेंकरून । समाधियोगें निश्चल मन । करुनियां चिंतावें. ॥ ८६ ॥ म्हणजे नाना प्रका-

१. अन्न, प्राण, मन, विज्ञान व आनंद असे पांच कोश. त्यांपासून जो मुक्त झाला त्यास आत्मप्रचीति होते. २. प्रत्यक् म्ह० महाकारणात्मक आद्य स्फोटक अभिमानी ज्यास शबल म्हटलें आहे तो अर्ध मात्रात्मक आणि त्याचा द्रष्टा जें पूर्ण चित्स्वरूप ह्यांत तसेंच ऐक्य आहे. ३. जिव्हाळा, जीवन

रची सृष्टि । तुवां रचिली जरी परमेष्टी । तरी न होशील कष्टी । कर्तृत्व अंगीं आणुनी ॥ ८७ ॥ मनोकल्पित जैसें स्वप्न । तैसी सृष्टि करी निर्माण । मग मोह न होतां तुजलागुन । रमसी माझे स्वरूपीं.' ॥ ८८ ॥ ऐसें श्रीविष्णुनें ब्रह्मयासी । सांगितलें अती गुह्यासीं । तो अर्थ स्मरोनि तुजसी । सांगितलें रे केशवा!' ॥८९॥ जैसे केशवचैतन्य वदले । तैसें केशवासी प्राप्त झालें । तेणें सर्वांग निवालें । आनंदडोहीं बुडोनि. ॥ ९० ॥ म्हणे, 'धन्य धन्य स्वामिराया ! । दूर केली दुर्घट माया । चुकवूनियां भवभया । मुक्त केलें मजलागीं.' ॥ ९१ ॥ मग समग्र भागवताप्रति । सांगते जाले यथानिगुती । चार दिवसांमाजीं समाप्ती । केली द्वादश स्कंधांची. ॥ ९२ ॥ प्रतिदिवसीं करुनि स्नान । भागवतालागीं घेऊन । केशवें समाधिपासीं जाऊन । सांगत असावें पुराणासी. ॥ ९३ ॥ पुराण सांगणें जाल्यावरी । महान सर्प निघोनि बाहेरी । होन ठेवूनि चत्वारी । जात असावें मागुतीं. ॥ ९४ ॥ घेऊनि तया होनांप्रति । द्यावें मातोश्रीचे हातीं । तेणेंकरुनि येथानिगुती । प्रपंच चालूं लागला. ॥ ९५ ॥ ऐसें प्रत्यहीं चार होन । महासर्पे द्यावे आणुन । एका चंबूमाजी घालुन । ठेविती जाली मातोश्री. ॥ ९६ ॥ सांगत असतां पुराण । नित्य स्वामिनीं करावें भाषण । पावोनियां समाधान । आशीर्वचन देत जावें. ॥ ९७ ॥ एका

1. निश्चितपणें.

ब्राह्मणाची कन्या । रूपवती सुशीला मान्या । दिधली केशवभट वदान्या । विवाहसंभ्रम करुनि. ॥ ९८ ॥ मग कोणे एके दिवशीं। माता म्हणे केशवभटजीसी, । 'बाजारांत जाऊनि भाजीसी । घेऊनि ये सत्वरी. ॥ ९९ ॥ तेणें देऊनी येक होन । शेरभर भाजी आणिली जाण । सर्व लोक आश्चर्यालागुन । करिते जाले ते काळीं. ॥ १०० ॥ कोणी म्हणति भोळा ब्राह्मण, । कोणी म्हणति याजपाशीं होन । फार आहेत म्हणुन । देतो भाजीकारणें. ॥ १०१ ॥ असो ऐसी वार्ता प्रगटली । ते जिर्णापुरीचे सुभ्यासी कळली । तेणें मुखासी अंगोळी लाविली । आणि आश्चर्य करूं लागला.॥ १०२ ॥ विब्रिसाहेब त्याचें नांव । तेणें मनीं आणुनि दुष्ट भाव । दूत धाडोनियां केशव- । भटजीलागीं आणविलें. ॥ १०३ ॥ दूत येऊन उत्तमनगरीं । म्हणती होन आहेत ज्याचें घरीं । तो ब्राह्मण आम्हांसि सत्वरी । दाखविला पाहिजे.' ॥ १०४ ॥ लोक म्हणती,

---

१. विवाहसमारंभ २. जुन्नर. याचें प्राचीन नांव 'जिर्ण नगर' असें आहे. कित्येकजण प्राचीन 'तगर' तें हेंच असें ह्मणतात. पण या बद्दल संशय आहे. [ भांडारकर, प्राचीन दक्षिणेचा इतिहास पृ० ३३ पहा. ] या 'तगर' शहराचा फार प्राचीन काळापापासून उल्लेख होत आहे. येथें शिलाहार वंशांतले राजे राज्य करीत असत, व प्राचीनकाळीं हें व्यापाराचें प्रख्यात ठिकाण होतें. हें सुभ्याचें ठिकाण नसून दौलताबादच्या सुभ्यांतल्या बारा सरकाऱ्यांपैकीं एक होतें. जुन्नर सरकारांत २३ महाल होते.

' विघ्न आलें, । बिबिसाहेबासी कैसें कळलें ? । कोणी दुष्टें सांगितलें । चाहाडीलागीं जाऊनी ?' ॥ १०५ ॥ मग केशवभटजीसी घेऊनी । दूत चालिले तये क्षणीं । शोकालागीं त्याची जननी । करिती जाली उदंड. ॥ १०६ ॥ दूतें बिबिसाहेबापासीं । नेऊनि पोहोंचविलें भटजीसीं । आणि चंबुभर होनांसीं । नेऊनियां दिधलें. ॥ १०७ ॥ यवन म्हणे, ' तूं दिसतोसी लहान । तुजपाशीं कोठुनि आले होन ? । हें सांग, नाहीं तरी जाण । शिक्षा करिन तुजलागीं.' ॥ १०८ ॥ केशव म्हणे, ' देव देतो । तेव्हांचि मी होन घेतों, । त्यांजवरी निर्वाह करितों । शासन कशासी करितां ?' ॥ १०९ ॥ यवन म्हणे, ' जो देतो तुजसी । तो देव दाखवीं आम्हांसीं.' । ऐसें म्हणूनि केशवासी । घेऊनि निघता जाहला. ॥ ११० ॥ घेऊनि चतुरंग[1] सैन्य । शिबिकारूढ जाला आपण । एक मुहूर्तामाजीं जाण । उत्तमनगरीं प्रातला. ॥ १११ ॥ केशवालागीं म्हणे यवन, । ' जो देव देतो तुजला होन । तो आतां आम्हांसी ठिकाण । दाखविला पाहिजे.' ॥ ११२ ॥ मग जाऊनि समाधिपासीं । केशव दाखवी यवनासीं । तेणें विवेक न करितां मानसीं । अविवेकासीं आरंभिलें. ॥ ११३ ॥ बिबिसाहेब म्हणे, ' दूता ! । उगेच तुम्हीं काय पाहतां? । कुदळी घेऊनि या आतां । समाधीसी खणावें. ॥ ११४ ॥ जया जे होन मिळतील । तया ते

१. ' हस्त्यश्वरथपादातं सेनांगं स्याच्चतुष्टयम् ' . अमरः.

बक्षीस होतील.' । ऐसें म्हणे ते क्षणीं तत्काळ । प्रवर्तले सर्व खणावया. ॥ ११५ ॥ समाधीवरी कुदळी मारिली । तों स्वामिचे मस्तकीं लागली, । तेणें रक्ताची धारा चालली । स्वामी क्षोभते जाहले. ॥ ११६ ॥ समाधींतुनी निघाले मुंगळे. । कांहीं आरक्त, कांहीं काळे. । भेदिले दूतांचे पादमुळें । चहुंकडे व्यापिले. ११७॥ आंगासीं तोडिती तडतडा । चाविती तेथें पाडिती तुकडा । अशुद्धें वाहती भडभडा । दूत पळूं लागले. ॥ ११८ ॥ आणि मोठाले भुंगे निघाले । सैन्यासीं चावूं लागले । मग सर्व यवन पळाले । समाधीसी सोडुनी ॥ ११९ ॥ कितिएकांचे तोडिले कान । कितिएकांचे तोडिले घ्राण । कितिएकांचे फोडिले नयन । मार्ग कांहीं मिळेना. ॥ १२० ॥ यवन म्हणती, 'हाय ! तोबा ! । काय करावें या गहजबा ? । आम्हांवरी झडला अरंब्बा[१] । मुंगळे भुंगे तोडिती.' ॥ १२१ ॥ हत्ती घोडे पळाले । शस्त्रें ठायींचे ठायीं राहिले, । कितिएकांचे प्राण गेले । पडते जाले मार्गांत. ॥ १२२ ॥ कितिएक कानासीं मुरडून । नस्त्रें जिव्हातें तोडून । 'गुन्हा गुन्हा' ऐसें म्हणून । शिसदा करिते जाहले. ॥ १२३ ॥ तयांतें भुंगे न तोडिती । मुंगळेही न चाविती. । कितिएकांनीं आंगासी माती । लावूनि फकीर जाहले. ॥ १२४ ॥ तेथुनि अर्ध कोसावरी ।

---

१. शुद्ध शब्द 'अरबा'=तडाका, झपाटा, घाला.

बिबिसाहेब[1] गेला झडकरी । भुंगे जाऊनि तेथवरी । तोडिते जाले तयाला. ॥ १२५ ॥ बिबिसाहेबाचा गेला प्राण, । बहुत मारिले मुसलमान, । सैन्याची करुनि धुळधाण । भुंगे अदृश्य जाहले. ॥ १२६ ॥ असो तया स्थळालागुन । लोक म्हणती दस्तुरखान[2] । तेथें मशिद बांधिली म्हणून । असे वदंता आजवरी ॥ १२७ ॥ वर्तमान कळतां जुन्नराला । यवनाचे घरीं कल्पांत जाहला । म्हणती मोठा सैतान निघाला । त्याणें मारिलें सर्वांसीं. ॥ १२८ ॥ यापरी जालिया वर्तमान । उत्तमनगरींचे संपूर्ण जन । श्रीसमाधीपासीं जाऊन । प्रार्थना करिते जाहले. ॥ १२९ ॥ म्हणती, 'जय जया जी स्वामिराया ! । आम्हांवरी करावी पूर्ण दया । आम्ही समस्त पडतों पाया । क्षमा केली पाहिजे. ॥ १३० ॥ यवनानें अपराध केला । त्याचें फळही तो पावला । तयासीं जो दंड केला । तोही उचितचि श्रीस्वामी !' ॥ १३१ ॥ मग शिष्ट ब्राह्मण मिळाले ।

---

१. हा बिबिसाहेब जुन्नर येथें स्वामींच्या समाधिकालानंतर १७ वर्षांनीं तेथें असावा. या सुमारास ह्म० इ०स०१५८८ च्या सुमारास जुन्नर हें अहमदनगरच्या निजामशाहाच्या ताब्यांत होतें. १४७०त जुन्नर येथें असत्खान ह्मणून ठाणेदार होता. १४८५ मध्यें मलीक अहमद निजामशाहीचा उत्पादक, यानें जुन्नर आपलें मुख्य ठाण्याचें ठिकाण केलें. १४९४ मध्यें अहमदनगरला मलीक अहमदनें आपलें ठाणें नेलें. २. दस्तुरखान नांवाचें एक मुसलमानी पीराचें स्थान अद्यापि ओतुराजवळ आहे.

स्थळशुद्धीसी करिते जाले । वेदपारायण केलें । ब्राह्मणभोजन घालुनी. ॥ १३२ ॥ मग केशवभट दुसरे दिवशीं । जाऊनियां समाधीपाशीं । सांगते जाले भागवतासी । अतिआदरें करुनी. ॥ ॥ १३३ ॥ तंव समाधींतुनी भाषण । स्वामी न करिती आपण । करिते जाले दृढ मौन । सर्पेही होन देईना ॥ १३४ ॥ ऐसा प्रकार जाल्यावरी । केशवभट खेदातें करी, । म्हणे, ‘ श्रीगुरु ! मजवरी । रागें नका भरूं जी ! ॥ १३५ ॥ मी तुमचें लेंकरूं लहान, । तुम्हींच केलें संगोपन, । पिता पूर्वींच गेला मरून । आई बाप तुम्हीच माझे. ॥ १३६ ॥ मीं आतां काय करावें ? । कोणालागीं शरण जावें ? । कैशी धांव घेतली दैवें ? । विपरीत काळ पातला.’ ॥ १३७ ॥ गडबडा लोळे धरणीवरी, । मोठ्यानें आक्रोश करी. । एकला तया वनामाझारीं । शोक करूं लागला. ॥ १३८ ॥ सप्रेम भजन आरंभिलें । बहुतां प्रकारें स्तवन केलें, । मग समाधींतुनी बोलते जाले । केशवचैतन्य ते काळीं. ॥ १३९ ॥ म्हणती ‘लेंकुरा! तुझें पुराण । ऐकुनि संतुष्ट माझें मन, । तुवां सप्रेम केलें भजन । तें मजसीं आवडलें. ॥ १४० ॥ सखया ! इतुके दिवसवरी । तुजसीं बोललों बहुतांपरी । म्हणुनि उपाधि जाली भारी । लोक दुष्ट असती. ॥ १४१ ॥ आतां तुजसीं बोलणार नाहीं. । तूं घरीं जाऊनि स्वस्थ राहीं । जेव्हां संकट पडेल कांहीं । तेव्हां समीप आहे मी ’ ॥ १४२ ॥ मग केशवभटजींनीं नमस्कार ।

करूनी घरीं आले सत्वर । माथेसी कथुन जाला प्रकार । स्वस्थ राहते जाहले. ॥ १४३॥ काशीमाजी एक ब्राह्मण । इच्छित होता स्वामिदर्शन । तयाचे मनोरथ केलें पूर्ण । काशींत प्रगट होऊनी. ॥ १४४ ॥ पुढें शत वर्षांनंतर । होता जाला चमत्कार । तो षष्ठाध्यायीं पारिकर । वर्णिजेला जाईल पैं. ॥ १४५ ॥ निरंजन रघुनाथ जनस्थानवासी । कथा वर्णिली पुण्यराशी । श्रवणमात्रें गुरुभक्तांसी। आल्हाददायक निश्चयीं. ॥ १४६ ॥ श्रीचैतन्यविजयकल्पतरु । संपूर्ण फलदानी उदारु । श्रवणपठणें दुःखपरिहारू । होईल श्रोत्यांवक्त्यचा. ॥ १४७ ॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्यार्पणमस्तु ॥

## अध्याय सहावा.

श्रीगणेशाय नमः ॥ आतां नमूं श्रीकेशवचैतन्य । जे सकळ साधुजनांसीं मान्य । कीर्ति ऐकतां श्रवणीं धन्य । प्राणी होती सर्वही. ॥ १ ॥ ज्ञान वैराग्य प्रगट केलें । तेणें अनेक जन उद्धरिले । परि भक्तितत्त्व राहिलें । प्रगट करणें सर्वही. ॥ २ ॥ मग तुकाराम

---

१. कानानें. २. तुकारामाचा अवतार कलियुगांत सर्वसुलभ असें भक्तिमार्गाचें रहस्य तें प्रगट करण्यासाठीं होता, असें महिपतीनें 'भक्तलीलामृतां'त सांगितलें आहे. 'आतां सद्गुरू तुकाराम समर्थ । तयासीं माझा प्रणिपात । ज्याणें अवतार घेऊन मृत्युलोकांत । दाविला भक्तिपंथासाधकां॥

वाणी । भक्ति कथिली तयालागुनी । ते विस्तारपूर्वक जनीं । श्रवण केली पाहिजे. ॥ ३ ॥ नदी इंद्रायणीचे तीरीं । देहुग्रामामाझारीं ।

---

योग याग आणि व्रत । कलियुगीं नव्हेचि यथास्थित । नामसंकीर्तनीं तरतलि बहुत । वचन व्यासोक्त भागवतीं ॥ याचा अर्थ सखोल परम । जडमूढांसीं नकळे वर्म । यास्तव अवतार तुकाराम । साधकांसी नेम लावावया ॥' भक्तलीलामृत–अ० १, १४=१६; विश्वंभरबावाला 'आंबियाचे वनीं श्रीविठ्ठलाची मूर्ति सांपडली तेव्हां आकाशवाणी झाली. त्यांतही ' पुढें याचे वंशीं थोर । अवतरेल वैष्णववीर । तयाचेनि कीर्तनगजरें । जगदोद्धार होईल ॥' असा महिपति उल्लेख करितात. हा ' सकळसंतांचा मुगुटमणी' नामदेवाचा अंशावतार होता अशी आख्या आहे. महिपतीनें तिसऱ्या अध्यायांत वैकुंठींच्या संतसमाजाचें वर्णन देतांना भगवंतांनीं नामदेवास अवतार घ्यावयास सांगून खालील उपदेश केला आहे. 'आणि तुह्मी अवतार घेउनी क्षितीं । सप्रेम करावी माझी भक्ति । दीनजन उद्धरती । तें भजन प्रीतीं सांगावें ॥ तरी आतां ऐक भक्तसखया । माझ्या सप्रेम विसांविया । तुवां अवतार घेऊनियां । भजनक्रिया सांगावी ॥ चहूं मुक्तींवरी भक्ती । बोलिलों गीताभागवतीं । ते करूनियां यथास्थिती । माझी कीर्ति वाखाणी ॥ · · · · · ॥शब्दब्रह्म गूढार्थ थोर । तो तूं मथूनि काढीं सविस्तर । सप्रेम क्षुधित जेवणार । तयांसी आदरें वाढी कां ॥ भक्तिमार्गावरी साचार । हरीनामावरी पोही घाली सत्वर । सप्रेम भक्ति हें निरंतर । देऊनि चराचर निववीं तूं ॥ ९३ ॥ या वरील विवरणावरून तुकारामाची देवानें भक्तितत्त्वस्थापन करण्यासाठीं योजना केली होती असा भाविकांचा समज आहे, हें लक्ष्यांत येईल.

विश्वंभरबाबा भक्ति करी । अखंडित विठ्ठलाची. ॥ ४ ॥ त्याची भार्या आमाबाई । तिची भक्ति श्रीविठ्ठलपायीं । भोळी भाविक होती पाही । अखंड भजनीं तत्पर. ॥ ५ ॥ ते जातीचे कुणबी वाणी । परि विठ्ठल कुलदेवता त्याचे सदनीं । तयासी पुत्र जाले दोन्ही । हरि मुकुंद या नामें. ॥ ६ ॥ ते दोघे निघाले रोजगारीं । चंदीचंदावरकराचे पदरीं । तयांसी होऊनि सरदारी । काम फौजेचें सांगितलें. ॥ ७ ॥ ते महापराक्रमी शूर । चंदीचंदावरास राहती निरंतर । संपत्ती वाढविलिसे थोर । म्हणुनी तेथें राहिले. ॥ ८ ॥ मागें विश्वंभरबाबा वारले । म्हणुन देहूस राहणें सोडिलें । मातोश्री आणि कुटुंब नेलें । चंदीचंदावरासी. ॥ ९ ॥ तेथें आमाबाईचिये स्वप्नीं । वारंवार विठोबा येऊनि । सांगे, 'तूं मजला टाकुनीं । आलीस येथें कशासी ?' ॥ १० ॥ मी देहुग्रामीं उपवासी । नैवेद्य मिळेना मजसीं, । तूं तरी तया स्थळासी । चाल आतां सत्वरीं.'

---

१. 'भक्तविजयां' त तुकारामाचें उपनांव 'आंबळे' दिलेलें आहे. [ अ० ४८,२३ ]. 'कुणबवाणी' असा पाठभेद आहे. २. विश्वंभरबाबाची अखंड निष्ठा, व प्रत्येक पंधरवारीं पंढरपूरची वारी, हें पाहून श्री विठ्ठल प्रसन्न झाले व 'देहूजवळील आंबेवनांत असलेली विठ्ठलाची प्रतिमा आणून तेथेंच श्रीचरण चिंतित असावें, पंढरीस येऊं नये,' असा विश्वंभर बाबाला दृष्टांत दिला—ही कथा महिपतीच्या 'भक्तिलीलामृतां' त दुसऱ्या अध्यायांत वर्णिली आहे.

॥ ११ ॥ आमाबाई सांगे स्वपुत्रासी, । ' देव मरतो उपवासी । म्हणुन देहुग्रामासी । बोलावितो मजलागीं.' ॥ १२ ॥ पुत्रांनीं तियेतें वेडी ठरवून । नायकती तियेचें वचन, । मग एके दिवशीं जालें स्वप्न । तेंही सांगे आमाबाई. ॥ १३ ॥ ' देव माझे स्वप्नीं येऊन । बोलता जाला मजलागुन । तुझे पुत्र पावतील मरण । शत्रु हस्तें करुनि.' ॥ १४ ॥ तें पुत्रांतें सत्य न वाटून । पुत्र बैसले होते जाण । तंव राजाचें आलें पाचारण । परशत्रूवरी जावया. ॥ १५ ॥ मातेसी करुनि नमस्कार । हरि मुकुंद निघाले सत्वर । होऊनि घोड्यांवरी स्वार । रणांगणीं पातले. ॥ १६ ॥ परशत्रूचा होऊनि चढं । यांचे सैन्याचा जाइला मोड । हरिमुकुंदांचे सोडवूनि धड । मस्तकें नेलीं कापोनी. ॥ १७ ॥ ऐसा प्रकार जालियावरी । उभय सुना घेऊनि बरोबरी । आमाबाई गेली श्रीपंढरी ।

---

१. वरचढ; जय; सरशी. २. महिपतीनें दिलेला वृत्तांत याहून भिन्न आहे. धाकटा जो मुकुंद त्याची बायको सती गेली [ अ० २५, १९९ ], व हरीची बायको गर्भार होती तिला घेऊन आमाई देहूस गेली [२०३ ]. नंतर त्या गर्भार सुनेस माहेरीं [ ' नवलाख यांच्या उंबरांत ' महिपती, भक्तलीला०—अ० २५,२५१ ] पाठवून [ अ० २५, २१८ ] आमाईनें ' क्षेत्रवास ' ( पंढरिवास ? ) केला. तेथेंच देहूस असतां तिला दिसेनासें झालें व विठ्ठलांनीं सगुणरूप घेऊन तिची सेवा केली व पुढें तिचें उत्तरकार्यही त्यांनींच केलें. आपल्या सासूची निधनवार्ता ऐकून सून आपल्या

देवदर्शन घेतलें ॥ १८ ॥ आमाबाई म्हणे देवासी, । ' तूं कां लागलासी पाठिसी ? । बुडवूनि आमचे वंशासीं । दिवेलावण मोडली.' ॥ १९ ॥ देव म्हणे, ' तुझें कुळीस । भक्तराज होईल ऐसा पुरुष । भक्तिमान करिल भूमंडळास । कीर्तनघोषें करुनि.' ॥ २० ॥ ऐसें ऐकुनी आमाबाई बिऱ्हाडीं आली लवलाहीं । स्नुषा गर्भिणी होती हेंही । ठाउकें होतें तियेसी. ॥ २१ ॥ नवमास भरतां सायासीं । सून प्रसूत जाली पंढरिसी । हर्ष न माये मानसीं आमाबाईचे ते काळीं. ॥ २२ ॥ मुलास तेरा दिवस जाले । विठोबा ऐसें नाम ठेविलें । पुढें कांहीं दिवसां आले । देहुलागीं सर्वही. ॥ २३ ॥ देवाचे पूजा नैवेद्यालागुन । विठोबा करिता जाला आपण । तयालागीं संतान । पदाजी होता जाहला. ॥ २४॥ त्या पदाजींचे पोटीं । शंकर जाला भक्तकिरिटी । तयाचिये उदर-संपुटीं । कान्हया होता जाहला. ॥ २५ ॥ त्या कान्हयासी पुत्र । बोल्होबा जाला जगन्मित्र । त्याची पत्नी परम पवित्र । कनकाबाई या नामें. ॥ २६ ॥ ते उभयतां बहुत भलीं । देवाची सेवा

---

आतां मोठ्या झालेल्या पुत्रासह देहूस आली, व तेथें सर्व विस्मयकारक वृत्तांत तिला कळला. या महिपतीच्या वृत्तांतांत व निरंजनाच्या हकीकतींत बराच फरक आहे. येथें आमाबाईची सून पंढरीस प्रसूत झाली असें आहे, व बाळंतिणीला घेऊन कांहीं दिवसांनीं दोघेंही देहूस गेलीं असा भिन्न वृत्तांत आहे. ही गोष्ट शोधक लोकांच्या नजरेस आणण्यासारखी आहे.

बहु केली । दैवयोगें संपत्ती वाढली । उदीम व्यापारेंकरूनि. ॥ ॥ २७ ॥ तयांसीं जाले तिघे पुत्र । हाते जाले परम पवित्र । वडिल सावजी वैराग्यस्वतंत्र । सेवूनि गेला तीर्थयात्रे. ॥ २८ ॥ त्याचे पाठीचा तुकाराम । जो विठ्ठलभक्त अतिनिःसीम । कान्हैया ठेविलें जयाचें नाम । तो कनिष्ठ असता जाहला. ॥ २९ ॥ त्यांत तुकारामाचें चारित्र । जें परम पावन आणि पवित्र । श्रवण करिती त्यांचे श्रोत्र । पुनीत होती निश्चयीं. ॥ ३० ॥ जन्मल्यां दिवसा-

---

१. चाळीस वर्षे पंढरीची वारी केल्यावर बोल्होबांनां संतती झाली ( अ० २६,५७ ). २. हे तिघे पुत्र ब्रह्मा, विष्णु व रुद्र यांचे अवतार होते. ( अ० २६, ६० ). ३. सावजी हा बायको मेल्यावर तीर्थयात्रेस गेला. आईबाप वारल्यावर तीन चार वर्षांनीं सावजीची बायको वारली. ( इंदुप्रकाश गाथा, चरित्र, पृ० ५ पहा. ) ४. हा तुकारामाचा धाकटा भाऊ तुकोबाच्या प्रेमळ भक्तमंडळापैकीं होता. ‘ तुकयाबंधू ’ चे जे अभंग ते याचेच. तुकारामाच्या प्रयाणानंतरचे याचे शोकपर अभंग प्रसिद्ध आहेत. ५. तुकारामाचें गुप्त झाल्याचें साल शके १५७१ याखेरीज यांच्या आयुष्य क्रमाबद्दलची सालवार माहिती नाहीं. पण प्रयाणकालीं ते ४२ वर्षांचे होते अशी संतमंडळींतली व वंशजांमध्यें असलेली प्रसिद्धी, व महिपतीचें तुकारामाच्या पूर्वार्धाचा शेवट २१ व्या वर्षी झाला ( भक्तलीला० अ० २८,१३८ ) हें विधान, यांवरून शके १५३० हें जन्मवर्ष असावें असा अंदाज करितात. पण रा० राजवाडे यांनी सबळ पुराव्यावरून जन्म शके १४९० असा ठरविला आहे. ( ग्रंथमाला ११६. )

पासून । विठ्ठलचरणीं जयाचें मन । महान सिद्धाचें लक्षण । जयाचे ठायीं वर्ततसे. ॥ ३१ ॥ तयानें केल्या दोन स्त्रिया । रखमाई आवली नामें जयां । सावध संसार करावया । दोघीही असत्या जाहल्या. ॥ ३२ ॥ बोल्होबा निवर्तल्यावरी । संसारओझें तुकयाचे शिरीं । अत्यंत पडतें जालें. परि । विठ्ठलचरणीं लक्ष त्याचें.

---

१. दोन बायका करण्याचे कारण पहिली रखमाई ही दम्याच्या व्यथेनें आजारी होती हें होय. महिपतीप्रमाणें ही तुकारामाच्या विसाव्या वर्षी ( शके १५५० ) दुष्काळांत अन्नावांचून मेली. हिला दोन पुत्र होते असें महिपती 'भक्तविजयां' त ( अ० ४८,३० ) म्हणतो. २. ही पुण्याचे प्रसिद्ध सावकार अप्पाजी गुळवे यांची कन्या. 'जिजाई' असें हिचें नामांतर होतें. ही एक कर्कशा होती व तुकारामास वैराग्य येण्यास हिचा स्वभाव बराच कारणीभूत झाला होता. ( गाथा--अ० ४४२४. ) ती महासाध्वी असून संसार यातनेमुळें त्रासत असे इ० दुसरी बाजू आवटे यांच्या प्रतींत चांगली प्रतिपादन केली आहे. ३. हें संसाराचें अत्यंत ओझें महिपतीनें पुढील प्रकारें वर्णिलें आहे:--'तेरावे वर्षी पितयानें । संसार गळां घातला जाण । तेथें दक्ष येतां दिसोन । समाधान वडिलांसी ॥ सतरावे वर्षी तत्वता। क्रमोनि गेलीं मातापिता । वडीलबंधूची कांता । तेही अवचिता निमाली ॥ अठरावे वरुषां जाणा । सावजी गेला तीर्थाटणा । त्याच्या वियोगेंकरुनि. जाणा । शोक निजमना वाटत ॥ विसाव्यांत पुत्रकांता स्वयमेव । देखोनि संसारीं धरिली हांव । आतां येथोनि मन विटवावें । मग देवाधिदेवें काय केलं ॥ एकविसाव्यांत विपरित काळ । तुकयासी पातला तत्काळ । तेव्हां

॥ ३३ ॥ देऊळामाजीं जाऊन । नित्य करावें भजन । श्रीज्ञानेश्वरीचें पठण । परम आदरें करावें. ॥३४ ॥ 'अमानित्वा'दि लक्षण । जयाचे ठायीं आलें संपूर्ण । तीं लक्षणें कैसीं हें श्रवण । श्रोतेजनीं करावीं. ॥ ३५ ॥ प्रथम लक्षण अमानित्व असे । तें तुकयाचे ठायीं वर्तें कैसें । हें ऐकूनि घेईजे स्वस्थ मानसें । साधकांनीं निजप्रीतीं . ॥ ३६ ॥ नामस्मरणीं अति आदर । त्यावरी विठ्ठल-

---

निघतांचि दिवाळें । साइरे सकळ हांसती ॥ अज्ञान प्रकृति ते स्त्री निश्चित। तेही निमाली अन्न अन्न करीत । महामोह पुत्र समस्त । लौकिकीं विपरीत हे वार्ता ॥ पूर्वार्ध संपलें ऐशा रीतीं । दुःखें देखिली नानारीती । संसाराची आशा होती । तेही भ्रांती निरासिली ॥' भक्तलीला० अ० २८; १३२ -१३८. या उताऱ्यांतील पूर्वार्ध याचा अर्थ अभिधेनें न घेतां लक्षणेनें घ्यावयाचा आहे.

१. भगवद्गीता—अ० १३,७—११. २. स्वगुणश्लाघाराहित्य म्हणजे स्वगुणांची स्तुति न करणें. ३ विठोबा तुकारामास प्रत्यक्ष दर्शन देत असत, हें प्रसिद्ध आहे. कवित्व करण्याविषयीं तुकारामाला स्वप्नांत नामदेव व पांडुरंग यांची आज्ञा झाली याविषयींचे अभंग प्रसिद्ध आहेतच. ही कवित्वाची स्फूर्ति तुकारामास गुरूपदेश मिळाल्यावर झाली ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. आणि या विधानावरून गुरूपदेशाचें साल गणितानें काढतां येण्यासारखें आहे ( भक्तलीला०—अ० ३२,३३—४१ अ० ३३, १४३—१७८ पहा, व अभंग ४४२२ निर्णयसागर प्रत, १९०३ पहा. ). यासंबंधानें रा० राजवाडे यांनीं महिपतीच्या अभंगांचा एक अत्यंत मह-

साक्षात्कार । कवितेचा जाला प्रसार । लोक मानूं लागले. ॥३७॥ तेव्हां नित्य प्रातःकाळीं उठावें । ब्राह्मणाचे गृहीं जावें । सडासंमार्जन

त्याचा उतारा ग्रंथमालेंतल्या लेखांत दिलेला आहे. तें. अभंग प्रथमतः निबंधमालेच्या ६४ व्या अंकांत रा० रा० वामन विष्णु लेले यांनीं एका पत्रांत दिले होते. त्यांना हे अभंग एका जुन्या रुमालांत सांपडले. ते अभंग आपल्या प्रकृत ग्रंथास अत्यंत महत्वाचे असल्यामुळें, व त्यांची अद्यापपावेतों विशेष प्रसिद्धी नसल्यामुळें आम्ही येथें समग्रतः देत आहों. तः—' अभंग ॥ श्रीकेशवचैतन्य प्र० ( हेंच तुकारामाच्या गुरूचें नांव. ) (१) अनाथाचा नाथ कृपाळू उदार । विश्वीं विश्वंभर पांडुरंग ॥१॥ भक्तिप्रेमयुक्त भक्त तो निःसीम । धन्य तुकाराम कलियुगीं ॥ २ ॥ पाहुनि तयाचं वैराग्य उत्तम । तया मेघश्याम संतोषला ॥ ३ ॥ म्हणे, ' तुकया ! तूं करीं आतां एक । जाणे विश्वात्मक सर्व मानें ॥४॥ सद्गुरूवांचूनी कळेना हें वर्म । द्रव्यमायाभ्रम निरसेना' ॥ ५ ॥ म्हणे पांडुरंग, ' बोलसी तें खरें । परी शरण जारे सद्गुरूसी ॥ ६ ॥ होसी ब्रह्मरूप भोगीसी स्वानंद । तोची ब्रह्मानंद जाण सख्या !' ॥ ७ ॥ महिपती म्हणे तुकया विचारून । सद्गुरूचें स्थान सांगा मज ॥ ८ ॥ (२) उदारांचा राणा सांगे तुकयासी । केशवचैतन्यासी शरण जाईं ॥ १ ॥ उत्तम तें ग्राम पुष्पावती तीरीं । असे निर्विकारी समाधिस्थ ॥ २ ॥ ऐसें बोलोनीयां तुका तो निघाला । ओतुरासी आला स्वामीपाशीं ॥ ३ ॥ समाधी वंदोनी बैसे तयेस्थानीं । स्वामींचे चिंतनी मन सदा ॥ ४ ॥ स्वप्नीं सांगितला मंत्र रामकृष्ण । बाबाजी हें नाम खूण माझी ॥ ५ ॥ महिपती ह्मणे झालों सावधान । विस्मित पाहून चमत्कार ॥ ६ ॥ ( ३ ) समाधी जवळी बैसे तुकाराम । ज्याचें भक्तिप्रेम वर्णवेना ॥ १ ॥ प्रत्यक्ष दर्शन स्वामी मज द्यावें । पावन

करावें । नदीचें पाणी आणुनी. ॥ ३८ ॥ मनुष्यमात्र भेटतां वाटेंत । तयांसी करावा प्रणिपात । अवमानिती स्वजन आप्त ।

---

करावें पतोतासी ॥ २ ॥ होवोनी निश्चळ शुद्ध त्याचें मन । केशवचैतन्य प्रगटले ॥ ३ ॥ पायीं घाली मीटी झाला सद्गदीत । प्रेमाश्रु स्रवत नेत्रांतूनि ॥ ४ ॥ अभय करातें ठेविलें मस्तकीं । उठवून अंकीं बैसविला ॥ ५ ॥ संशय छेदोनी केलें समाधान । मन तें उन्मन झालें सदा ॥ ६ ॥ महिपती ह्मणे द्वैताचें खंडन । ब्रह्मानंद पूर्ण सांठवलें. ॥ ७ ॥ (४) बाबाजी चैतन्य योगीराज धन्य । तुकयालागून प्रगटले ॥ १ ॥ शालिवाहन शके चौदाशे ब्याण्णव । प्रजापती नाम संवत्सरीं ॥ २ ॥ वैशाख वद्य द्वादशीचे दिनीं। समाधी स्वामींनीं घेतलीसे ॥ ६ ॥ तेथूनि तीस वर्षी भेटी तुकयासी । देऊनि तयासी पूर्णपण ॥४॥ महिपती ह्मण झाले समाधिस्थ । तुकया क्रीडत ब्रह्मानंदें ॥५॥ (५) धन्य ते सद्गुरू धन्य शिष्यनिष्ठा । देहेसी वैकुंठा तुकया गेला ॥ १ ॥ कायावाचामनें झाला ब्रह्मरूप । भक्तीच्या साक्षेपें ब्रह्म झाला. ॥ २ ॥ चैतन्याच्या कृपें चैतन्यचि झाला । कीर्तनें भरला ब्रह्मगोळा ॥ ३ ॥ महिपती ऐसा संताचिये पायीं । राहिला अक्षयीं अद्वईत ॥ ४ ॥'—या निबंधमालेंतल्या पत्राची महती रा० राजवाड्यांनीं निदर्शनास आणून दिली आहे. निबंधमालाकारांच्या लक्ष्यांत हें कसें आलें नाहीं याचेंच आम्हांस आश्चर्य वाटतें. महिपतीला तुकारामाचा अनुग्रह झाला असल्यामुळें वरील विधानाबद्दल शंकाच घ्यावयास नको. आमच्या ग्रंथांतल्या अध्याय ४, १२१--२३ मधील शकाचीच चुकी दिसते; बाकी महिना तिथी व संवत्सर नाम बरोबर जुळतात. शिवाय त्या दिवशीं ' गुरुवार ' होता हें अधिक विधान केलेलें आहे.

तैशापरि वर्तावें. ॥ ३९ ॥ वाटसरासी ओझें होतां भारी । तें ओझें घेऊनि आपले शिरीं । प्रविष्ट करावें त्याचे घरीं । सेवकाचे प्रकारें . ॥ ४० ॥ कोणीकरितां स्तुतिस्तवन । त्रास पावे जयाचें मन । वारंवार करितां अपमान । संतोष बहु वाटतसे. ॥ ४१ ॥ सन्मान करितां सर्व जनीं । हाय साधकाची पुण्यहानी । हें मर्म तुकारामालागुनी । विदित असे पुरतें. ॥ ४२ ॥ आतां अदंभित्व कैशापरी । तें श्रवण करावें साधकचतुरीं । संग्रह होता जो तुकयाचें घरीं । तोलून दिधला स्वहस्तें. ॥ ४३ ॥ मग माध्यान्ह समय

---

१. 'अमानित्वा'चें लक्षण देतांना ज्ञानेश्वर ह्मणतातः -'जगें अवाज्ञाच करावी । संबंधीं सोयाचि न धरावी । ऐसी ऐसी जीवीं । चाड बहू॥' १९४. २. 'पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी । हा अमका ऐसी नोहावी ( न व्हावी ) । सेचि ( आठवण ) लोकां ॥ तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा देईल भेटी । मरणेंसीं साठी ( बरोबरी ) । नमस्कारिता ॥······॥ चातुर्य लपवी । महत्व हारवी । पिसेपण मिरवी । आवडोनी ॥ लौकिकाचा उद्वेग । शास्त्रांवरी उबग । उगेपणीं चांग । आथीभर ॥' ज्ञानेश्वरी-१३, १८९-९३. ३. आपल्या अंगांतील गुण मुद्दाम लपवून बाहेरून वेडसरपणा दाखविणें. ४. तुकारामानें संसारास कंटाळून निर्जनवास पत्करिल्यावर दोन महिन्यांनीं त्याची व जिजाबाईची गांठ पडून व समजुतीच्या गोष्टी होऊन स्वारी देहूस परत आली व बायकोस विरक्तीचा उपदेश करून सर्वस्वदान करावयास सांगितलें. (निर्णयसागर गाथा-१९०३, अभंग ४३०६-४३१४, तसेंच अ० ४४२३ पहा.) भक्तलीला०--अ० ३४ भक्तविजय अ० ४९ पहा.

जाल्यावरी । भिक्षा मागावी घरोघरीं । कव्हां करावी मजुरी । उदरनिर्वाहाकारणें. ॥ ४४ ॥ वक्तृत्व असतां बृहस्पतीपाडें । परि लोकीं आपणास म्हणावें वेडें । यास्तव नाचे वेडें वाकुडें । मुखालागीं करूनी. ॥ ४५ ॥ करितां कीर्तनसमारंभ । लोकीं वाढेल आपला दंभ । जैसा वेडा असतो स्वयंभ । तैसा विचुक चावळे. ॥ ४६ ॥ अहिंसा तरी सर्वांपरि । येऊनि राहिली तुकयाचे घरीं । प्राणिमात्रांसीं पीडा न करी । सर्व परमात्मा म्हणऊनि. ॥ ४७ ॥ भजन करितां एकांत स्थानीं । शेतकरी म्हणे तुकयालागुनी, । ' शेत खाती पांखरें येऊनि । त्याची राखणी करीं तूं ॥ ४८ ॥ मी जातों ग्रामासी । एक महिना लागेल मजसीं । तोंपावेतों पांखरें

---

१. तुकाराम भिक्षा मागून कित्येक प्रसंगीं उदरनिर्वाह करीत असे, पण तसा प्रसंग वारंवार येत नसे, व तुकारामास निवळ भिक्षेवर जीवन करणं आवडत नसे. ( अभंग, ८७४ पहा. ) २ या विधानास आधार भक्तलीला०--अ० ३१, १७७-१८१ आहे, तथापि असा प्रकार नेहमीं होत नसावा असें वाटतें. भक्तविजय--अ० ४८--५४ पहा. ३. वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी जोडे । पारि वेडिवेमाजि दडे । महिमे भेणें॥' ज्ञानेश्वरी--१३, १९१. ४. ' वाङ्मनोदेहैरपीडनं प्राणिनां अहिंसनं तदेवाहिंसा;' परपीडानिवृत्ति. ही अहिंसा ज्ञानेश्वरींत उत्कृष्टपणें निरूपिली आहे. ५. ' समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् । विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ॥' भगवद्गीता–१३,२७.

राखिसी । तरि आदमण धान्य देईन मी.' ॥ ४९ ॥ मग तुकया माळयावरीं बैसुन । पक्ष्यांचें न करितां निवारण । उलटे पक्ष्यांसि बोलावून । शेत चारित असावें. ॥ ५० ॥ शेतकरी ग्रामाहूनि आला । तंव जोंधळा पांखरांनीं खादला । कृषिवळ शिव्या देऊं लागला । तुकारामासी वेळोवेळीं ॥ ५१ ॥ तुकया म्हणे कुणब्या-लागुन, । 'तुवां सांगितली पांखरांची राखण । तैसें केलें आदरेंकरुनि । पांखरें संतुष्ट जाहलीं.' ॥५२ ॥ सर्वांघटीं वासुदेव ।

---

१. अदमण, अर्धमण. २. अशाच प्रसंगास अनुलक्षून, 'भक्तासाठीं तो जगजेठी बसुनी माळयावर, पांखरें उडवी शारंगधर' हें तुकारामाचें पद ( अनेककविकृत पदसंग्रह—भाग १, १३७ पद पृ० ६९ ) स्मरणांत आल्यावांचून राहत नाहीं. धामणगांवचे पाटील बांधलेबोवा यांच्या वरील पदांतल्या वर्णिलेल्या प्रसंगाचीच तुकारामाच्या या गोष्टींत पुनरावृत्ति झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. ३. शेतकऱ्यानें हा तंटा गांवकऱ्यांपाशीं नेला व तुकारामाकडून दोन खंडी गल्लयाच्या किंमतीचा रोखा करून घेतला. नंतर शेताची खरी स्थिति पाहण्यासाठीं गांवकरी जातात तों अतोनात पीक लोटलेलें त्यांना दिसलें. शेतकरी रोखा परत देऊं लागला. पण गांवकऱ्यांनीं तसें करूं न देतां त्याला दोन खंडी दाणा देऊन बाकीच्या पंधरा खंडी तुकारामास देऊं केल्या, पण त्यानें तो दाणा स्वीकारिला नाहीं. सबब गांवचा देशपांड्या महादजीपंत यानें तो दाणा सांठविला, व त्याच्या साह्यानें तुकारामाच्या पूर्वजांनीं बांधलेल्या विठ्ठलमंदिराचा जीर्णोद्धार केला. देऊळाच्या जीर्णोद्धाराचा उल्लेख तुकारामाच्या अभंगांत ( ४४२२ ) आहे.

ऐसा जयाचा दृढ भाव । जिवाशी पिडा करण्याचें नांव । टाऊक नाहीं जयासी. ॥ ५३॥ ऐसें च कोणे एके अवसरीं । पित्याचें श्राद्ध आल्यावरि । तुकयाची कनिष्ठ अंतुरी । सांगती जाली तयातें. ॥ ५४ ॥ 'आजी पितृतिथि आहे म्हणुनि । गहुं आणिले पाहिजेत कोठुनि । तेणें कृषिवळासि मागुनि । गव्हाच्या पेंढ्या आणिल्या. ॥ ५५ ॥ मार्गीं येतां वृक्षाचे ठायीं । मोहोळ लागलें होतें पाहीं । त्यासी धक्का लागतां कांहीं । मक्षिका तोडूं लागल्या ॥ ५६ ॥ मग आंगावरिल वस्त्र टाकुन । तेथें उभा राहिला आपण । म्हणे, 'माझ्या विठोबालागुन । दुःख जालें मजयोगें.' ॥ ५७ ॥ नखशिखांत माशा बैसून । तोडित्या जाल्या तुकयालागुन । परि तितुकें केलें सहन । हिंसा न व्हावी याकारितां. ॥ ५८ ॥ कोणाचें दुखवेल मन । म्हणून कठोर न बोले वचन । न करी तृणाचें छेदन । हिंसा होईल म्हणेवुनि. ॥ ५९ ॥ परम शांत वर्णिला वसिष्ठ । परि तयांहिपेक्षां तुकया वरिष्ठ । दुसऱ्यानें आपणांस देतां कष्ट । फिरुनि त्यासीच प्रार्थितसे. ॥ ६० ॥ देहुग्रामामाझारी । साधु मंबाजीबावा

१. 'जिवाचेनि नांवें । तृणातेंहि नोलांडवे । मग न लेखितां जावें । हें कें गोठी ॥' ज्ञानेश्वरी--१३,२५९. २. हा मंबाजी या नांवानें प्रसिद्ध आहे. हा ब्राह्मण असून चिंचवडास कांहीं दिवस होता व महापुरुष गोसाव्याचा डौल मिरवून देहूस आला. तेथें तुकारामाची कवित्वाविषयीं व कीर्तनाविषयीं कीर्ति पसरत जात असल्यामुळें मंबाजीची व्हावी तशी मान्यता राहीना. म्हणून तो तुकारामाचा द्वेष करूं लागला.

वेषधारी । तयाचे शेताभीतरीं । तुकयाची म्हैस जाऊनि ॥ ६१ ॥ तिणें कांहीं धान्य खादले । म्हणून माणुस सांगत आले । बाजीबावासी निमित्य जालें । लोकांप्रति सांगावया. ॥ ६२ ॥ तुकयासि बहुत शिव्या दिल्या । मग दहावीस काठ्या मारिल्या । आपले हातासि मुंग्या आल्या । तेव्हां गेला सोडुनि. ॥ ६३ ॥ तुकारामाचें शरीर । काठ्यांखालीं जालें चुर । परि न बोलतां एकहि उत्तर । विठ्ठलस्मरण करितसे. ॥ ६४ ॥ म्हणे, ' बाजीबावा बहुत भले । परि तयांचे हात असती दुखवले ' । म्हणुन रात्रीं जाऊनि येकलें । त्यांचे हात रगडीतसे. ॥ ६५ ॥ म्हणे, ' मोठ्यानें काठ्या मारितां । क्लेश जाहले तुमचे हाता । मजवरी क्षमा करावी आतां । मनांतिल राग टाकुनि.' ॥ ६६ ॥ ऐसें करूनि त्याचें समाधान । देवळासि आले आपण । करित बैसले नामस्मरण । विठ्ठलाचें आनंदें. ॥ ६७ ॥ आपणालागीं जो अपकारी । तयासि उलटा संतोष करी. । ऐसा तुकारामापरि । नसे शांत कोणीही. ॥ ६८ ॥

---

१. ' वेषधारी ' म्हणण्याचें कारण मंबाजीनं महापुरुष असल्याचें नुसतें स्तोम माजविलें होतें. २. महिपतीनें या मारहाणीचें निमित्त, तुकारामानें देवळाच्या वाटेवरच्या मंबाजीच्या कुंपणाच्या काठ्या काढल्या असें दिलें आहे. म्हशीनें भाजी खाल्ल्यानंतर कांहीं दिवसांनीं हा प्रकार झाला, असें महिपती लिहितो. ३. महिपति 'दहावीस काठ्या मोडल्यावर ' असें सांगतात. ४. अभंग ४२९२--९७ पहा.

आतां पांचवें आर्जवलक्षण । तें तुकयाचे ठायीं असे जाण । कोणां न करितां वक्र भाषण । सरळपणें असावें. ॥ ६९ ॥ मार्गी जातां मेंढवाड्यांत । धनगराचा कुत्रा भुंकत।आला तुकयावरी चवताळत। चावावयाकारणें. ॥ ७० ॥ त्यासी तुकया बोले उत्तर. । 'येथें कांहीं नसतां गुरगुर । तुम्ही कशासी करितां गुरगुर ? ।' मग तो मुकाट्या राहिला. ॥ ७१ ॥ इतुकें सरळ अंतःकरण । जें पशुकडून धरविलें मौन्य । सर्वीं[1] वासुदेव ही विभावन । दृढ असे जयाच्या. ॥ ७२ ॥ आपणास घडावें आचार्यसेवन[2] । यास्तव गुरु करावा कवण । हें पुसावें देवालागुन । म्हणुनि गेला पंढरसी. ॥ ७३ ॥ करुनि साष्टांग नमस्कार । उभा राहिला जोडोनि कर । विनंती करी वारंवार । श्रीविठ्ठलमूर्तिस. ॥ ७४ ॥ 'देवा ! तूंचि माझी माता । आणि तूंचि माझा पिता । तूं माझा बंधु चुलता । आप्तसोईरा तूं सर्व. ॥ ७५ ॥ देवा ! तूं परम गुरु । करावा माझा अंगिकारू । मज उपदेश करुनि परिकरु । जन्म मरण चुकवावें.' ॥ ७६ ॥ मग बोले रुक्मिणीकांत, । 'माझेंच स्वरुप असे ओतुरांत । ते केशवचैतन्य साक्षांत । उपदेश करातिल तुजलागीं.॥७७॥ त्यां वेदवाणी करून । मर्यादा केली असे जाण । जावें महानुभावासीं

---

१. सर्वत्र. २. ( मोक्षसाधनाचा मार्ग दाखविणाऱ्या ) गुरूची शुश्रूषा वगैरे. ही आचार्योपासना कशी प्रत्ययास येते हें ज्ञानेश्वरींत उत्कृष्टपणें सांगितलें आहे.

शरण । माझें स्वरूप समजावया. ॥ ७८ ॥ म्यां रामअवतीराचे ठायीं । वसिष्ठ गुरु केला पाहीं । तैसा कृष्णअवताराचे समयीं । संदीपनें गुरु केला. ॥ ७९ ॥ माझी वेद आज्ञापालन । मीं याचि केली असे जाण । गुरुरूपही मीच होऊन । उद्धार करीं जगताचा. ॥ ८० ॥ नामया माझा भक्त पाही । तया म्यां सांगितलें लवलाही । विसोबा खेंचरास जाई । शरण गुरुउपदेशा.' ॥ ८१ ॥ ऐसें देवें सांगितल्यावरी । तुकया येता जाला ओतुरीं । बाजारांत जानु तेल्याचे द्वारीं । बखळेमध्यें राहिला. ॥ ८२ ॥ हा वेडा आहे म्हणून । तयासीं कोणी न देती ठिकाण । मुखें करितो नामस्मरण । अन्य भाषण न करितां. ॥ ८३ ॥ रात्रौ तेथें करितां शयन । स्वप्नीं येऊनि एक ब्राह्मण । पावशेर तूप भोजनालागुन । मागता जाला तुकयासी. ॥ ८४ ॥ मग उठोनि प्रातःकाळीं । जाऊं लागला समाधीजवळीं । तंव मार्गें भेटले तयेवेळीं । केशवचैतन्य आपण. ॥ ८५ ॥ जात होते मांडवीस्नाना । तेव्हां तुकयानें केलें साष्टांगनमना । आणि करिता जाला प्रार्थना । उपदेश करावा म्हणऊनि. ॥ ८६ ॥ तुकयाचा उत्तम अधिकार । पाहुनि मस्तकीं ठेविला कर । "राम कृष्ण हरि" हा मंत्र । तयालागीं सांगितला. ॥ ८७ ॥ त्या मंत्राचा अर्थ सांगुन । तुकयासि ठसविलें पूर्ण ज्ञान । जेथें मायेचें नसे आवर्ण । तेंचि स्वरूप दाखविलें.

---

१. सांदिपिनी. २. हा बार्शी येथील साधु नामदेवाचा गुरु. ३. पटल, पडदा.

॥ ८८ ॥ तुकयातें जाला परमानंद । सरला देवभक्ताचा भेद ।
साध्यसाधनाचा खेद । सर्वोपरि[1] मावळला. ॥ ८९ ॥ तुकया
पुसतां गुरुपरंपरेशीं । गुरुराय सांगति तयासी । ' केशवचैतन्य
नाम मजसी । गुरू राघवचैतन्य. ॥ ९० ॥ व्यासप्रसाद तयावरी ।
व्यासातें नारद उपदेश करी । नारद ब्रह्मयातें वरी । श्रीविष्णु
गुरु विधात्याचा.' ॥ ९१ ॥ ऐसी परंपरा सांगितल्यावरी । मागुति
तुकया प्रार्थना करी, । ' हे गुरुपरंपरा समजली परी । पूर्वाश्रमींचें
काय नाम ?' ॥ ९२ ॥ स्वामी म्हणती ' तुकारामा ' । सांगूं नये
पूर्वाश्रमींच्या नामा । परि तुझ्या पाहुनि अतिप्रेमा । सांगतों तें
ऐक पां. ॥ ९३ ॥ काशीक्षेत्रींचा अधिपती । जया विश्वनाथ ऐसें
म्हणति । तेंचि नाम होतें मजप्रति । बाबाही म्हणती पूर्वाश्रमीं. '
॥ ९४ ॥ ऐसें तुकयातें सांगुन । स्वामी अदृश्य जाले आपण ।
तुकया वृत्तीवरी येऊन । विस्मय करिता जाहला. ॥९५॥ ' गुरूनीं
मजवरी कृपा केली । परि सेवा कांहीं नाहीं घडली । स्वप्नीं तुपाची
यांचा केली । पडला विसर तयाचा.' ॥ ९६ ॥ माघ शुद्ध दशमी
गुरुवासर । ते दिनीं तुकयाचा केला अंगिकार । मग विठ्ठलनामीं
ठेऊनि आदर । देहूप्रति पातला. ॥ ९७ ॥ मग जे साधुसंत
भेटती । तयांसीं मानुनी सद्गुरुमूर्ति । सेवा करितसे अतिप्रीति ।
पादसेवन करुनि. ॥ ९८ ॥ ऐसें आचार्यसेवन । उपासन घडतसे

१. सर्वतोपरी, अशेष.

तुकयालागुन । अंतर्बाह्य शुचिष्मंतपण । शौचें वर्ते जयासी. ॥
॥ ९९ ॥ परमार्थ करावा जन्मवरी । विठ्ठल स्मरावा निजनिर्धारी।
हेंचि स्थैर्य जया अंतरीं । अखंडित वर्ततसे. ॥ १०० ॥ कर्मेंद्रिय
आणि ज्ञानेंद्रिय । नामीं रूपीं लावावी सोय । हा जयाचा आत्म-
विनिग्रह । होऊनियां राहिला. ॥ १०१ ॥ लावण्यलतिका रूप-
वती । परस्त्रीनें प्रार्थितां एकांतीं । तुकयानें त्यागुनि निश्चिती ।
मातेसमान मानिली. ॥ १०२ ॥ त्यजिलें स्रक चंदनादि भोग ।
स्वर्ग मानिला जैसा रोग । ऐसें वैराग्याचें भाग्य । ज्याचे ठायीं
वर्ततसे. ॥ १०३ ॥ अहंकार ज्याचा जाला गलित । जन्ममरणासी
त्रासलें चित्त । म्हणे व्हावें किती फजीत । जन्मालागीं येऊनि.
॥ १०४ ॥ विषयाचे ठायीं नसे प्रीति । विठ्ठलदास्यत्व सर्वदा
चित्तीं । स्वजन धन गेलियाची खंती । नाहींच जयालागुनी. ॥
॥ १०५ ॥ इष्टानिष्ट आलिया घडुन । चित्तवृत्ति समसमान । नेणें
दैवत विठ्ठलाविण । अव्यभिचारिणी भक्ति पैं. ॥ १०६ ॥ इंद्रा-
यणी तिरीं जाऊन । नित्य करावें भगवद्भजन । बहु आवडे तया
विजन । जनसमुदाय रुचेना. ॥ १०७ ॥ ऐसीं अष्टादश लक्षण ।
गीतेमाजीं बोलिले भगवान । ते तुकारामाचे ठायीं संपूर्ण ।

---

१. शौचं च द्विविधं प्रोक्तं बाह्यमाभ्यंतरं तथा । मृज्जलाभ्यां स्मृतं बाह्यं भावशुद्धिस्तथान्तरम् ॥ २. एक निष्ठता. ३. इंद्रियसंयम.

यथासांग देखिली. ॥ १०८ ॥ हीं लक्षणें व्हावया सुलक्षण । एक श्रीगुरूची कृपा जाण । श्रीकेशवचैतन्य आपण । भेटले तेणें सांग जाहलीं. ॥ १०९ ॥ केशवचैतन्याची समाधी । जालियावरी शतावे अब्दीं । तुकारामानें ज्ञानसमृद्धी । प्रत्यक्ष येऊनि पैं केली. ॥ ११० ॥ एकादशी प्राप्त होतां । स्वामीचें दर्शनाकारितां । यावें देहूहुनि तत्वतां । भजनगजर करावा. ॥ १११ ॥ रात्रंदिवस करितां भजन । स्वामीनीं संतोषूनियां पूर्ण । समाधींतुनी आपण । डोलत असावें निरंतर. ॥ ११२ ॥ ऐसा वृत्तांत जाल्यावरी । तया उत्तम नाम नगरीं माझारी । यादवबावा ब्रह्मचारी । रामदासी पैं होता. ॥ ॥ ११३ ॥ तो सदाचारसंपन्न । श्रीरामचरणीं जयाचें मन । परि तत्त्वज्ञान नसे म्हणुन । तळमळ होती अंतरीं. ॥ ११४ ॥ स्वामी तुकयासी प्रत्यक्ष होऊन । बोधिलें शुद्ध तत्त्वज्ञान ।

---

१. मागें ओ० ३७ वरील टीप पहा. 'तिसावें' बद्दल 'शतावें' आणि मागें अ० ४,१२१ मध्यें '१४९३' बद्दल '१३९३' असल्यामुळें हा घोंटाळा होतो. २ यादव साधूंची समाधी जिल्हा बीड, ता० अष्टी, कोयाळगांव येथें आहे. हें नगरापासून दहा कोस आहे. यादवबोवांचे वंशज अद्याप हयात आहेत. त्यांची वंशावळ:—यादवबावा—दत्तात्रय—रामचंद्र--गोपाळ- नारायण अशी आहे. शेवटले नारायणबाबा आतुरास हल्लीं हयात आहेत. ३. अध्यात्मज्ञान.

उपदेशालागीं देऊन । आनंदरूप पैं केलें. ॥ ११५ ॥ असें आणुन मानसीं । जाऊनि बैसला समाधिपासीं । फळ मूळ न भक्षितां उपवासी । निग्रह करिता जाहला. ॥ ११६ ॥ पुढें कांहीं दिवस झाल्यावरी । फळ मूळ भक्षुनि हठयोग करी । स्वामीनीं कृपा करूनि बरी । उपदेश मजला करावा. ॥ ११७ ॥ ऐसें चिंतोनिया मनीं । बसतां झाला अनुष्ठानीं । सर्वांगा भस्म लाऊनी । वस्त्रांलागीं टाकिलें. ॥ ११८ ॥ ऐसा एक वर्षपर्यंत । राहतां झाला देउळांत । मग स्वामी येऊन स्वप्नांत । तयालागीं सांगती. ॥११९॥ ‘ माझा उपदेश होणार नाहीं । तूं आतां येथूनि जाई ’ । तरी तो तैसाचि राहिला पाही । न जायेचि सर्वथा. ॥ १२० ॥ द्वितिय दिनीं भुंगे आणि मुंगळे । येते झाले तांबडे काळे । तोडिती त्याचे पाद मुळें । रक्त वाहूं लागलें. ॥ १२१ ॥ तैसेंच अवघे पाय फोडून । अस्थी पर्यंत गेले भेदून । खाते झाले मांसालागून । दुःख तेणें जाहलें. ॥ १२२ ॥ परी त्यानें अवघेंच केलें सहन । न उठतां झाला तेथून । देउळामाजीं राहिला पडून । न जायेचि सर्वथा. ॥१२३॥ मग रात्रीचिये अवसरीं । ‘उचलोनि टाकिला नदी माझारी’ । सर्व अंग भिजलीया वरी । सावध होता जाहला. ॥ १२४॥ म्हणे ‘मी येथें कोठून आलों । नदी माजी येऊन पडलों । स्वामिशी न आवडतां जाहलों । म्हणूनि टाकिलें मज येथें’ ॥ १२५ ॥ पुनरपी

खरडत खरडत । येऊनि बसला देवालयांत । मोठा आक्रोश करूनि रडत । स्वामींप्रति बोलतसें ॥ १२६ ॥ 'चैतन्य स्वामी देवाधिदेवा ! । एक वर्ष केली तुमची सेवा । त्याचें फळ माझ्या जिवा । दुःख दिलें हें काय?' ॥ १२७ ॥ मग चैतन्य मूर्ति प्रगट होऊन । तयालागीं दिधलें दर्शन । म्हणती 'पाहिलें तुझें मन । धैर्य असे कीं नाहीं हें.' ॥ १२८ ॥ मग तयाचें मस्तकीं ठेवितां कर । वृत्ती होती झाली स्थीर । करूनि उपदेश परिकर । ब्रह्म साक्षात्कार पैं केला. ॥ १२९ ॥ स्वामी तयासी आशिर्वाद देती । 'पृथ्वीभरी होईल तुझी कीर्ती' । मग लावितां स्वामी तीर्थाप्रती । शरीर दिव्य जाहलें. ॥ १३० ॥ करूनि स्वामीसी वंदन । यादोबा आले गृहालागुन । दर्शना येती संपूर्ण जन । अती महिमान वाढलें. ॥ १३१ ॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्य । तयां स्तवितां ग्रंथें करून । तेव्हां ते स्वप्नीं येऊन । बोलते झाले मजलागीं. ॥ १३२ ॥ 'तुवां हा जो ग्रंथ केला । तो आम्हासी मान्य झाला । आतां वर देतों या ग्रंथाला । पठण कर्त्यास फळेल तो.' ॥ १३३ ॥ 'माझे समाधीपासीं बैसून । जो शतवार करील ग्रंथ पठण । तो होईल द्रव्य संपन्न । दरिद्र जाईल तयाचें. ॥ १३४ ॥ जो सहस्र वेळ पाठ करील । तयातें पुत्र संतान होईल । अयुतसंख्या जो वाचील । रोग जातील तयाचे' ॥ १३५ ॥ 'जो करील नित्य पठण ।

दशसहस्र अवर्तनें करून । त्यासी रूपवती कांता जाण । प्राप्त होईल निश्चयीं.' ॥ १३६ ॥ 'जें जयास संकट पडेल कांहीं । त्याचें निवारीन मी अंगें पाहीं । जो ग्रंथातें संग्रहोनि पाही । पिशाच भय त्या नाहीं.' ॥ १३७ ॥ 'जो जयास इच्छित काम । जो पाठ करील करूनि नियम । त्याचे पूर्ण होतीं मनोधर्म । निश्चयीं वाक्य अवधारी.' ॥१३८॥ 'समाधीपासीं न होतां ग्रंथ पठण । त्यानें असावें कोणत्या रीतीकरून । शुचिष्मंत होऊनियां पूर्ण । आदरें पठण करावें ॥ १३९ ॥ लक्ष वेळ ग्रंथ वाचितां । चैतन्य प्रसाद होईल निश्चितां । दश लक्ष वेळ जपतां । राज्य प्राप्ती होईल तया१४०॥ असंख्य करितां ग्रंथ पठण । तयासि होईल तत्वज्ञान । ऐसा श्री केशवचैतन्य । आशिर्वाद देते झाले '॥ १४१ ॥ कृष्णदास बैरागी परमभक्त । तेणें वर्णिला हा वृत्तांत । शके पंधराशें शहाण्णवांत । ग्रंथ पूर्ण पैं झाला ॥ १४२ ॥ त्या ग्रंथाचेनि आधारें । बोलिलों वेडीं वाकुडीं उत्तरें । तें परिसोत भाविक भोळें सारें । कृपा करोनि मजलागीं. ॥ १४३॥ शके सतराशे नव । प्लवंग संवत्सराचें नांव । कार्तिक शुद्ध एकादशी पर्व । तें दिनीं ग्रंथ पूर्ण झाला. ॥१४४॥ श्रीरघुनाथ गुरु प्रसादेंकरून । गिरिनार पर्वतावरी जाऊन । झालें श्रीदत्तात्रय दर्शन । तो निरंजन विनवीतसे ॥ १४५ ॥ 'ऐकोनि घ्यावें श्रोते जनीं । केशव चैतन्य याचा अभिमानी । जैसें वदविलें

तयांनीं । तैसें लिहितां जाहलों.' ॥ १४६ ॥ निरंजन रघुनाथ जनस्थानवासी । कथा वर्णिजेली पुण्यराशी । श्रवणमात्रें गुरुभक्तांसीं । आल्हाद दायक निश्चयीं. ॥ १४७ ॥ श्रीचैतन्य विजय कल्पतरु । संपूर्ण फलदानीं उदारु । श्रवण पठणीं दुःख परिहारु । होईल श्रोत्यांवक्त्यांचा. ॥ ४८ ॥ श्रीराघवचैतन्य केशवचैतन्यार्पणमस्तु ॥ ॥ श्रीगुरवे नमः ॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥ ॥ ॥

॥ **समाप्तम्** ॥

## ॥ केशव चैतन्याची ॥

### आरती १ ली.

पदनतपालनशीला अद्भुत तव करणी । जडमूढाप्रति तारिसि लावुनियां चरणीं । भवसागर तरणातें तव नामचि तरणी । निज तेजें शोभसि तूं प्रभु अद्वय तरणी ॥ १ ॥ जयजयाजी महाराज सद्गुरु चैतन्या ॥ विश्वाद्या बुधमान्या अद्वैता धन्या ॥ धृ० ॥ शांति क्षमा दयेचें केवळ तूं सार । भक्तिस्तव निज लीलें होसी साकार । स्वानंदानें क्रीडसि तारिसि परिवार । द्वंद्वातीत विराजसि प्रभु निरहंकार ॥ २ ॥ सच्चित्सुख तो आत्मा प्रेरक सकळांचा । रक्षक सकळांचा । अचलामल जग साक्षी तारक दासाचा । तारी तारी तारी साधक जन साचा । पांडुरंग तव चरणा नमिं काया वाचा ॥ ३ ॥ जय जय० ॥

---

## ॥ चैतन्याची आरती २ री. ॥

अघटित पातक घटना कलियुगिं होउनिया । दुर्गति जाती जन हें दुःखां पाहुनिया । श्रीहरि धरि अवतारा जन तारावया । भक्ती पंथा स्थापुनि पातक ने विलया ॥ १ ॥ जय जय श्रीराघव केशव-चैतन्या । स्थापुनि सांप्रदाया तारियलें अन्या ॥ धृ० ॥ निगमागम अभ्यासुनि तप दुर्घट केलें । वेदव्यासापासुनि ज्ञाना धारियलें ।

केशव चैतन्यासी तत्वें बोधियलें । विश्वेश्वर लिंगातें डुलवुनि तुष्टविलें ॥ जय जय श्रीराघव० ॥ २ ॥ कलबुर्गा पुरि राहति मशिदी माझारी । ठेवुनि वाहणा तेथें मध्य खणांतरी । पराभवुनि यवना त्या मशिदिस सत्वरी । बोलवुनी उडवीलें अन्य स्थळावरी ॥ जय जय श्रीराघव० ॥ ३ ॥ यवना वचनालागीं आळंदामाजी । समाधिस्थित हो राघव तारी सर्वांजी । मांडवि पुष्पावति तटिं केशव राहे जी । तारी दुःखी सकलां नामें बाबाजी ॥ जय जय० ॥४॥ चौदाशें ब्याणव शकिं समाधि घेउनियां । ओतूर ग्रामीं पावन करि सकलां ठायां । केशव नात्वां वेदादिक शिकवी विद्या । अविंध छळितां मारुनि मुक्त करी तया ॥ जय जय श्रीराघव० ॥ ५ ॥ श्रीहरि भजनीं तत्पर अखंड त्या तुकया । समाधि नंतर साठीं वर्षी बोधुनिया । स्वप्नीं उपदेशुनि दे दर्शन प्रगटुनिया । भवतारण चिरकालिक करवींले सदया ॥ जय जय श्रीराघव० ॥ ६ ॥ यादव रामदासी परिखुनि तारियला । समाधि स्थितपरि अनंत महिमा दावियला । भक्त जना अद्यापिहि तारित करुनि लिला । सांप्रदाय अति अघटित चैतन्यचि केला ॥ जय जय श्रीराघव० ॥ ७ ॥ नारायणविधिनारदव्यासापासुनिया । राघवकेशवभक्तां अवगत हो सखया । ओंवाळित प्रेमें मीं वासुदेव मया । यशवंतसुतचरणीं तल्लिन होउनियां ॥ ८ ॥ जय जय श्रीराघव केशव चैतन्या ॥ ॥

पुणे मराठी ग्रंथालय
प. ग. १९७९

# पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:-

१ रा. वासुदेव बाळकृष्ण राजर्षि, चैतन्य ऑफीस,
पानसरे यांची चाळ, चिंचपोकळी, मुंबई नं. ११

२ सचित्र 'विनोद' ऑफिस, गिरगांव-मुंबई.
व मुंबई येथें सर्व बुकसेलरकडे मिळेल.

३ रा. जनार्दन लक्ष्मण पतके,
बुधवार पेठ, उमरावती. ( वऱ्हाड. )

४ ,, हणमंत गोविंद कुलकर्णी, स्टेशनवर,
बडनेरा जंक्शन ( वऱ्हाड. )

५ ,, गोविंद दिनकर काकिर्डे,
दर्यापूर ( वऱ्हाड. )

६ ,, नारायण आत्माराम राजर्षि,
ओतूर ( जि. पुणें. )